म. ग्रं. सं. वाचनालय, पुणे.
विषय साहित्य
दा. क्र. २०६९७
IRBK-0120697
IRBK-0120697

# वादळ माणसाळतंय

वसंत कानेटकर

IRBK-0120697

परचुरे प्रकाशन, मुंबई चार

आवृत्ती पहिली : डिसेंबर १९८४

सरकारी प्रमाणपत्र : डी. आर. एम्. ११५३ । १९८४ । ७–११–१९८४

प्रकाशक : सौ. शुभदा विष्णू परचुरे । परचुरे प्रकाशन । २०३/४, मेहता भवन । ३११, राजा राममोहन रॉय मार्ग । गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठ : मोहन वाघ / कमल शेडगे

मुद्रक : चिं. स. लाटकर । कल्पना मुद्रणालय । टिळक रोड । पुणे ४११ ०३०

**मूल्य : वीस रुपये**

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत.

आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये । तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि प्रयोगमूल्य याबद्दल सौ. उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक ४२२ ००२ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा । दूरध्वनी क्रमांक ७३०९२

सौ. साधनाताई आणि श्री. बाबासाहेब आमटे
यांना कृतज्ञतापूर्वक—

म. गो. ठां. नाटे, वाचनालय ठाणे.
प्र. क्र. २०६९८ नों. दि. ३/१/८५
वि. ना८६

# निवेदन

सुमारे पंधरा सोळा वर्षांपूर्वी नाशिकला आनंदवनाचे शिल्पकार आणि एक महामानव श्री. बाबा आमटे यांचा कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली एक भव्य सत्कार झाला होता. त्या वेळी कुसुमाग्रजांनी बाबांच्यावर लिहिलेली 'संत' ही कविता वाचून दाखवली होती. तीच कविता पुढे काही दिवसांनी मी सांगलीला असताना सहज रेडियोवर ऐकली. त्या वेळीच बाबांच्या रोमांचकारी, अद्‌भुत आणि क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वावर नाटक लिहावे अशी मला प्रेरणा झाली होती. पुढे प्रसंगोपात्त बाबांच्यावर साधना सातााहिकाने काढलेला खास अंक माझ्या वाचनात आला आणि बाबांचे अवघे चरित्रच नव्हे, तर वादळी व्यक्तिमत्त्व आणि वादळी विचारधारा यामुळे मी प्रभावित झालो. पुढे बाबांचा प्रत्यक्ष परिचय झाला. त्या वेळी तर मी त्यांच्या वृत्तीतली प्रचंड अस्वस्थता, लाह्या फुटाव्यात तसे विचारांची आणि कल्पनांची कारंजी उडवणारे, त्यांचे वेगवान बोलणे, सतत नवी नवी स्वप्ने पाहाणारी त्यांची कल्पनाशक्ती, त्यांचा दुर्दम्य आशावाद इ. अनेक प्रत्ययांमुळे झपाटून गेलो होतो. व्यक्तिविश्लेषण आणि व्यक्तिचित्रण यांबाबत ज्या लेखकांना विशेष रस आहे, त्यांना बाबांचे जीवन-चरित्र आणि व्यक्तिमत्त्व हे एक प्रचंड आव्हान आणि आवाहन आहे यात मुळीच शंका नाही. ते स्वीकारण्याचा नाटककार म्हणून मला मोह झाला असल्यास नवल ते काय ? तरीदेखील एक मनस्वी आणि विविधरंगी व्यक्तिमत्त्व एवढेच हे आव्हान आणि आवाहन नव्हते. बाबा एका विशिष्ट कार्याला समर्पित होते. 'एका विशिष्ट कार्याला' तरी कसे म्हणावे ? त्यांच्या सदा अस्वस्थ आणि बहुप्रसव कल्पनेतून नित्य नव्या नव्या योजना प्रकट होत होत्या आणि त्या बघता बघता कार्यवाहीत उतरत होत्या. आनंदवन ते भामरागड—सोमनाथ हेमलकसा आणि आनंदवनातही कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाबरोबरच, त्याला उत्तरायण, गोकुळ इ. नव्या संस्थांची त्यांनी दिलेली जोड, हा त्यांच्या कल्पक आणि दाहक व्यक्तिमत्त्वाचा झळझळीत आविष्कारच होता बाबांचे पूर्वायुष्य हासुद्धा त्यांच्या कर्तृत्वाच्या विविधरंगी उन्मेषाचा अविभाज्य भाग आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या बरोबर बाबा आणि त्यांचे कर्तृत्व यांबद्दल मी तास तास चर्चा करीत होतो कविराज मला वारंवार म्हणत होते की– 'वसंतराव, हा तुमच्या नाट्यलेखनाचा विषय आहे' आणि मीही भारावून

तसा संकल्प मनाशी सोडत होतो. तरी पण नाटक उभे करायला एवढे एकच प्रमाथी, प्रचंड व्यक्तिमत्त्व पुरे पडत नाही. कुठे तरी ते द्वंद्वात आणि संघर्षात गोचर झाल्या-खेरीज, त्यातले नाट्य झळझळून उठत नाही. अशा शोधात असतानाच एक विलक्षण योगायोगानं हे द्वंद्व आणि हा संघर्ष मला गवसला.

एकदा बाबा नाशिकला आले होते. त्यांच्यासंगे नाशिकच्या वाल्मिकनगर या कुष्ठरोग्यांच्या वसाहतीला भेट देण्याचा योग आला. ही कुष्ठरोग्यांची वसाहत राघूशेट नावाच्या एका कुष्ठरोग्याने वसवली होती. हातभट्टीची दारू हा तिथला धंदा. या धंद्यावर राघूशेटने पैसा तर भरपूर मिळवलाच; पण आपल्या कुष्ठरोगी बांधवांनाही जगवले. राघूशेटचा दरारा विलक्षण होता. अधिकाऱ्यांना त्याने वरपासून तळापर्यंत हप्त्याने बांधून टाकले होते. कुष्ठरोगामुळे पोलिसदेखील त्याच्या वाटेला फारसे जात नव्हते. एक वेगळे पण छुपे राज्यच त्याने उभे केले होते. एके काळी रस्त्यावर भीक मागणाऱ्या या माणसाने, रस्त्यावरल्या कुष्ठरोग्यांना संघटित करून हे सैतानाचे राज्य उभे केले होते. पण इथेही एक नीती होती आणि शासनपद्धती होती. या राघूशेटला भेटून बाबा म्हणत होते— “ तुम्ही जे करताहात त्याबद्दल मी तुम्हाला दोष देऊ इच्छित नाही कुष्ठरोगी जगवण्याचा तुम्हाला दुसरा मार्गच उरला नव्हता, हे मी जाणतो. पण हे लोण तुम्ही आता आपल्या मुलाबाळांना देऊ नका. तुमची मुलेबाळे मला द्या. मी त्यांना आनंदवनात घेऊन जातो इज्जतीने पोट भरण्याचा मार्ग त्यांना दाखवतो.” त्या प्रसंगी त्या उभयतांत जो संवाद घडला तो ऐकत असतानाच ‘ वादळ माणसाळतंय ’ या नाटकाचा आकृतिबंध मला प्रथम गवसला. बाबा आणि राघूशेट या दोन भिन्न प्रकारच्या जबरदस्त व्यक्तिरेखा मला गवसल्या. तरीही ‘नाटकाची वस्तू’ मी मनातल्या कोषात फुलू, उमलू देत राहिलो. बरीच वर्षे मी अभ्यास करीत होतो, पुनः पुन्हा न्याहाळत होतो; शोध घेत होतो आणि अन्वयार्थ लावीत होतो. हा विषय नुसत्या कुष्ठरोग्यापुरता मर्यादित नाहीये याची मला जाण येत असतानाच बाबांच्या जीवनात भामरागड, सोमनाथ, हेमलकसा यांचे पर्व घडत गेले. बाबांच्या बरोबर आजपर्यंत सौ. साधनाताई तर होत्याच. पण आता त्यांचे दोन सुविद्य आणि कर्तबगार पुत्र डॉ. प्रकाश आणि डॉ. विकास त्यांच्या पुढे दोन पावले जाऊन हेमलकसाच्या आदिवासींना माणसात आणण्याच्या धाडसी कार्याला समर्पित झाले. याच काळात बाबांना काही प्रच्छन्न विरोधक निर्माण झाले. हा विरोध लब्ध–प्रतिष्ठितांचा आहे तसाच तो आपल्या हितसंबंधासाठी दुर्बळांचे शोषण करणाऱ्या धनिकांचा आणि सत्ताधाऱ्यांचाही आहे. ट्रक अंगावर घालून बाबांचा जीव घेण्याचा जसा प्रयत्न झाला तसाच आनंदवनातील कामकऱ्यांना बाबांच्याविरुद्ध उठवण्यासाठीही काही उपद्व्यापी पुढाऱ्यांनी उद्योग करून पाहिला बाबा आणि राघूशेट या संघर्षात या तिसऱ्या एका ( माझ्या नाटकातील ‘ शिवरामदादा मोरे ’ ) शक्तीचाही मला प्रत्यय येत गेला ही

सगळी पात्रे मनात खदखदू लागल्यानंतर 'प्रेमाच्या गावा जावे' हे नाटक पुरे केल्यावर मी या नाटकाकडे वळलो. यापूर्वी या नाटकाचा एक अंक लिहून झाला होता. पुष्कळच काळ लोटला होता. बाबांच्या कार्यात प्रचंड रस घेणारे दिग्दर्शक मित्र श्री. अरविंद देशपांडे यांनी पहिला अंक ऐकल्यापासून, हे नाटक मी त्वरित पुरे करावे म्हणून प्रेमळ आग्रह धरला. एवढेच नव्हे तर लेखन काळात वेळोवेळी या विषयावर त्यांनी महत्त्वाची चर्चा केली, फार उपयुक्त माहिती पुरवली. त्यामुळेच गेले सहा महिने मी सरळ कुठेही न अडता, न थांबता हे नाटक लिहीत गेलो आणि अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी ते लिहून मी पुरे केले.

रसिकांना विनंती करायची ती ही की, या नाटकाकडे त्यांनी चरित्रात्मक नाटक म्हणून पाहू नये. या नाटकात बाबांचे आणि सौ. साधनाताईंचे मला भावलेले चित्र जरूर आहे. त्यांच्या जीवनातील काही घटना, प्रसंगही आहेत पण हे त्या उभयतांचे चरित्र मात्र नाही. कारण उघडच त्यांच्या चरित्राशी संबंध नसलेल्या कितीतरी घटना, प्रसंग आणि व्यक्तिरेखा 'वादळ माणसाळतंय'मधे गुंफल्या गेल्या आहेत. 'वादळ माणसाळतंय' हे मूलतः एक प्रमेयप्रधान ( थीमॅटिक ) नाटक आहे. आपल्या समाज-जीवनाचे ते एक चित्र आहे. 'कुष्ठरोग्यांची सेवा' हा जगातला एक सनातन प्रश्न आहे. कुष्ठरोग संपूर्णपणे बरा होऊ शकतो याची पूर्णपणे जाग आल्यानंतरही, या विसाव्या शतकात, कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन हा केवळ माणसांच्या 'भ्याड आणि मुर्दाड' मनोवृत्तीमुळे, तसेच कार्यकर्त्यांच्या भूतदयेमुळे एक कूट प्रश्न झालेला आहे. पशूसमान जीवन जगणारे जंगलातले आदिवासी, हे याच मनोवृत्तीचे दुसरे बळी आहेत. सगळे आदिवासी, हे अज्ञान आणि विविध प्रकारचे शोषण यांचे पिढ्यान पिढ्यांचे बळी आहेत. कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्या दुःखात काही एक साधर्म्य बाबांना आढळले आणि ते त्यांनी जीवित–कार्य म्हणून मानले. बाबांचे मोठेपण आणि वेगळेपण हे की, या दुःखितांच्या उद्धाराला आणि पुनर्वसनाला त्यांनी एक स्वाभिमानाचा आणि आत्मविश्वासाचा कणा दिला. या दुःखितांकडे पाहण्याच्या दृष्टीतली दया, अनुकंपा आणि सहानुभूती, त्यांनी कडाडून गर्जना करून भिरकावून दिली. 'चॅरिटी डिस्ट्रॉईज, वर्क बिल्डस' हा नवा मंत्र दिला. श्रमाश्रमाची कल्पना रुजवली त्याहीपेक्षा त्यांचे मोठे कार्य म्हणजे त्यांनी रुग्णसेवेचे नुसते कर्मठ ओसाडवन निर्माण केले नाही. सर्वोदयी निसर्गोपचार केंद्रांचे कसे ओसाड आणि कर्मठ मठ केले जातात, तेही मी पाहिले, अनुभवले आहे. बाबा हे स्वतः कवी असल्याने या 'वन'-निर्मितीला त्यांनी 'आनंदाची' जोड दिली. आनंद, सौंदर्य, उत्साह आणि जीवनासक्ती यांचा एक नवा प्रवृत्तिधर्म त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या मर्मस्थानी निर्माण केला आनंदवनात निघणारी बालतरूंची दिंडी हे त्याचे प्रतीक आहे. वृद्धाश्रमाऐवजी उत्तरायण आणि अनाथ-बालकाश्रमाऐवजी 'गोकुळ', हा त्याच वृत्तीचा दैदीप्यमान आविष्कार आहे बाबांचे

सगळ्यांत मोठे कार्य म्हणजे कुष्ठरोगी, आदिवासी यांच्या पुनर्वसन-प्रक्रियेत, त्यांनी य देशातली युवा शक्ती वापरली. आनंदवनाप्रमाणेच सोमनाथ—हेमलकसा येथे शेकडो तरुण-तरुणी, सगळी सुखे भिरकावून समर्पितपणे कार्य करीत आहेत. वैफल्यग्रस्त तरुण पिढीला बाबांनी एका प्रचंड विधायक कार्याशी जे गुंफून आणि गुंतवून टाकले, त्याला खरोखरच इतिहासात तोड नाही

—तर 'वादळ माणसाळतंय'मध्ये हे चित्र मांडण्याची मी धडपड केली आहे. आपल्या आजच्या काळ्याकुट्ट ढगाळ समाजजीवनातील ही एक चंदेरी कड आहे. समाज काय आणि माणूस काय, दोहोंच्याही चिंतनात आणि चित्रणात चंदेरी कड पाहाण्याची माझी नैसर्गिक प्रकृतीच आहे. आजच्या वैफल्यग्रस्त, भ्रष्टाचारी, आणि दीड वितीच्या दुनियेत एक प्रचंड डोंगरासारखा महामानव कसा घडतो, त्याचे मला भावलेले चित्र रंगवण्याची संधी या नाटकामुळे मला मिळाली, हे मी माझे परमभाग्य समजतो.

नेहमीप्रमाणेच या नाटकाच्या लेखनात अनेकांचे मला अनमोल सहाय्य झाले आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, दिग्दर्शक अरविंद देशपांडे, डॉ. अरविंद वावडेकर तसेच चंद्रलेखाचे श्री. मोहन वाघ यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. माझे प्रकाशक-मित्र श्री. आप्पासाहेब परचुरे नेहमीप्रमाणेच अतीव उत्साहाने या नाटकाचे देखण्या रंग-रूपातले पुस्तक साकार करीत आहेत. उत्कृष्ट निर्मितीचा आदर्श निर्माण करणारी 'चंद्रलेखा' हे नाटक रंगमंचावर दिमाखात सादर करीत आहे. या सगळ्यांचा मी फार ऋणी आहे.

या नाटकात अंक तिसरा, प्रवेश पहिला मध्ये 'श्रृंखला पायी असू दे' हे श्री. बाबा आमटे यांनी लिहिलेले गीत मी घातले आहे. याच प्रवेशात 'ज्वाला आणि फुले' या त्यांच्या काव्यसंग्रहातील त्यांच्याच वेगवेगळ्या कवितांतील ओळी एकत्र संपादित करून "...बुजलेल्या व्रणांचे तोंड मला आता उसवत बसायचे नाही..." ही कविता सिद्ध करून मी वापरली आहे. तसेच नाटकाच्या अखेरीला 'साथ सोबत हवी कुणाला' ही आलेली कविता, खास या नाटकासाठीच कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी लिहून दिलेली आहे. मी श्री. बाबा आमटे आणि कुसुमाग्रज यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

शिवाई
शरणपूर रस्ता
नाशिक २

वसंत कानेटकर

"वादळ माणसाळतंय" या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग, चंद्रलेखा, मुंबई, या संस्थेने शनिवार दिनांक ८ डिसेंबर १९८४ रोजी गडकरी रंगायतन, ठाणे येथे दुपारी ४ वाजता सादर केला.

**दिग्दर्शक :** अरविंद देशपांडे
**नेपथ्य / प्रकाश :** मोहन वाघ
**पार्श्वसंगीत :** अनंत अमेंबल
**वाद्यवृंद संचालन :** अनिल मोहिले
**रंगभूषा :** कृष्णा बोरकर
**ध्वनी :** मधु दळवी
**वेशभूषा :** राजन कोनकर, लक्ष्मण गोपाळ
**प्रकाशयोजना सहाय्यक :** सुरेश सावंत, पांडुरंग घाडी
**निर्मिति सहाय्यक :** हनुमान शिंदे
**व्यवस्थापक :** मनोहर कदम

## कलाकार

**भाई :** यशवंत दत्त
**राघूशेट :** जगन्नाथ कांदळगावकर
**शिवरामदादा :** उपेंद्र दाते
**धना :** महेश चौधरी
**मुरलीधर :** निरंजन परळकर
**दामलेमास्तर :** भाऊ बिवलकर
**हणमंतराव :** वसंत विचारे
**फकीरा :** संजय भालेकर
**रझाक :** सुरेश सावंत
**शांताक्का :** रेखा
**जानकी :** शमा देशपांडे

# वसंत कानेटकर यांचे साहित्य

**नाटके :**

वेड्याचं घर उन्हात । देवांचं मनोराज्य । प्रेमा, तुझा रंग कसा ? । रायगडाला जेव्हा जाग येते । दोन ध्रुवांवर दोघे आपण । मत्स्यगंधा । मोहिनी । अश्रूंची झाली फुले । लेकुरे उदंड जाली । इथे ओशाळला मृत्यू । घरात फुलला पारिजात । मला काही सांगायचंय । तुझा तू वाढवी राजा । मीरा मधुरा । हिमालयाची सावली । बेईमान । अखेरचा सवाल । नलदमयंती । विषवृक्षाची छाया । कस्तुरीमृग । माणसाला डंख मातीचा । सूर्याची पिल्ले । एक रूप : अनेक रंग । गोष्ट जन्मांतरीची । गाठ आहे माझ्याशी । कधीतरी कोठेतरी । पंखांना ओढ पावलांची । छू मंतर ! । गगनभेदी । प्रेमाच्या गावा जावे ।

**एकांकिका :**

व्यासांचा कायाकल्प । मद्रासीने केला मराठी भ्रतार । गड गेला, पण सिंह जागा झाला । स्मगलर-सम्राटांच्या न्यायालयात रामशास्त्री । झेंडे-पाटील महाविद्यालयात गंगू, अंबू, विठा । आनंदीबाई आणीबाणी पुकारतात । शहाण्याला मार शब्दांचा ।

**कादंबऱ्या :**

घर । पंख । पोरका । तेथे चल राणी ।

**कथा :**

लावण्यमयी । रमाई । हे हृदय कसे आईचे ।

**टीका :**

नाटक : एक चिंतन ।

# वादळ माणसाळतयं

कोणा एका माणसाचा अवतार घेऊनं,
गरगरत येऊन आदळते जेव्हा एक भन्नाट चक्री वादळ;
आणि धडाधड कोसळतात जेव्हा मायाळू घराच्या भक्कम भिंती;
आणि पाचोळ्यासारखी उडून जातात जेव्हा सगळी सुरक्षित छपरे;
आणि बघता बघता होतात जेव्हा अवघ्या शहाण्या माणसांची भिरभिरे;
तेव्हा जाण येते की-
झडपलेला; झपाटलेला माणूसच वादळतोय.
पण खरंच, माणूस वादळतोय की–
वादळ माणसाळतंय ?

# वादळ माणसाळतंय !

**वसंत कानेटकर**

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ वाल्मीक नगरातील हमरस्त्यावरील एक इमारत. या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील एक दिवाणखाना. सजावट श्रीमंती थाटाची, पण मठ्ठ अडाणी अडत दुकानदाराला साजेलशा रसिकतेची. एक दिवाण ठेवला आहे. काही खुर्च्या आणि दूर कोपऱ्यात लांबलचक तारेचा टेलिफोन ठेवला आहे. साईबाबा, लक्ष्मी, म. गांधी आणि काही चित्रचंद्रिका यांच्या तसबिरी लावल्या आहेत. वेळ सायंकाळची. या इमारतीत काही प्रचंड धामधूम उडाली आहे. उघडच पोलिसांची धाड पडली आहे आणि झडती चालली आहे, हे पडदा वर जाताच काही क्षणांतच लक्षात येते. काही युनिफॉर्ममधले आणि काही साध्या वेशातले पोलिस एकमेकांना सूचना देत आतबाहेर लगबगीने जात येत आहेत. खाली दूरवर कोठेतरी बायकांचा कांगावा, रडारड अस्पष्टपणे ऐकू येते आहे. त्यातच मालकीणबाई तारस्वरात तणतणतात— "वाट्टूळं हुईल मुडद्यांचं... जरीमरीआई बघून घील . . . आमी सरळ मान्सं . . . आमच्या वाटंला का लागतायसा ? समदं घरदार इस्कटून टाकलं मेल्यांनी . . . अरं तुला कुनी आय–भइनी, पोरंबाळं हाईत का न्हाईत ? . . . धाड पडली, पटकी लागली रांडेच्यांना . . . अरं ए मुडद्याऽऽ ते पोतं कशापायी उचकतुयास ? अरं, त्यात भांडीकुंडी हैत. दुसरं काय बी न्हाई . . ."—आणि हा आरडाओरडा चालला असतानाच, दिवाणावर लोडाला रेलून निर्विकार थंड मुद्रेनं पान तयार करत बसले आहेत राघूशेट. स्वच्छ धोतर, अंगरखा, जाकीट, डोक्यावर फरची उंच काश्मिरी टोपी, पायात आणि हातात तलम मोजे असा वेश. शेजारी ठेवलेला, कुठलीशी गीतमाला ऐकवणारा किंमती ट्रान्झिस्टर. सभोवार दंगल, किसन आणि फकिरा अदबीनं पण बावरलेल्या मुद्रेनं राघूशेटच्या चेहऱ्याकडं पाहत उभे आहेत. राघूशेट पन्नाशीच्या घरातले. खाली कोठेतरी चाललेला मालकीणबाईंचा कांगावा असह्य होतो तशी ट्रान्झिस्टरचा व्हॉल्यूम कमी करत— ]

**राघूशेट :** ( जरबेनं ) काय चाललाय हा तमाशा ? दंगल, तू खाली जा आणि बाईजीला सांग, उगाच बोंबाबोंब करू नका. काही आकाश कोसळलं नाही की, जमीन फाटली नाही. पोलिस लोक हुकमाचे ताबेदार; काय त्यांना शोधाशोध करायची

असेल तो निमूटपणे करू द्या.

**दंगल** : होय शेट. ( जाऊ लागतो तशी—-)

**राघूशेट** : कोणाची तक्रार आली तर हा राघूशेट पार बिघडून जाईल. एकेकीला रट्ट हाणील येऊन हां. नीट जरब देऊन सांग.

**दंगल** : होय शेट, सांगतो. ( दंगल लगबगीनं जातो. )

**राघूशेट** : किसन—-

**किसन** : जी शेट ?

**राघूशेट** : सगळ्या पोलिसांच्या चहापाण्याचा बंदोबस्त झाला ?

**किसन** : तीनतीनवेळा चहा फिरवला पण—-

**राघूशेट** : यडपट आहेस. अरे तुम्ही महारोगी लोक. तुमच्या हातचा चहा ते कसा घेतील ? समोरच्या इराण्याला ऑर्डर दे. सगळ्या हवालदारसाहेबांना सांग, पाळी-पाळीनं तिथं जाऊन चहाफराळ करून या म्हणावं.

**किसन** : तेही सांगून पाहिलं, पण—-

**राघूशेट** : त्यांच्या साहेबाचा तसा हुकूम नाही हेच ना ? ठीक, ठीक. कुठायत इन्स्पेक्टरसाहेब ?

**फकिरा** : आपल्या बेडरूममधे शेट.

**राघूशेट** : बाकी सगळ्या खोल्यांची झडती झाली ?

**फकिरा** : जी हा शेट.

**राघूशेट** : काय लागलं हाती ?

**फकिरा** : काही नाही साहेब. फक्त कोठीच्या खोलीतून—-

**राघूशेट** : नासक्या गुळाची गोणी सापडली.

**फकिरा** : होय शेट.

**राघूशेट** : सापडू दे. त्यासाठीच ठेवली होती ती. कानात वारं भरलेलं हे तट्टू किती खोल पाण्यात शिरतंय ते बघायचंय मला. आपल्या सगळ्या लोकांना इशारे गेले ?

**फकिरा** : होय शेट.

**राघूशेट** : तयार झालेला माल जिकडच्या तिकडं—-

**फकिरा** : बिल्कुल शेटसाहेब. आपण काळजीच करायची नाही.

[ तेवढ्यात एक पोलिस लगबगीनं येतो तशी—-]

**राघूशेट** : बोला हवालदारसाहेब, कोणती सेवा करायची आता ?

**पोलिस** : साहेबांनी आपल्या खोलीतली कपाटं उघडून हवी आहेत.

**राघूशेट** : बस्स् ? इतकंच ? ( कमरेचा किल्ल्याचा जुडगा काढून समोर टाकत ) या चाव्या घेऊन चला.

**पोलिस :** जोखमीचं काम आहे शेटसाहेब. आपण स्वतः याल तर–

**राघूशेट :** अरे काय बोलताय काय हवालदारसाहेब, तुम्ही कोणी परके आहात का आम्हाला ? साहेब नवे असले तरी तुम्ही–

**पोलिस :** हळूहळू शेट. जमाना बदललाय.

**राघूशेट :** काही एक बदललं नाही शिरसोटसाहेब. सगळं ठीक होऊन जाईल. इन्स्पेक्टर साहेबांना ह्या चाव्या नेऊन द्या आणि सांगा, तुम्ही नेकीचे अधिकारी आहात. राघूशेट तुमच्या इमानदारीची कदर करतात. खुशाल सगळी कपाटं उघडून पहा. जा, आमचा विश्वास आहे म्हणावं तुमच्यावर ( पोलिस अनमान करतो तशी ) किसन, तू जा त्यांच्या बरोबर. ( किसन किल्ल्यांचा जुडगा उचलून जाऊ लागतो तशी– ) हवालदार साहेब, ( गादीखालून सिगरेटचं पाकीट काढत ) अरे चहाफराळाचं राहिलं पण बिडीकाडी तरी घ्याल ? घ्या घ्याऽऽ . . . खिशात ठेवा. कामगिरी संपल्यावर घरी जाऊन पहा आणि मग निचिंतीनं स्वाद घ्या. ( पोलिस इकडे तिकडे पाहत हात पुढे करतो. तेवढ्यात आतून इन्स्पेक्टर साहेबांची 'शिरसाऽट' अशी गर्जना ऐकू येते. तशी झटकन हात मागे घेत 'साऽब' अशी ओ देत शिरसाट लगबगीने आत पळतो. किसनही पाठोपाठ जातो. राघूशेट मंदपणे हसतो ) काय दरारा ठेवलाय या बच्चानं ! फकिरा, हाताखालच्या माणसांवर अशी जरब पाहिजे. नाहीतर लेको तुम्ही !

**फकिरा :** शेट, ही नव्याची नवलाई चार दिवस. पुढं पाहाल.

**राघूशेट :** फार दिवस वाट पाहण्यात अर्थ नाही फकिरा. रोज तक्रारी यायला लागल्या आहेत. हवा तंग करून टाकलीय त्यानं.

**फकिरा :** ( चाहूल घेत ) हुकूम कराल तर–

**राघूशेट :** इतकं टोकाला जायची काही गरज नाही. मी पाहून घेतो त्याला. तुझी माणसं तू नीट संभाळ. दोन घास सुखाचे पोटात जायला लागल्याबरोबर माज यायला लागलाय त्यांना. बोटं झडली तरी जरा बरं वाटायला लागल्याबरोबर तरण्याताठ्या पोरींच्या बरोबर हीरोगिरी सुचायला लागलीय हरामजाद्यांना.

**फकिरा :** नाही शेटसाब. एक धनाच तेवढा उल्लू निघाला. त्या पोरीसंगे पकडला तेव्हा जीव घेऊन पळाला, फरारी झाला. पण फरार होऊन होऊन जाईल कुठं ? मागावर माणसं ठेवलीत मी त्याच्या.

**राघूशेट :** ( खिशातून चांदीचं कानकोरणं काढून कान कोरीत ) तो दामलेमास्तर फरारी झालाय म्हणून सांगत होता हणमंत्या.

**फकिरा :** फरारी होईल नाहीतर काय करील ? किती दिवस अंधारात बसून राहील ? वाड्यातल्या बिऱ्हाडकरूंनी गिल्ला केला तशी बायकोनं जीव दिला. घरमालकांनी तगादा लावला तशी पोरीला टाकून हा पसार. पुलाखालच्या कमानीत रहातो म्हणे !

**राघूशेट :** ही पांढरपेशी झुरळे अशीच मरायची. पुलाखालच्या कमानीत सडत मरेल साला. पण माझ्या तळावर यायचा नाही. लाज वाटते ना! मला त्याच्या पोरीची काळजी पडलीय.

**फकिरा :** जानकी?

**राघूशेट :** होय जानकी.

**फकिरा :** तिलाही इस्पितळाच्या आवारातून हुसकायची खटपट चालू आहे म्हणतात.

**राघूशेट :** कशावरून?

**फकिरा :** हणमंतराव सांगत होते. ती भरारा फिरतेय आसरा शोधत नात्यागोत्याच्या माणसांकडे.

**राघूशेट :** कुणी दाराशी उभं करतो का तिला?

**फकिरा :** छा छा! त्याचं नाव काढू नका! एक दिवस नक्कीच आपल्या वाल्मीक-नगरात येणार ती— म्हणजे हणमंतराव म्हणत होता.

**राघूशेट :** हूं! यायलाच हवी ती.

**फकिरा :** फार खूबसूरत आहे लडकी शेटसाहेब.

**राघूशेट :** ( उसळून ) मला तिला अंगाखाली घालायची नाही आहे फकिरा, जबान संभाळून बोलत जा. सडलेला माणूस तू . . . तुला तरण्या पोरींची खूबसुरती खुपायला लागली काय? डोळे फोडून टाकीन काय समजला आहेस तू?

**फकिरा :** ( घाम फुटत ) गलती हुई . . . एकवार माफ करा शेट. मला तसं म्हणायचं नव्हतं. जानकीबाई अजून तरी धडधाकट आहेत असं—

**राघूशेट :** तुला काय म्हणायचं होतं ते बरोब्बर कळलंय मला. तुम्हाला धंद्याला लावून घेतलं ही माझीच गलती झाली. साले रस्त्यावर सडत पडला असतात म्हणजे दुनियादारी कळली असती तुम्हाला.

**फकिरा :** ( राघूशेटचे पाय धरीत रडत ) माफी, एकवार माफी करा शेट. पुन्हा नाही अशी गलती करणार अन्नदाता, क्षमा केली असं म्हटल्याबिगर——

**राघूशेट :** ( जरबेनं ) तमाशा पुरे झाला. तुझा—माझा बाप बसलाय तिथं. डोकं ठिकाणावर ठेव. [ फकिरा बाहीनं डोळे पुसत उठून उभा राहतो.] पोर चांगल्या घरची आहे, नर्सच्या धंद्यात शिकलीसवरली आहे. आपल्या नगरात दवापाणी करायला कामाला येईल, तिचंही भलं होईल. बाप महारोगी म्हणून फरार झाला तरी पोटाची खळगी भरायला हिला कोणाची रांड व्हावं लागणार नाही— एवढाच माझा हिसाब होता फकिरा.

**फकिरा :** पण शेटसाब, पढे—लिखे बाबू लोकांना हे शहाणपण कळत नाही. त्यांची जातच वेगळी.

**राघूशेट :** साल्या तुझी—माझी जात काय एक आहे फकिरा?

**फकिरा** : छा छः—भलतंच काय शेट ?

**राघूशेट** : अरे होय म्हण ! डरपोक साला. अरे तुझीमाझी जात एकच. जन्माने दिलेली नव्हे. सडलेल्या रक्तानं दिलेली. सारे महारोगी एकाच जातीचे; एकाच रक्ताचे, आज ती धडधाकट, बडी खूबसूरत दिसत असेल पण रक्त कधी दगा देणार नाही. तिलाही आज ना उद्या आपली जात सापडेलच.

[ तेवढ्यात आतून तरुण इन्स्पेक्टरसाहेब घाम पुसत येतात. पाठोपाठ किसन आणि दोन पोलिस येतात.]

**इन्स्पेक्टर** : ( येतायेताच ) हॅट्स ऑफ टु यू राघूशेट.

**राघूशेट** : ( जराही आसन न बदलता लाघवी स्वरात ) आधी बसा तर खरे साहेब, तुम्ही फार थकलात. काही थंड घेणार ? लिम्का ? मँगोला ? थम्सप ? फकिरा अरे फ्रीजमध्ये कोकाकोला आहे का पहा— पूर्वी घेऊन ठेवल्या होत्या बाटल्या. नाहीतर असं कर. साहेब, टिन्ड बिअर घेणार का ? अस्सल जर्मन माल आहे. म्हणजे परमिटवर खरेदी केलेला.

**इन्स्पेक्टर** : ( खुर्चीवर बसत ) राघूशेट. मला इथं काहीही घ्यायचं नाही.

**राघूशेट** : तुमचंही बरोबर आहे साहेब. तुमची नेकी मी जाणतो. तुमच्यासारख्या इमानदार अधिकाऱ्यांच्या बळावर आपला देश ताठ उभा आहे साहेब. मी आपल्याला संपूर्ण सहकार्य दिलंय हे आपण जाणताच. आपल्याला कुणीतरी खोडसाळपणानं चुकीची खबर दिली म्हणून आपण—

**इन्स्पेक्टर** : खबर चुकीची नव्हती राघूशेट, पण माझ्यापेक्षा तुम्ही फार हुशार ठरलात.

**राघूशेट** : (हसत) आम्ही व्यापारी माणसं. तुमच्यापुढं हो कसली हुशारी दाखविणार ? त्यातून पुन्हा ( दोन्ही हातांचे वाकड्या बोटांचे पंजे दाखवीत ) हे असे. म्हणजे तसा आता मी बरा आहे. बरा आहे म्हणूनच महारोग्यांना अन्नाला लावण्यासाठी थोडीफार धडपड करीत असतो पण कोणाकोणाला ते पाहवत नाही. म्हणून मग हे खोटेनाटे आरोप—

**इन्स्पेक्टर** : तरीदेखील राघूशेट, तुमच्या घराच्या कोठीच्या खोलीत—

**राघूशेट** : नामक्या गुळाच्या दोन गोण्या सापडल्या, मान्य आहे साहेब.

**इन्स्पेक्टर** : त्याबद्दल तुमचा काय खुलासा आहे ?

**राघूशेट** : खुलासा. ( हसतो ) सिगरेट तरी घेणार का साहेब ? बाकी मीच चुकलो या हातांचा स्पर्श झालेली सिगरेट तरी तुम्हाला कशी चालेल ? (खिशातून सोन्याची सिगरेटकेस काढीत) पण साहेब, माझ्या बोटांचा स्पर्श फक्त सिगरेटकेसला घडलाय, तोही हातमोज्यातून. आतल्या सिगरेटला नाही. या सिगरेटकेसमध्ये सिगरेटी भरून ठेवण्यासाठी तुमच्यासारखा अगदी पाक रक्ताचा माणूसच नेमून घेतलाय मी.

( सिगरेट शिलगावीत ) तरीपण माझा आग्रह नाही. पोलिस अधिकारी म्हणजे समाजाचे रखवालदार. त्यांना आमच्यासारख्या नासक्या रक्ताचा दुरूनदेखील स्पर्श नकोच. तर खुलासा. असं पहा साहेब, नासक्या गुळाच्या गोण्या तुम्हाला कोठीच्या खोलीत सापडल्या. त्यावेळीच हाक मारून तुम्ही मला विचारलं असतंत तर खुलासा केला असता. अगदी सरळ साधा खुलासा. पण तुम्ही– तुमचंही बरोबरच आहे. तुम्ही पंचनामा केलात. तर आता आमचं म्हणणं असं आहे– म्हणजे रागावू नका साहेब, जे काय व्हायचं ते सगळं रीतसरच होऊ द्या. काय? खुलासा मी वकिलामार्फत कोर्टातच देऊ शकतो.

**इन्स्पेक्टर :** ( उठत तीव्र शब्दांत ) राघूशेट मी तुम्हाला अटक करू शकतो.

**राघूशेट :** ( हसून ) बसा हो इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही आम्हाला अटक करू शकता. आम्ही जामीन देऊ शकतो. पण तुम्ही बुवा फारच गरम रक्ताचे आहात. नाही, एकप्रकारे तेही योग्यच आहे. पण थोडं तारतम्य... म्हणजे मागलापुढला थोडा पोच ठेवायला हवा. तुम्ही असं करा, तो फोन आहे... फकिरा, साहेबांना फोन लावून दे... तांदळेसाहेबांना एकदा विचारून घ्या. ते म्हणाले तर मला हातकड्या घालून घेऊन चला. काऽय? पण तुम्ही मला मारे इथाकीत अटक करून जायचे आणि साहेबांनी तुमचीच शोभा करून मला सोडून द्यायचं असं व्हायला नको. साहेब, तुम्ही नवीन आहात म्हणून सुचवतोय हो. एरव्ही–

**इन्स्पेक्टर :** राघूशेट, तुमच्या बोलण्याचा अर्थ न कळण्याइतका मी दुधखुळा नाहीये. ठीक आहे, येतो मी. शिरसाट, आपल्या लोकांना गाडीत बसायचा हुकूम दे. एक माणूसदेखील मागं रेंगाळता कामा नये.

**शिरसाट :** ( पाय आपटून सलाम करीत ) होय साहेब, ( जातो )

**इन्स्पेक्टर :** राघूशेट, तुम्ही इथलेच आहात. मीही आणखी काही वर्षं इथंच राहणार आहे. तुमची पाळंमुळं खणून काढली नाहीत तर–

**राघूशेट :** ( हसून ) अरे... अरे... तुम्ही फारच रागावलात. बरं य, नमस्ते, या आता. पण पुढल्यावेळी याल ते अधिक खबरदारीनं या बुवा. आणिक राघूशेटवर धाड घालण्यासाठी तरी या जागेवर आणि या गावात रहा. काय समजलात? ( खळखळून हसतो. )

[ इन्स्पेक्टरसाहेब पाय आपटीत तरातरा जातात. हणमंतराव कधीचे येऊन उभे आहेत. ते पुढे होत– ]

**हणमंतराव :** शेट–

**राघूशेट :** ( हात वर करीत त्याला थांबवून ) फकिरा, सगळे बिळातले नागोबा टोपलीत घालून त्या गारुड्यानं नेले का पहा आणि तशी वर्दी द्यायला ये. ( फकिरा जातो. ) बोला हणमंतरावजी–

**हणमंतराव** : शेटसाहेब, धना आलाय.

**राघूशेट** : ( प्रथमच रागाने ताठ बसत ) धना ? आलाय ? आपणहून आलाय की आपल्या माणसांनी त्याला पकडून आणलाय ?

**हणमंतराव** : नाही शेट .. तो आपणहूनच कधीचा येऊन बसलाय.

**राघूशेट** : बसूदे. मला तुमच्या कामगिरीची खबर हवीय. दामले मास्तर तुम्हाला भेटला?

**हणमंतराव** : होय शेट.

**राघूशेट** : कुठं भेटला ? पुलाखालच्या कमानीत ?

**हणमंतराव** : होय शेट.

**राघूशेट** : माझा अंदाज बरोबर ठरला. आणि जानकी ?

**हणमंतराव** : तीही तिथंच भेटली. बापाबरोबर खलबतं करायला आली होती. दवापाणीही देत होती.

**राघूशेट** : माझा निरोप दामले मास्तरना सांगितलात ?

**हणमंतराव** : होय शेट. सांगितला, पण तो म्हातारा मान खाली घालून स्वतःशीच काही पुटपुटत राहिला. म्हणून मग दुसरा निरोप जानकीला सांगितला. पण तिला आपला आसरा नकोय साहेब.

**राघूशेट** : तिला आपल्या धंद्याची आणि तिला कराव्या लागणाऱ्या कामाची कल्पना दिलीत ?

**हणमंतराव** : होय शेट. नाक उडवून ती म्हणाली, ‘ तुझ्या राघूशेटपेक्षा प्रसंग पडलाच तर मी विहिरीचा आसरा घेईन. ’

**राघूशेट** : ( रागाने ) नाकाचा शेंडा अजून फुटला नाही म्हणून ही नाक उडवण्याची मस्ती आहे. ते काही नाही हणमंत्या, जानकी इथं आलीच पाहिजे.

**हणमंतराव** : शेटसाहेब, ती अखेर इथंच येणार आहे. आपण थोडी वाट पहावी.

**राघूशेट** : नाही नाही... हणमंत्या, ती आज, या घटकेला आहे तशी धडधाकट, ताठ मानेची मला हवी आहे.

**हणमंतराव** : ते अशक्य आहे शेटसाहेब, ते अशक्य आहे...

**राघूशेट** : ( भडकून ) हणमंत्या, तू कुणापुढं बोलतो आहेस ? काय बोलतो आहेस ? अशक्य आहे म्हणून सांगायला तुला शरम नाही वाटत ? बाकी तुझंही ठीकच आहे. सडक्या रक्ताचा तू. शेजाऱ्याचा हात धरून तुझी बायको पळून गेली. ही तुझ्या रक्तातली जिद्द–

**हणमंतराव** : ( क्रोधानं कडाडत ) शेटसाहेब, तोंड सांभाळून बोला.

**राघूशेट** : ( क्षणमात्र त्याला न्याहाळत ) आहेस, थोडातरी माणूस उरला आहेस अजून... नुसताच रक्तमांसाचा गोळा झालेला नाहीस.

**हणमंतराव** : ( व्याकुळ होत ) शेट मला क्षमा करा . . . फक्त तेवढा एकच उल्लेख

पुन्हा कधी करू नका. कधीही करू नका. ( डोळे टिपतो. )

**राघूशेट :** ( विपण्णतेनं ) हणमंता, अरे आपण कमनशिबी म्हणून सडकं रक्त घेऊन निपजलो. तरीही कधीकधी मला एक उबळ येते. या झुरळांनी फेकलेलं सडकं अन्न खाऊन आपण लाचार तर झालो नाही ना, अशी मला अनेकदा शंका येते. म्हणून मग मी जवळच्या माणसांच्या जखमेवरची खपली कधीकधी अशी काढून बघतो, खरं म्हणजे मीच माफी मागायला हवी तुझी

**हणमंतराव :** ( गहिवरून ) छे छे: तसं नाही शेट.

**राघूशेट :** छोड दो. दामले मास्तर आणि त्याची छोकरी यांना कसं वळणावर आणायचं ते मीच पाहीन आता. [ फकिरा येतो. ] बोल फकिरा ?

**फकिरा :** शेटसाहेब, सगळे लोक गेले. खाकीतले आणि बिनखाकीतले.

**राघूशेट :** ( चांदीच्या कानकोरण्यानं कान कोरीत) तर मग फकिरा, धनाला आणून उभा कर पुढे. . .हणमंतराव, तुम्ही जिन्याखाली उभे रहा. किसन, तांदळे साहेबांना फोन लाव.

[ हणमंतराव आणि फकिरा जातात. किसन फोनवरील लांबलचक वायरचा रिसीव्हर राघूशेटच्या हाती आणून देतो आणि मग डायल फिरवतो. ]

**राघूशेट :** ( रिसीव्हरमध्ये ) नमस्ते जी . . . कोण ? . . .कॉन्स्टेबल हरिप्रसाद का रे ? तांदळे साहेब काय करतायत ? त्यांना फोन जोडून दे . . . आवाजावरून नाही ओळखलंस ? मी राघूशेट . . . हां थांबतो . . .

[ एवढ्यात फकिरा येतो. पाठोपाठ भेदरलेला धना. ]

**फकिरा :** शेट, धना आलाय.

**राघूशेट :** ( कान कोरत ) दोन पायांवर उभा आहे अजून ? अन्न खाऊन अंगाला फार खाज सुटली आहे का रे तुझ्या ?

**धना :** ( भेदरून ) पाया पडतो शेट चूक झाली. दया करा.

**राघूशेट :** किसन, फकिरा अरे बघत काय उभे राहिलात ? दया करा म्हणतोय ना तो ? कंबर फार वळवळायला लागलीय त्याची. [ फकिरा आणि किसन मोहरा करून त्याच्याकडे जाऊ लागतात. तो भेदरून मागे मागे सरत " नाही. . .नाही. . . नाही. . . मला मारू नका शेट. . . मला मारू नका . " म्हणून लटपटून गयावया करीत असतानाच—] मी तांदळे साहेबांना फोन लावलाय. किंचाळशील तर गळा घोटला जाईल. किसन, फकिरा तुम्हाला अकला आहेत की नाहीत ? धनाला तिकडच्या बंद खोलीत न्या आणि दार लावून घेऊन मग त्याच्यावर दया करा.

[ फकिरा आणि किसन धनाला फरपटत ओढून घेऊन जातात. क्षणार्धात त्याला तुडवल्याचा, बदडल्याचा आवाज आणि " ओऽय ओऽयऽऽ मेलोऽऽ मेलोऽऽ" अशा धनाच्या अस्फुट किंकाळ्या ऐकू येतात. तशी—]

मी फोन लावलाय फकिरा. त्याच्या तोंडात बोळा कोंबा अगोदर. [ मग घोपटल्याचा आणि तोंड दाबलेल्या हुंकाराचा आवाज येत असतानाच—] नमस्ते तांदळेसाहेब, गरिबावर फारच खप्पामर्जी झालीय तुमची . . . नाही नाही ते सगळं ठाऊक आहे हो . . . झडतीचा रिपोर्ट द्यायला तुमचे नवे साहेब येतीलच की . . . छे छे . . . मी काळजी करीत नाही . . . राघूशेट कुणाला भीत नाही साहेब . . . हां हांऽऽ कसं बोललात ! तर साहेब, या तुमच्या इन्स्पेक्टरसाहेबांना उचला . . . हो हो . . तावडतोब ! . . नाही नाही, हे काम तावडतोबच व्हायला हवं . . . मुंबईला तुम्ही फोन लावताय का मी लावू ? . . . नाही, तसं नाही साहेब, तुमच्याकडून हे काम होण्यासारखं नसलं तर मी वरून हुकूम आणू शकतो. पण तुमच्या इभ्रतीच्या दृष्टीनं तुमच्यातर्फेच हे काम झालेलं जास्त बरं. काऽय ? . . . (हसतो) हां. . .हां. . . हां. . .ते तुमचं तुम्ही पहा, पण त्याला तावडतोब उचला. . .नाही, माझी माणसं त्याला उचलतील पण मग त्याची बदली एकदम वऽर पाऽर अस्मानात होईल. (हसतो) घरी बायको असेल. कच्चीबच्ची असतील. म्हणून म्हणतो. . . ( हसतो ) . . . छे छे. . .माझ्या अपमानाचं काही नाही साहेब. लाजलज्जा, मानअपमान सगळं कोळून प्यायलोय मी. . नाही, माझी माफी वगैरे मागायला त्याला लावू नका. फक्त उचला. त्यात सगळं आलं. . .ठीक ठीक ! आणि काय ?. . .पाहुणे ?. . .मग स्कॉच पाठवू का ?. . .हे हे असं नाही तांदळेसाहेब, तुम्ही संकोच नाही करायचा. हक्कानं मागून घ्यायचं. उद्या संध्याकाळपर्यंत सगळा बंदोबस्त होईल. अगदी पक्का. . . ( हसून ) असं काय करता साहेब ? राघूशेटचा शब्द आहे तो. अच्छाऽऽ नमस्तेऽऽ [ रिसीव्हर बाजूला ठेवीत ] फकिराऽ धनाला घेऊन या. [ फकिरा आणि किसन रक्तबंबाळ धनाला फरपटत घेऊन येतात. त्याला पाहत—] येऽऽह ! आता कसा शोभतोय गब्रू. हीरोगिरी थंडगार झाली का रे तुझी सगळी ! त्या कोवळ्या पोरीला धरणारे तुझे हात जरा पुढं कर बाळा— [ धना भेदरून तुडवलेले हात पुढे करतो ] आयऽऽश्शी ! फकिरा, उचल त्याला. तळावर नेऊन सगळ्या माणसांना त्याला दाखवा. आणि मग गावाबाहेर सडकेवर कचऱ्याच्या पेटीजवळ द्या त्याला भिरकावून. [ फकिरा आणि किसन त्याचा लळालोंबा करून त्याला घेऊन जातात. हणमंतराव येतात राघूशेट रिसीव्हर त्याच्या हाती देतो. ते तो जागेवर नेऊन ठेवतात.] हणमंत्या, दोन दिवसांनी तळावर परत आणून टाक धनाला. दवापाणी पद्धतशीर. पण ते दोन दिवसांनी. ऊन, माती भरपूर खाल्ल्यावर. किती झालं तरी तो आपल्या राज्यातला कामगार आहे.

**हणमंतराव** : होय शेट.

**राघूशेट** : दामले मास्तरला आणि त्या जानकीला चार–आठ दिवसांत मी स्वतःच जाऊन भेटायचं ठरवलंय.

**हणमंतराव :** आपण स्वतः ? छे छे शेट—

**राघूशेट :** त्यावाचून मला दुसरा मार्ग दिसत नाही.

**हणमंतराव :** पण मला आश्चर्य वाटतं शेट, आजवर आपण मागितल्याशिवाय कोणाला कधी आसरा दिला नाही, आणि कुठची कोण ही पोर जानकी—

**राघूशेट :** ( भडकून ) हणमंत्या तू बुद्‌धू आहेस. अरे, ही जानकी त्या दामले मास्तरची पोर आहे आणिक—

**हणमंतराव :** कबूल आहे, पण दामले मास्तर तरी असे कोण लागून गेले की—

**राघूशेट :** ( कडाडत ) कोण लागून गेले ? सगळ्या गोष्टी उकलून सांगायला हव्यात तुम्हा लोकांना. हणमंत्या, चाळीस वर्षांपूर्वी, याच शहरात एका कामगारानं आपल्या बायकोला आणि आठ वर्षांच्या पोराला एक दिवस रस्त्यावर आणून फेकलं. कारण काय म्हणून विचारू नकोस. तेच. पांगळ्या, झडलेल्या आईला हातगाड्यावर घालून ते शेंवडं पोर भीक मागत रस्तोरस्ती फिरत असे. या. याच गावातले सगळे बगळे तिरस्कारानं माना वळवायचे, तुच्छतेनं थुंकायचे आणि गाडा जवळ आला की– 'दूर दूऽऽर... शिंच्या जवळ येऊ नकोस' म्हणून गुरकावयाचे. एक माणूस, फक्त एकच माणूस भाजीच्या पिशव्या खाली ठेवून आईच्या थाळीत नेमानं तरी पै-पैसा टाकायचा. तो हा दामले मास्तर. आणि तो हा—हा मी त्यावेळचा शेंवडा पोरगा राघू. समजलं ?

**हणमंतराव :** माफ करा शेट.

**राघूशेट :** हे कुठं बोललास तर मुंडी मुरगळीन. ( ओरडून ) सात वाजले, माल तयार झाला की नाही अजून ? दंगलऽ ? ( दंगल लगबगीनं येतो. )

**दंगल :** शेट, ड्रम घेऊन माणसं कधीची इथं खोळंबली आहेत.

**राघूशेट :** मग वाट कुणाची पाहता आहात हरामजाद्यांनो ? धंद्याची वेळ टळून गेली तर खाणार काय ? मातीऽ ? घेऊन ये. ( भराभर दोन तीन माणसे छोटे छोटे ड्रम्स घेऊन येतात. एक काकडा घेऊन राघूशेट एकेका ड्रममध्ये तो बुचकळून बाहेर काढतो. दुसरा माणूस काकडा पेटवतो. ज्वाला पाहून राघूशेट– "दोन नंबर... तीन नंबर... चार नंबर.... कंडम..." असा पुकारा करीत प्रत्येकवेळी पुढं केलेल्या पाण्याच्या भांड्यात काकडा बुडवून जाळ विझवून टाकतो. अखेर काकडा आपटत तो ओरडतो– ) हणमंत्या, एक नंबरची दारू स्कॉचपेक्षाही दुर्मिळ व्हायला लागलीय ! आपली माणसं पुरती सडली आहेत की भडभुंजे– झोपडीत नुसताच ऐशआराम करतायत ? मोरीत ओतून द्या हा सगळा माल. अरे राघूशेटच्या इज्जतीला साजेलसा माल कुणी आणून देणार आहे का नाही ?

[ आणि त्याचवेळी अंधार ]

**प्रवेश पहिला संपला**

# अंक पाहिला

## प्रवेश दुसरा

[ त्याच दिवशी सायंकाळी गाववस्तीपासून थोडे दूर बाप्पाजींच्या मळ्यावर पर्णकुटीमध्ये. पूर्वी हा भाग ओसाड आणि खडकाळ माळ होता. त्याचे मळ्यात रूपांतर करण्याची किमया बाप्पाजींची. एक चक्रम आणि विक्षिप्त माणूस म्हणूनच या माळरानावर अहोरात्र राबणाऱ्या बाप्पाजींची त्या काळी गावकऱ्यांनी संभावना केली होती. बाप्पाजी वर्षानुवर्षे राबले तेव्हा धरती माता त्यांना प्रसन्न झाली. थोड्याथोडक्या नव्हे तर चार विहिरींना भरपूर पाणी लागले आणि बाप्पाजींच्या भगीरथ प्रयत्नामुळे माळरानावर भाजीपाल्याची भरमाप पिके डोलू लागली. एव्हापावेतो बाप्पाजी चाळिशीला आले. त्यानंतर लग्न करून त्यांनी या पर्णकुटीतच प्रपंच थाटला. गोवर्धनदास हॉस्पिटलमधे बालविधवा म्हणून शांताक्का परिचारिकेचे काम करीत होत्या. त्या बाप्पाजींच्या पत्नी म्हणून पर्णकुटीवर आल्या. संसारी झाल्या तरी शांताक्कांनी नोकरी सोडली नाही. वर्षभरातच भाई जन्माला आला. तरीही शांताक्का हॉस्पिटलमध्ये काम करीतच राहिल्या. भाई पुष्कळसा बाप्पाजींच्याच अंगाखांद्यावर वाढला आणि या मळ्यातच लहानाचा मोठा झाला.

कायद्याची पदवी मिळून तो वकिलीच्या धंद्याला सुरुवात करतो तोच बाप्पाजी निवर्तले. मग वकिली सोडून मळ्याचा सगळा कारभार भाईलाच पहावा लागला. एव्हापावेतो शांताक्का हॉस्पिटलमधे मेट्रन झाल्या होत्या आणि त्यांच्या प्रेमळ-सेवाभावी वृत्तीचा खूपच बोलबाला झाला होता. भाई आजमितीला तिशींच्या जवळपास आला आहे. तरी देखील त्याने लग्न केले नाही. करायचा विचारही दिसत नाही. बापाप्रमाणेच भाईही विक्षिप्तच आहे. म्हणून मग शांताक्कांनीही फार हट्ट धरला नाही. भाई तसा कल्पक आहे, कष्टाळू आहे, पण बुद्धी स्थिर नाही आणि मन तसे कुठेही रमलेले नाही. एके काळी तो पट्टीचा धाडशी शिकारी होता. पण मग कुठे तरी बिनसले आणि शिकारीची बंदूक त्याने टाकून दिली. भाई चित्रकारही आहे. हुक्की आली तर दिवसचे दिवस चित्र-फलकासमोरून तो हालत नाही. गाण्याचा षोकही बऱ्यापैकी आहे. अलीकडेच नगराध्यक्ष आणि त्याचे एक जिगर दोस्त शिवरामदादा मोरे यांनी त्याला निवडून आणल्यापासून भाई नगरपालिकेच्या काम-

काजात मनापासून रमल्यासारखा दिसतो. वाचनाचे वेडही त्याला भरपूर आहे. आणि खूप काही गोष्टी त्याच्याजवळ आहेत पण आतून तो प्रचंड अस्वस्थ आहे कुठे तरी तो हरवला आहे. अलीकडे भाजीपाला मंडईत नेऊन स्वतः विकायला बसण्याचाही एक प्रयोग त्याने चालवला आहे. हाती घेईल ती गोष्ट अगदी टोकाला जाऊन करायची ही त्याची सवय. पण पाठ फिरवली की पुन्हा तिचे नाव नाही.

तर असा हा अवलिया बाप्पाजींच्या पर्णकुटीवर आज आपल्या आईबरोबर राहातो आहे. संगत-सोबत शेतावर राबणाऱ्या शेतगड्यांची, कारभारी मुरलीधर कापडी आणि जनावरे यांची. या पर्णकुटीतले दर्शनी दालन. पर्णकुटीच्या सगळ्या भिंती बांबू जोडून केलेल्या. दारे-खिडक्याही बांबूची बनवलेली. रंग गर्द विटकरी. आत एक चौपाई आणि बसायची आसने. ही आसनेही ओबडधोबड झाडांचे बुंधे छाटून तयार केलेली. एक ओबडधोबड जंगली लाकडांचे पुस्तकांचे शेल्फ. झाडांच्या फांद्या उचलून आणून थोडी काटछाट करून तयार केलेला चित्रफलकाचा स्टँड. एक चौपाई. त्यावर घोंगडी. त्यावर पसरलेली पुस्तके. एक टेलिफोन आणि एक प्लेयर. भिंतीवर शिकार चिन्हे, काही लँडस्केपच्या तसबिरी. कोपऱ्यात एक गाडगेमहाराजांचा तयार होत आलेला मेणाचा पुतळा. ही अर्थातच सगळी भाईची किमया. भिंतीवर फक्त तीन माणसांच्या तसबिरी लावल्या आहेत. बाप्पाजी, गांधीजी आणि दोघांच्या मधे चित्रचंद्रिका मीना कुमारी.

रंगमंच उजळतो तेव्हा उघड्या खिडक्यांतून मळ्याचे दर्शन घडते. पुढले दार उघडे आहे. पण या दालनात कोणीही नाही. फक्त टेलिफोन खणखणतो आहे. क्षणभराने आतून लगबगीने धावत येतो मुरलीधर कापडी. मुरलीधर पस्तिशीचा. कारभारी छाप वेश आणि मुद्रा. फोनपाशी जाऊन तो रिसीव्हर उचलतो आणि– ]

**मुरलीधर :** ( फोनमध्ये ) हॅलाव हॅलाव ... मी मुरलीधर कापडी. बाप्पाजींच्या मळ्यावरून बोलतोय... आ ? ... कोण शांताक्का तुम्ही होय ? आवाज मला जरा वेगळा वाटला म्हणून . भाई ? भाई अजून परतले नाहीत. मगाशी भेटले होते मला भांडेश्वर गल्लीत. म्हणाले आता फक्त मुंजाबाचा बोळ आणि ढमढेऱ्यांची बखळ तेवढी राहिली तेवढ्यांची संडास सफाई उरकून मळ्याकडं येतोच मी... एकटे ? एकटे का म्हणून ? बाकीचे भंगी होते की बरोबर... [ हे ऐकतच बाहेरून शिवरामदादा मोरे येतात. वेश पुढारी छाप. शिवरामदादा "तुझं चालू दे. मी बसतोय" असं खुणेनं मुरलीधरला सांगतात व चौपाईवर प्रशस्तपणे बसून पान तयार करू लागतात. दरम्यान मुरलीधर फोनमध्ये—] नाही नाही, भाजी घेऊन नेहमीसारखे भाईच गेले होते मंडईला पण... हां, तिथली मजा कळली ना तुम्हाला

...भाई काय म्हणणार ? थोडे चिडले, चरफडले बागवानांवर. एक लेक्चर झोडलं त्यांना आणि वैतागानं परत आले. हं... हं... हो... आता गुरं आली आहेत इतक्यात रानातून. शिदूला आणि श्रीपतीला धारा काढायला बसवतोय मी...हं... हां... ठीक आहे. तुम्ही येईपर्यंत सगळं तयार ठेवतो ( रिसीव्हर खाली ठेवतो ) नमस्ते शिवरामदादा, भाई आणि शांताक्का येतीलच एवढ्यात.

**शिवरामदादा** : येऊ देत सावकाश. मला काही खास गडबड नाहीये आज. पण काय रे मुरली, मंडईत काय मजा झाली आज ? सांग सांग... भाईची मजा मला सांगितलीस म्हणून तो काही उखडायचा नाही तुझ्यावर.

**मुरली** : मजा म्हणजे—' रोज भाजीच्या पाट्या घेऊन भाई स्वतः मंडईत जाऊन विकायला बसतात हे ठाऊकच आहे तुम्हाला—

**शिवराम** : मलाच का, उभ्या गावाला ठाऊक आहे. हा मागल्या जन्मीचा हरिश्चंद्राचाच अवतार रे. म्हणून सत्ययुगातल्या प्रमाणे माल घ्या आणि योग्य तो दाम पेटीत टाका ' म्हणून पाटी लावून बसतोय हा राजा. गिऱ्हाइकं याच्या बापाचं बारसं जेवून बसलीत. पेटीत दिडकी टाकतात आणि पाटीभर माल उचलतात— हीच तुझी मजा ना ?

**मुरली** : नाही हो दादा— यात कसली आलीय मजा ? आज सगळ्या बागवानांनी भाईंना मंडईत आल्या आल्या घेराव घातला. त्यांना बाजूला बसवलं आणि भाजीच्यापाट्या ताब्यात घेऊन रास्त पैका हातावर ठेवला म्हणाले रोज तुमचा सत्याग्रह तर आज आमचा सत्याग्रह—

**शिवराम** : यंव रे यंव ! या भाईला असाच कोणीतरी धडा शिकवायला पाहिजे, त्या शिवाय नाही याचं डोकं ताळ्यावर येणार. अरे हा नगरपालिकेचा उपाध्यक्ष, आरोग्य खात्याचा प्रमुख झाल्याबरोबर, भंग्यांनी तंटा काढला म्हणून यानं त्यांच्याबरोबर आठ न् आठ दिवस काय संडास सफाई करीत बसायचं ? अरे लोकांनी माझ्या— या नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या तोंडात शेण घालायचं बाकी ठेवलंय. तुम्ही घरातले लोक करताहात तरी काय ? नुसती गंमत बघताहात काय ? हे— हे— हे फार म्हणजे फारच झालं.

**मुरली** : शिवरामदादा, भाई कसे आहेत ते तुम्ही जाणता. तुम्ही त्यांचे बालमित्र. तुम्हाला ते जुमानत नाहीत तर आमचं कुणाचं हो ते काय ऐकणार ?

**शिवराम** : नाही नाही, ते चालणार नाही. आज मी शांताक्कांच्या समोर त्याला खडसावणार आहे की—

[ तोच बाहेर गलबल्यातले बोलणे ऐकू येते तशी— ]

**मुरली** : भाई आले बरं का शिवरामदादा.

[ असे म्हणत मुरलीधर बाहेर पळतो. शिवरामदादा पान तोंडात घालून तोबरा

चघळू लागतात. तेवढ्यात चार पाच भंग्यांशी बोलत भाई पाठमोरा दारात येऊन उभा राहातो. खाकी हाफ पँट, अंगात जर्सी, डोक्याला रुमाल बांधलेला. येता येता भाई म्हणतो— ]

**भाई** : ... हे असं नाही... असं नाही चालणार... या गप्पा आता नाही मी ऐकून घेणार. आज संडास सफाईचा माझा आठवा दिवस. तुमच्या बरोबर मी कामाला बाहेर पडतोय. तुम्ही झाडूपाटी खाली ठेवल्या क्षणीच मीही खाली ठेवतोय. माझं रोजचं काम संभाळून सकाळी मंडई, दुपारी कोर्ट, नगरपालिकेचं कचेरीकाम, सायंकाळी मळ्यातली देखरेख— हे सगळं संभाळून रोज किती संडासांची सफाई करतो मी ? तीस. जास्तच पण कमी नाही. काय रे रज्झाक ? खरं आहे ना बालाजी ?

**बालाजी** : साब आपण पढेलिखे बाबू आहात. आपली आमची कशी बरोबरी व्हायची ?

**भाई** : अरे वा रे वा ! बाबू लोक काय संडास सफाईत तरबेज असतात वाटतं ? मी तीस संडास साफ करू शकतो तर तुम्हाला वीसमुद्धा डोईजड होतात काय ? जरा रीतीनं बोला राव...

**रज्झाक** : लेकिन साब, बात ऐसी है—

**भाई** : आपकी बात मुझे सब मालूम है. ( आत येत ) हे पाहा, हे नगराध्यक्षच इथं बसले आहेत. त्यांच्या समोर सांगतो तुम्हा लोकांची कामाची तऱ्हा कशी आहे ती. तुम्ही आधी उन्हं डोक्यावर आल्यावर हळू हळू कामावर उगवणार. 'हा आला का रे . तो आला का रे ? ममद्या कुठं उकिरड्यात पडला ?...दगड्या कुठं गायब झाला– ही चौकशी. त्यात मग बिडी-काडी नाहीतर तमाखू मल्हारीची भागू कोणाचा हात धरून कशी पळून गेली ? जन्याला मटका कसा लागला ? यावर मग खमंग चर्चा. मग संडास सफाईला तुम्ही उठायचे. चार संडास साफ होईपोत्तर भोलाशंकरचा टी स्टॉल आलाच की वाटेवर. पुन्हा ठेल्यावर निचिंतीचं चा-पानी... मग दिवसभरात काम कशाला पुरं होतंय ?

**बालाजी** : असं नेहमी नाही होत साब...हां, कधी कधी एकेक टायमाला–

**भाई** : काही बोलू नका गुलामांनो. या आठ दिवसांत मी तुम्हाला पुरता ओळखून चुकलोय. रोज वीस संडासांची सफाई करायला तुम्हाला काहीही जड नाही. काम कमी होणार नाही. वाढवीत नाही हे नशीब समजा. चला, जा आता, घराला चालू लागा. तुमची महागाई मात्र वाढवून घेणार आहे .मी नगरपालिकेच्या पुढल्या बैठकीत.

**बालाजी** : तेवढं तरी कराच साहेब. गरिबावर फार उपकार होतील बघा.

**भाई** : ( उसळून ) हे–हे–हे मला आवडत नाही तुमचा महागाईभत्ता मी वाढवून देणार यात उपकार कसले ? ही लाचारी मला आवडत नाही. अरे काम करताना अंग चोरू नये. आणि दाम घेताना दिडकी सोडू नये. बालाजी, हे चित्रातले माझे

वडील, बाप्पाजी पाहा. कामाच्या वेळी कुचराई केली तर मळ्यातला ऊस काढून बदडून काढीत असत. कोणाला? शेतमजुरांना नव्हे. मला. पोटच्या पोराला. त्यांच्या कडक शिस्तीत वाढलोय मी. तेव्हा माझ्याशी गमज्या करू नका. समजलात ना, चला...निघा...[ सगळे भंगी जातात, मग ] मुरली, स्नानासाठी हंडाभर गरम पाणी काढायला सांग दादूला. आई अजून परतली नाही ना हॉस्पिटलमधून? दादा, आधी आंघोळ करून शुद्ध, पवित्र होतो आणि मग–[मुरलीधर आत जातो]

**शिवराम :** तेवढ्यासाठी हंडाभर गरम पाणी?

**भाई :** अरे हे भंग्याचं घाणेरडं काम युद्धजन्य पातळीवरूनच करायला लागतं. नाक मुठीत धरून नव्हे राजा, नाक ठार मारून. दिवसभर असं काम केलं म्हणजे आंघोळीची खरी किंमत कळते यार. बाकी तुला सांगण्यात काय अर्थ आहे म्हणाऽ आंघोळीच्या बाबतीत तू जुम्मे के जुम्मेवाला...

**शिवराम :** कळलंऽऽ, समजलं! आता आमच्यावर एक उपकार करा. आपल्या पादुका आणि झाडू आमच्या ताब्यात द्या.

**भाई :** कशाला?

**शिवराम :** नगरपालिकेत एक स्पेशल देव्हारा करून त्यात ठेवाव्यात म्हणतो मी या वस्तू. तेवढंच लोकांना पूजा करायला...

**भाई :** उगाच बकबक करू नकोस दोस्ता, एक दिवस खरीच वेळ येईल तशी. मी येईतोवर ही एक ठुमरी ऐक. जरा स्वरांच्या बरसातीत तरी न्हाऊन नीघ. [ स्वीच ऑन करतो. मधुर स्वरालापांनी वातावरण भरून जाते. "वा जी वाऽ" अशी दाद देत भाई आत पळतो. क्षणाक्षणाला शिवरामदादा कासावीस होतात. मोठ्या मुष्किलीनं ते थोडावेळ छळ सोसल्यासारखी ही संगीतबरसात सहन करतात, मग असह्य होऊन, उठून खिडकीतून पानाचा तोबरा थुंकून टाकीत माघारी फिरत– ]

**शिवराम :** एऽऽ, कोण तो हाऽ...अरे मुरलीधर... [ मुरलीधर येतो तशी–] अरे हा 'आ ऊ' चा धबधबा थांबव बाबा...डोकं फिरायची वेळ आली दोन मिनिटांत. काही लावणी बिवणी असली सिनेमातली तर ती लाव की गड्या. हे काय खडक फोडायचं चाललंय?

**मुरलीधर :** [ प्लेयर बंद करीत ) तेवढं बरीक सांगू नका दादा. भाईच्या कपाटात फक्त असल्याच कॅसेटस आहेत. रेडिओवर कोणी बिनाका गीतमाला लावली तरी भाई उखडतात एकदम.

**शिवराम :** असा कसा रे हा ओसाड वैरागी माणूस? उद्या लग्न झाल्यावर बायकोचे किती हाल करील हा?

**मुरलीधर :** म्हणूनच लग्न करीत नाहीत भाई...

**शिवराम :** मोठा अजब प्रकार आहे हा. तो एक दीडशहाणा नाही म्हणत असेल.

म्हणून शांताक्कांनी गप्प बसायचं ?

**मुरलीधर :** या शांताक्काच येताहेत (बाहेर पाहात) विचारा त्यांनाच. [ बाहेरून परिचारिकेच्या शुभ्र वेशात शांताक्का आणि पाठोपाठ जानकी येतात. शांताक्का पन्नाशीच्या, प्रेमळ, सात्विक. जानकी काळीसावळीच तरुणी पण तरतरीत मुद्रेची. तडफदार आणि अमळ फटकळ देखील. आल्या आल्या– ]

**शांताक्का :** भाई कुठाय ? तुम्ही केव्हा आलात शिवरामदादा ?

**मुरली :** भाई आंघोळीला बसलेत.

**शिवराम :** आलोय मघाच शांताक्का. तुम्हाला आणि भाईला एकदा निचिंतीनं भेटावं आणि सोक्षमोक्ष करून टाकावा म्हणून–

**शांताक्का :** कशाचा सोक्षमोक्ष ? मुरली, बाईंना चहा सांग आणि कामावरच्या गड्यांना इतक्यात सुटी करू नकोस. थोडं काम करून घ्यायचंय. ( मुरली जातो. ) बैस ग जानकी, अशी सासुरवाशिणीसारखी उभी नको राहूस बाई. ही कोण परकी माणसं नव्हत. हे शिवरामदादा मोरे, नगराध्यक्ष. पण इथं मात्र भाईचे लहानपणापासूनचे मित्र. आणि दादा, ही जानकी दामले. आमच्या हॉस्पिटलमध्ये माझ्या हाताखाली सिस्टर म्हणून काम करते. [ दोघेही औपचारिकपणे नमस्कार करतात. जानकी अवघडून बसते. ] हूं. दादा, कशाचा सोक्षमोक्ष करायचाय तुम्हाला ?

**शिवराम :** शांताक्का, भाईनं हे–हे–हे काय आरंभलंय ?

**शांताक्का :** तुम्ही दोघे बालमित्र. तुम्हालाच ते ठाऊक असायला हवं. तुमच्याशी काही सल्लामसलत—

**शिवराम :** सल्लामसलत ? भाई कधी कुणाशी सल्लामसलत करतो का ? धडाधड बॉंब टाकीत सुटतो. त्याच्याशी कसं वागायचं हेच कळत नाही.

**शांताक्का :** काही वाईट काम केलंय का त्यानं ?

**शिवराम :** आता वाईट म्हणजे काय सांगायचं ?

**शांताक्का :** वाईट म्हणजे पूर्वी तो दारू प्यायचा. पेल्यानं नव्हे अगदी पिपानं. तुमच्या संगतीत. ते त्यानं सोडलं. तुमचं मला ठाऊक नाही.

**शिवराम :** न .. नाही नाही... मी सुद्धा सोडलीय... म्हणजे बेतानं घेतो कधीमधी.

**शांताक्का :** पण ते वाईट. पूर्वी तो शिकार करायचा. मला ते आवडायचं नाही. देवानं माणसाबरोबरच या सृष्टीत जे पशुपक्षी निर्माण केले ते काही माणसाच्या करमणुकीखातर त्यांची शिकार बनण्यासाठी नाही. पण हे त्याचं त्यालाच कळून चुकलं. आताही तो जंगलात जातो. पण बंदूक घेऊन नव्हे, बंधुभाव घेऊन पूर्वीची शिकारीची वृत्ती वाईट होती, असं तोच म्हणतो आता. तसंऽऽऽ–

**शिवराम :** तुम्हीच सांगा शांताक्का, हे–हे मंडईत जाऊन भाजी विकायला बसणं आणि भंग्यांच्या ताफ्यात मिसळून आठ न् आठ दिवस संडास सफाइ करीत राहाणं, हे

शोभतं का याला? अहो नगरपालिकेचा उपाध्यक्ष-

**शांताक्का :** समजलं, पण भाईनं यात वाईट काय केलं ते सांगा की? ( तेवढ्यात मुरलीधर चहाचे कप ट्रे मध्ये ठेवून घेऊन येतो तशी– एक कप उचलून पुढं करीत ) घ्या, दादा आधी चहा घ्या आणि मग विचार करून सांगा.

**शिवराम :** आणि हे काय? भाईचा चहा?

**शांताक्का :** ( कप ज्याचा त्याला देत ) भाईचा चहा वेगळा होतोय. त्याला चहासुद्धा एक्स्ट्रॉ स्ट्रॅंग लागतो.

**शिवराम :** ( चहा घेत ) देवानं तुमच्या पोटी हा नगच मुळी एक्स्ट्रॉ स्ट्रॅंग पाठवून दिलाय.

**शांताक्का :** ते आई म्हणून मी ओळखलंय. पण मित्र म्हणून तुम्हाला कधी ओळखता आलं नाही. ( चहा घेऊन, क्षणभरच्या स्तब्धतेनंतर ) शिवरामदादा, तुम्हाला एक गोष्ट कधी कळली नाही. भाई म्हणजे एक भन्नाट वादळ आहे. एक दिशाहीन वादळ. म्हणून मी त्याच्या बाबतीत कधी मध्ये पडत नाही. भाई या बाबतीत अगदी त्याच्या वडिलांची दुसरी मूर्ती.

**शिवराम :** असला वादळी माणूस नगरपालिकेच्या राजकारणात टिकायचा नाही आणि आम्हाला परवडायचाही नाही, शांताक्का.

**शांताक्का :** त्याला त्या तसल्या राजकारणात तुम्ही ओढलात इथंच मोठी चूक झाली. तर आता चूक लवकर दुरुस्त करून टाका. जन्मवैरी होऊन दुरावण्यापूर्वीच तुम्ही त्याला निरोप द्या... मोकळा करा गोडीनं.

**शिवराम :** तसं नव्हे शांताक्का, पण हा वादळी माणूस थोडा तरी माणसाळायला नको का? आपण काही तरी करायला हवं.

**शांताक्का :** नेमकं काय करायला हवं?

**शिवराम :** सांगू? शांताक्का, तुम्ही भाईचं लग्न करून द्या आणि–

**शांताक्का :** ( हसून ) छाऽन! भाईसारख्या माणसाचं लग्न काय बळजबरीनं करता येतं?

**शिवराम :** शांताक्का, मला ठाऊक आहे भाई तुम्हाला किती मानतो ते. तुमचा शब्द मोडायची त्याची हिम्मत नाही.

**शांताक्का :** शक्य आहे. माझा शब्द मानून तो लग्नाला उभा राहील. पण असल्या भन्नाट वादळापुढं बायको टिकायला नको? तिसऱ्या दिवशी ती पळून जाईल.

**शिवराम :** आं? असं म्हणता?

**शांताक्का :** म्हणून म्हणते दादा, तुम्हाला तुमचा मित्र जेवढा कळला नाही, तेवढा मला, माझा मुलगा समजलाय. तुम्ही एकच लक्षात ठेवा. भाईच्या वडिलांच्या बरोबर वीस वर्षं मी संसार केलाय, तरवारीच्या धारेवर. घरी काही कमी नव्हतं.

सगळी समृद्धी होती. माणसंही तशी वाईट नव्हती. पण तरीही माझी नोकरी मी कधी सोडली नाही. तोच माझा आधार खराखुरा. तेव्हाही आणि आजही.

**शिवराम :** शांताक्का, तुम्ही काय बोलताहात ते मला समजत नाहीये.

**शांताक्का :** ( हसून ) तशी अपेक्षाही नाहीये माझी. मुद्दा एवढाच की तुम्ही भाईंचे मित्र असलात, तर फक्त मित्रच राहा. पण दुरून. फार जवळ जाऊ नका. हे वादळ तुम्हाला खरोखरीच परवडणारं नाहीये.

[ तेवढ्यात भाईच्या गाण्याची लकेर ऐकू येते. पाठोपाठ भाई येतो. अंगात झब्बा, पायजमा, टर्किश टॉवेलनं डोकं संपूर्ण झाकलेलं. डोकं खसखसा पुसत भाई येतो. येता येताना म्हणत असतो– ' दादा, तुला सांगण्यासारखा आज एक विलक्षण प्रकार घडला. ' आणि– ]

**भाई :** (सहज डोक्यावरून टॉवेल काढीत विस्मयानं) अरेऽ ! आई, तू केव्हा आलीस ?

**शांताक्का :** तू अभ्यंग स्नानाला बसला होतास तेव्हाच आलो आम्ही दोघी. हिची तुला ओळख करून देते. हा आमचा भाई. आणि ही–

**भाई :** सिस्टर जानकी दामले, बरोबर आहे ना ?

**शांताक्का :** म्हणजे काऽय ? तुमची दोघांची आधीच ओळख झालीय ?

**जानकी :** ( बावचळून ) छे छे. मी यांना आजच पाहतेय.

**भाई :** बरोबर आहे आई. आमची समोरासमोर ओळख अशी आजच होतेय. पण मी यांना आधीपासून ओळखतोय, यांचं एकदा एक स्केच देखील काढून ठेवलंय. ( शेल्फात शोधू लागतो )

**शांताक्का :** ते कधी काढलंस आणखी ?

**भाई :** ( स्केचबुक उलगडून दाखवीत ) हे बघ. [ शांताक्काच्या जवळ जाऊन जानकीही उत्सुकतेने बघते ] मी तुला भेटायला आलो होतो एकदा हॉस्पिटलमध्ये. त्या वेळी या हिरवळीवर नारळाच्या झाडाखाली एकट्याच विचारमग्न बसल्या होत्या. ती पोज मला आवडली म्हणून–

**शांताक्का :** ( स्केच बुक परत करीत ) बराच आहेस की रे !

**भाई :** ( स्केचबुक टाकीत ) किती बरा आहे ते मी माझ्या मनातलं मीराबाईचं चित्र काढीन त्यावेळी कळेल तुला.

**जानकी :** ( किंचित लाजून ) इश्यऽ .. काहीतरीच काय ?

**भाई :** स्केच काढलं आणि एका वॉर्डबॉयजवळ चौकशी केली तेव्हा यांचं नाव कळलं.

**शांताक्का :** बरं असू दे. ती काही शिळोप्याच्या गप्पा मारायला इथं आली नाहीये. तिचं काम आहे एक.

**भाई :** कोणतं काम ? [ तेवढ्यात मुरलीधर त्याचा चहा आणून देतो. तो घेत— ) तुमचा सगळ्यांचा झाला वाटतं ?

**शिवराम** : हो आम्हाला साधा चहा चालतो. तुमचं म्हणजेच सगळंच एकदम एक्स्ट्रॉ स्ट्रॉंग—

**भाई** : ही आईनं भलावण केली वाटतं माझी ?

**शांताक्का** : मी काय विचारतेय ते सांग आधी. आपल्या मळ्याच्या टोकाला तिसऱ्या विहिरीच्या मागं दोन खोल्या बांधल्या होत्या बघ यांनी... ध्यानधारणेसाठी बसायचे हे त्यावेळी—

**भाई** : बाप्पाजींच्या ध्यानाची कशाला आठवण देते आहेस तू ? सहा वर्षांपूर्वी तिथं धान्याची पोती लुटायला आलेल्या चोरट्यांशी मुकाबला घडला होता माझा. अजून जखमांचे वण आहेत माझ्या अंगावर.

**शिवराम** : खरं म्हणजे तू मरायचासच त्यावेळी.

**भाई** : अरे जा जा... भुरट्या चोरट्यांच्या हातून इतिश्री व्हायला जन्म घेतला नाहीये मी. मी होतो म्हणून त्यावेळी—

**शांताक्का** : पुरे. तो इतिहास झाला. या खोल्या कशा अवस्थेत आहेत सध्या ? कोणाला राहायला उपयोगी पडतील का त्या ?

**भाई** : पडतील तर काय झालं ? जरा साफसफाई करायला लागेल.

**शांताक्का** : मुरलीधर, आपली गडीमाणसं कामावरून सोडण्यापूर्वी खोल्या स्वच्छ करून घे आज.

**मुरली** : पण शांताक्का तिथं दिवाबत्ती देखील नाहीये...

**शांताक्का** : ती उद्या करून घेता येईल. पण—

**भाई** : कोणाला राहायला हव्या आहेत त्या खोल्या आई ?

**शांताक्का** : जानकीला. आपल्या वडिलांना घेऊन ती राहायला येणार आहे तिथं...

**भाई** : ( विस्मयानं ) तिथंऽऽ ? राहायला ? या ?

**शांताक्का** : तिचे काही प्रॉब्लेम्स आहेत. त्याबद्दल आपण नंतर बोलू. तुझी काही हरकत नाही ना ?

**भाई** : माझी हरकत असायचं काय कारण ? खोल्या मोकळ्याच आहेत. साफसफाई, दिवाबत्ती होऊन जाईल. पण आई, यांच्यासारख्या एकट्या दुकट्या बाईनं, वडिलांना घेऊनसुद्धा तिथं राहाणं, एवढी ती जागा सुरक्षित नाहीये.

**जानकी** : तशी मला कोणाचीच भीती वाटत नाही. आणिक काही धोका असलाच तर तो मला पत्करला पाहिजे.

**भाई** : तुम्ही एकदा ती जागा प्रत्यक्ष पाहून येता का ?

**जानकी** : पाहण्याची काही गरज नाही. चार भिंती आणि वर छत असलं म्हणजे पुरे.

**भाई** : पण त्यापेक्षा आई, मला वाटतं, आपल्या पर्णकुटीच्या मागं जे आऊट हाऊस आहे—

**जानकी :** नको नको... इतक्या जवळ नको.
**भाई :** सोबतीच्या दृष्टीनं म्हणतोय मी. म्हणजे—
**जानकी :** तरी सुद्धा नको. राहायला लांबच बरं.
**भाई :** मर्जी तुमची. पण मला अजून वाटतं—
**शांताक्का :** भाई ती म्हणतेय त्यात अर्थ आहे. तूतं काही दिवस तिला आपल्या वडिलांबरोबर तिकडं दूरच राहायला हवं. त्यांच्या सोबतीसाठी फार तर आपल्या सोनालीला तिथं ठेवू. ती नुसती गुरगुरली तरी चोरटे पळून जातील मागल्यामागं.
**भाई :** ठीक आहे. मुरली, त्या जागेची सगळी साफसफाई आजच झाली पाहिजे बरं का ? इलेक्ट्रिक फिटिंग खराब असलं तर उद्या दुरुस्त करून घे. आज तिथं रॉकेलचे दिवे ठेवून दे. कधी राहायला यायचं म्हणताहात तुम्ही ?
**जानकी :** म्हणत तर होते आज संध्याकाळीच यावं. पण—
**शांताक्का :** अगं मग ये की. आजची रात्र इथं राहा आणि उद्या.
**जानकी :** नको नको... मी उद्याच येईन. आले की सरळ तिकडंच राहायला जाईन. उद्या दुपारी ड्यूटी नाहीये मला. तेव्हा—
[ तेवढ्यात धावऱ्या धावऱ्या एक गडी येतो. ]
**गडी :** साहेब, बाहेर बघा, चला—
**भाई :** का ? काय झालं ?
**गडी :** एक माणूस रस्त्यावर गटारापाशी पडला होता, तो रांगत, खुरडत फाटकातून आत आलाय.
**भाई :** म्हणजे ? कोण आहे तो ?
**गडी :** विचारलं तर काही बोलतच नाहीये तो. नुसताच कण्हतोय तो !
**भाई :** मुरली, जाऊन बघ रे ही काय भानगड आहे ती.
[ मुरलीधर आणि गडी जातात ]
**शिवराम :** बघायचंय काय त्यात ? कोणीतरी टेर झोकून पडला असेल गटाराकडेला चांदण्या मोजीत.
**भाई :** यावरून आठवलं आई, मघाशी पावसाची सर येऊन गेली ना, त्या वेळी मुंजाबाच्या बोळात संडास सफाई चालली होती आमची. एक माणूस गटाराच्या कडेला असहाय स्थितीत पडलेला पाहिला मी. हात पाय झडलेले, अंगात त्राण नाही, डोळ्यात आळ्या—
**शिवराम :** शी शी शीऽऽ बोलू नकोस... सांगूच नकोस...
**जानकी :** शेवटच्या अवस्थेतला कुष्ठ रोगी.
**भाई :** एरवी माझं लक्ष गेलं नसतं. पावसाची सर जोरात तडातडा पडायला लागली तशी त्या मारानं तो हैराण होऊन तडफडायला लागला. दूर सरकता येईना की

पाऊस निवारता येईना. त्याला कशी मदत करावी हे मलाही कळेना. डोक्यावरल्या मैल्याच्या पाटीची नाही एवढी त्याची मला घृणा वाटली. कधी नव्हे ते भीतीनं माझे पाय लटपटले.

**शिवराम :** त्याचं कारण पहिल्यांदाच हा प्रकार पाहत असावास. अरे, मी तर रोज जाता येताना असले कुष्ठरोगी बघतो. भोसडीचे तीनतीनदा शहराबाहेर पिटाळले तरी पुन्हा पुन्हा भीक मागायला गावात घुसतात आणि कधीतरी पडतात एखाद्या गटारगाच्या कडेला मरेपर्यंत सडत.

**शांताक्का :** मग काय केलंस तू भाई ?

**भाई :** मी काय करणार ? मी स्वतः भिजत होतो. त्यात पुन्हा डोक्यावर मैल्याची पाटी—

**शिवराम :** अरे राम राम राम ! कोणी सांगितला होता हा नसता उद्योग ?

**भाई :** एक तरट पडलं होतं तिथं, ते उचललं आणि त्याच्या अंगावर टाकून पळालो मी तेथून.

**शिवराम :** बरं केलंस. माझ्या पोटात गोळा उठला होता, तू त्याला हातबीत लावायला धजावतोस की काय ? मी तर म्हणतो की या साल्यांना पिसाळलेल्या कुत्र्यासारख्या गोळ्या घालून ठारच—

**भाई :** ए दादा, अरे तो पिसाळलेला कुत्रा नव्हता, एक माणूस होता माणूस— तुझ्या माझ्यासारखा.

**शिवराम :** तुझ्यामाझ्यासारखा म्हणू नकोस. रक्तपिती फुटलेल्यांची जातच वेगळी. ज्यांना बरं करता येत नाही त्यांना जगत कशासाठी ठेवायचं ?

**जानकी :** त्यांना बरं करता येत नाही हे कोणी सांगितलं तुम्हाला ?

**शिवराम :** सांगायला कशाला हवं ? आपण बघतोच आहोत की ते. एक तरी महारोगी बरा होऊन पुन्हा माणसात आलेला दिसतोय का तुम्हाला ?

**जानकी :** त्याला कोण जबाबदार आहे ?

**शिवराम :** त्यांचं फुटकं नशीब ! दुसरं कोण असणार ?

**शांताक्का :** वा ! नगराध्यक्ष म्हणून तुमचं काहीच कर्तव्य नाही का असल्या कुष्ठ रोग्यांबद्दल ?

**भाई :** आहे की. गोळया घालून त्यांना ठार मारणं.

**शिवराम :** ए बाबा, म्हटलं म्हणून मी काही एवढा जंगली माणूस नाहीये पण माझ्या 'स्वच्छ आणि सुंदर' नगराच्या योजनेत मी महारोग्यांना काही या गावात पाऊल टाकू देणार नाही. त्यासाठी मी कायद्याची मदत घेईन; जरूर तर कायदा करून घेईन पण हे गदळ लोक माझ्या गावात नकोत. आयचची कटकट !

**भाई :** अरे मग त्यांनी जायचं कुठं ?

**शिवराम :** तो माझा प्रश्न नाही. ते सरकारनं आणि त्या लोकांनी पाहून घ्यावं. पण—
[ तेवढ्यात मुरलीधर येतो.]

**मुरली :** चांगलाच बदडलेला दिसतोय त्याला. धना नाव आहे त्याचं. राघूशेटच्या वाल्मीक नगरात राहातो म्हणे तो. राघूशेटच्या लोकांनीच मारहाण करून त्याला रस्त्यावर फेकून दिलाय.

**भाई :** म्हणजे ही पोलिस केस होणार. पोलिसांना कळवायला हवं.
[ असे म्हणत भाई, पाठोपाठ शांताक्का, जानकी दाराबाहेर जाऊन बघू लागतात. ]

**शांताक्का :** तो जखमी असला तर आधी प्रथमोपचार करायला हवा.

**शिवराम :** राघूशेटच्या तळावरला तो इसम असला तर तुम्ही कोणी त्याच्या भानगडीत पडू नका. पोलिस ढुंकूनही पाहाणार नाहीत त्याच्याकडं.

**शांताक्का :** ते नंतर ठरवू. मुरलीधर त्याला आधी आत तर—

**मुरली :** आत ? छे छे... ते कसं शक्य आहे ? राघूशेटच्या तळावरलं माणसं ही अशी (हाताची बोटं महारोग्यासारखी आत वळवून पंजे दाखवीत) असतात म्हणे.

**शांताक्का :** अरे निदान त्याला समोरच्या शेडमध्ये तरी आणून ठेव. धुळीत का त्याला प्रथमोपचार करायचा ? आपल्या माणसांना घेऊन जा आणि—

**मुरली :** आपली माणसं कोणी त्याला हात लावायला तयार नाहीत.

**जानकी :** ( आत येऊन छोटी बॅग उचलत ) ठीक आहे. मी जाऊन बघते शांताक्का. ( जाऊ लागते तशी )

**भाई :** थांबा, कदाचित कुष्ठरोगी असण्याची शक्यता आहे तो.

**जानकी :** माझे वडील कुष्ठरोगी आहेत. मला त्या रोगाची भीती वाटत नाही. (जाते)

**शांताक्का :** ( जाऊ लागत ) भाई, आपली कोणी माणसं त्याला हात लावायला तयार नसली तर तू पुढं हो.

**भाई :** ( गांगरून ) मीऽऽ ?

**शांताक्का :** तू त्याला नुसता शेडमधे आणून ठेवायला मदत कर आम्हाला. (थबकून) तुला तरी भीती वाटत नाही ना कशाची ?

**भाई :** ( गांगरून ) न... नाही. ब ..ब... भीती म्हणून नाही. पण आई मला वाटतं... म्हणजे मी म्हणतो.

**शांताक्का :** ( रागानं ) समजले. शौर्याच्या आणि धैर्याच्या सगळ्या बाताच होत्या तर तुझ्या ? भ्याड ! ( जातात )

**शिवराम :** बघत काय उभा राहिला आहेस मुरली ? जाऊन हुसक त्याला बाहेर आणि फाटक बंद करून घे आधी.

**भाई :** ( वज्राघात झाल्यासारख्या मुद्रेनं ) ते तुमच्या स्वच्छ आणि सुंदर नगरात जाऊन कर दादा. ( लगबगीनं जातो )

**शिवराम** : या लोकांची डोकीबिकी फिरली आहेत का रे मुरली ? कोणासाठी काय पणाला लावावं याचा काही पोच ? (उठून दाराबाहेर येऊन पाहून परत आत येत) अरे ही जानकी म्हणजे दामले मास्तराची मुलगी नव्हे ?

**मुरली** : कोण जाणे, पण बापाला घेऊन एवढ्या एकाकी, शुकशुकाट असलेल्या जागी ती कशी काय राहणार आहे कोणास ठाऊक.

**शिवराम** : ( टाळी वाजवीत ): अरे मला ठाऊक आहे. विचार. आत्ता लक्षात आलं. अरे बरोबर. ही त्या दामले मास्तराचीच मुलगी. कोठल्या कळलं का ? दोन महिन्यांपूर्वी हिच्या बापाला रक्तपिती फुटली म्हणून हिच्या आईनं विहिरीत जीव दिल्याची बातमी पेपरला आली होती बघ.

**मुरली** : म्हणजे त्या त्या तसल्या माणसाला घेऊन ती इथं राहायला येणार आहे ?

**शिवराम** : मग ऐकलंस काय तू मघाशी ? रानावनात मिळेल तिथं आसरा घेतल्यावाचून इलाज काय त्या बापलेकींना ? [ तेवढ्यात जड पावलानं भाई येतो, तशी ] का रे ? परत फिरलास ?

**भाई** : तो आधीच शेडमधे येऊन बसला होता. तिनं आम्हाला कोणालाच त्याला हात लावून दिला नाही.

**शिवराम** : उत्तम गोष्ट झाली. पण याचा अर्थ तो इसम कुष्ठरोगीच असला पाहिजे बरं का. त्या जानकीनं त्याला दवापाणी करावं हे.. हे ठीकच आहे. घरचीच सवय आहे की तिला...तिचा बाप कोण ते कळलं ना तुला ? अरे तो दामले मास्तर रे... शिकवणीला नव्हतो का जात मी त्याच्या घरी शाळेत असताना . त्यावेळी बरा दिसत होता की रे...

**भाई** : कुष्ठरोग झाल्याबरोबर, एखाद्या सद्‌गृहस्थाला अरे तुरे करून रस्त्यावरल्या धुळीत फेकावंच लागतं का दादा ?

**शिवराम** : अरे दुनियाच त्याची गृहस्थी ओरबाडून त्याला धुळीला मिळवते, माझं काय घेऊन बसलास ? तू खरोखरीच त्या दामले मास्तरला आणि त्याच्या मुलीला या मळ्यावर राहायला जागा देणार आहेस भाई.. ?

**भाई** : तुला ठाऊक आहे दादा, आईनं त्यांना शब्द दिलाय.

**शिवराम** : आईनं शब्द दिला म्हणून काय झालं ? तुला तुझं म्हणून काही मत आहे की नाही ?

**भाई** : नाही. दादा मी एक भ्याड माणूस आहे. तुझ्यासारखाच. आणि भ्याड माणसाला मतं असू शकत नाहीत. भ्याडाला असतो फक्त बापुडवाणा जीव, आणि तो घेऊन पळून जाणारे पळपुटे पाय.

**शिवराम** : हे बघ, असल्या बाबतीत मला कोणी भ्याड म्हणालं, तर मी मुळीच मनावर घेत नाही. अरे महारोगासारख्या माणसातून उठवणाऱ्या रोगापुढं कसलं

कपाळाचं शौर्य दाखवणार आहात तुम्ही? प्रसाद मिळाला तर भरल्या घरातून उठून, पुलाच्या खालच्या कमानीत, भिकेवर आयुष्य कंठावं लागेल– ठाऊक आहे?

**भाई :** म्हणून मग घाबरून मी त्यांना पुलाखालच्या कमानीत रहायला पाठवू का? उद्या तुझ्या एखाद्या जवळच्या जिवाभावाच्या माणसाला असला रोग जडला तर तू काय त्याला–––

**शिवराम :** अरे माझ्या जवळच्या आणि जिवाभावाच्या माणसाची गोष्ट काय घेऊन बसलास बाबा, उद्या मला कुष्ठरोग झाला तरी सुद्धा, मला पुलाखालच्या कमानीतच खितपत पडावं लागेल. दुनियेची रीतच आहे तशी. त्याला कोण काय करणार?

**भाई :** असली अमानुष रीत बदलायलाच हवी. आईनं घेतला तो निर्णय बरोबरच होता.

**शिवराम :** तुला कधी कोणत्या बाबतीत व्यवहार कळला होता म्हणून या बाबतीत कळावा? ( उठत ) ठीक आहे. मर्जी तुझी. तुमच्या मळ्यावर पाच-पंचवीस माणसं रात्रंदिवस राबतात तेव्हा भाजीपाला उगवतो आणि मंडईपर्यंत पोचतो. ही माणसं मळा सोडून निघून गेली तर काय होईल–

**भाई** . ( रागानं उठत ) दादा तू मला धमकी देतो आहेस आणि धमकीला मी कधी भीक घालीत नाही हे–

**शिवराम :** धमकी वगैरे काही नाही. मी फक्त तुला व्यवहाराचं भान ठेवायला सांगतोय तेही तू माझा मित्र आहेस म्हणून. येतो मी. ( जातो )

**भाई :** मुरलीधर, अगोदर माणसं लावून विहिरीजवळच्या खोल्या स्वच्छ करून घे.

**मुरली :** भाई मला वाटतं–

**भाई :** उं हूंऽ! तुला काहीही वाटायची गरज नाहीये. जा अगोदर. [ मुरलीधर नाराजीने जातो. भाई विचारतंद्रीतच क्षणमात्र उभा राहातो. मग मनातला धुमसणारा प्रक्षोभ एकाएकी शब्दांतून फुटू लागतो. ]

**भाई :** काही, काही, एक खरं नाहीये. तो माणुसकीचा गहिवर, तो दुःखितांचा कळवळा, ती अन्यायाची चीड, दंड थोपटून उभं राहाण्यातलं ते धैर्य, कुठे तरी झोकून देण्यातली ती बंडखोरी— सगळं खोटं, सगळं खोटं. नुसतेच नकली मुखवटे! जरा जमीन हादरताच धडाधड पायाशी ओघळून पडणारे फक्त मुखवटे! खरं एकच आहे. तरटाचे दान दुरून भिरकावणारे ते ढोंगी हात आणि जीव घेऊन पळून जाणारे भित्रे पाय. दान घेणाऱ्याला तर नादान करतंच पण देणाऱ्याच्याही पदरात टाकतं एक केविलवाणं, कोडगं, भ्याड समाधान. होय होय . . . मी भ्याड आहे, यात शंकेला देखील आता जागाच उरली नाही.

असं म्हणतात की, जंगलात, समोरासमोर, डिवचलेल्या वाघाला अंगावर घेऊन त्याची शिकार करताना, मी कधी घाबरलो नव्हतो. असंही ऐकिवात आहे की. घरात घुसलेल्या दरोडेखोरांशी झुंज घेताना, प्राणांतिक जखमा झाल्या तरी मी

डगमगलो नव्हतो. पण या निव्वळ दंतकथाच असव्यात. एरवी चिखलात गटारापाशी पडलेला तो असहाय जीव पाहून माझे पाय का लटपटले ? मला एवढं कशाचं कापरं भरलं ? कधी नव्हे तो, घृणेनं मी स्वतःवरच का गिळगिळलो ? तरटाच्या टीचभर तुकड्याखाली मी नेमकं काय दडवलं ? त्याचा ओंगळ देह की माझा किळसवाणा थरकाप ? प्रत्यक्षात घडलं ते एवढंच, की तो झाकला गेला, पण स्वतःसमोर माझा मी मात्र उघडा–नागडा पडलो.

अरे ही करवती कानस आत आत काय छिलत चाललीय ? माझ्या आत्मविश्वासाचा कणा की या कण्यावर गोळा झालेला भयाचा गंज ? एक तर खरंच, अस्सल निर्भयता, ही क्षणाचं उसनं अवसान आणून अंगात बाणत नाही. ती रक्तात भिनायला साधनाच करावी लागते. शूर माणूस एकदाच मरतो. भ्याड रोजच मरतो; भीतीनं क्षणाक्षणाला मरत मरत राहातो. भयाच्या काळ्याकभिन्न गुहेत छातीठोकपणे घुसल्याशिवाय या डाकिणीपासून सुटका नाही. तर मग— कुष्ठ रोगाला टाळून नव्हे, तर सरळ भिडून आणि भेदूनच ही अभय साधना केली पाहिजे. ‘ भ्याऽड ’ या एकाच जळत्या शब्दाचा, आई, तू मला डाग दिलास आणि काय चमत्कार... त्याक्षणी माझा पुनर्जन्म झाला. माझ्या अभयसाधनेला या क्षणापासून तर प्रारंभ होत नसेल ?

[ विचारात हरवलेला असतानाच मुद्रेवरला प्रक्षोभ मावळतो आणि पहाटेची प्रसन्नता उजळते. त्याच वेळी अंधार. ]

## प्रवेश दुसरा संपला

# अंक पहिला

## प्रवेश तिसरा

[पर्णकुटीचे तेच दालन. सुमारे आठ–दहा दिवस उलटले आहेत. वेळ सकाळी नऊ दहाची. रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा प्लेयरवर गाणे चालू आहे आणि भाई चित्रफलकावर जलरंगात काम करण्यात गुंतला आहे. वेश घरगुती. क्षणभराने बाहेरून मुरलीधर येतो. त्याची चाहूल लागताच भाई प्लेयर बंद करतो. पण तो चित्र-फलकावरची नजर काढीत नाही, की काम थांबवीत नाही. क्षणभर मुरलीधर चुळबूळ करतो, तशी ]

**मुरली :** भाई—

**भाई :** ऊंऽ ? बोल माझं लक्ष आहे. मी ऐकतोय. ( वाट पाहून, वर पाहात ) बोल ना ?

**मुरली :** ( घुटमळत ) बोलायचं म्हणजेऽऽऽ... कामगारांनी असं ठरवलंय... म्हणजे... सगळ्या कामगारांचं असं म्हणणं आहे.. म्हणजे त्यांना असं वाटतंय—

**भाई :** एवढं घुटमळायला काय झालं तुला ? स्वच्छ सांग ना, आपल्या सगळ्या कामकऱ्यांना दामले मास्तर आणि जानकी आपल्या शेताच्या आवारात राहायला नको आहेत. मी त्या दोघांना इथून हुसकून लावलं तरच ते लोक शेतात या पुढं काम करायला तयार आहेत.

**मुरली :** ( गडबडीनं ) असं नाही... असं नाही. . म्हणजे अगदी हुसकूनच लावायला हवं असं नाही . . . तरी पण, त्यांनी तरी इथं कशाला राहायचं ?. . . नाही म्हणजे, पाचं–पंचवीस झोपड्या सुखानं नांदताहेत इतकी वर्षं—

**भाई :** त्यांना काय उपद्रव होणार आहे त्या दोघांचा किंवा त्या धनाचा ? त्यांची राहायची जागासुद्धा पार दुसऱ्या टोकाला आहे. त्यांचा चुकूनसुद्धा संपर्क यायची शक्यता—

**मुरली :** नाही नाही, ते सगळं बरोबरच आहे. तशी त्यांची झोपडी लांब आहे, त्यांचा वावरही परस्पर तिकडच्या तिकडं होतो; आपल्या माणसांच्या झोपड्याकडं चुकून सुद्धा ते कधी फिरकत नाहीत. . ते ते सगळं खरं आहे—

**भाई :** मग आता आणखी काय राहिलं ?

**मुरली :** तरी पण सगळ्यांना वाटतंऽऽ

**भाई :** काय वाटतं ?

**मुरली :** ना... नाही म्हणजेऽऽ कशाला उगीच ? म्हणजे कळून सवरून गंजीजवळ निखारा ठेवाच कशाला ? नाही तसा एकदम फार मोठा धोका आहे म्हणत नाही कोणी... पण म्हणजे–

**भाई :** याचा अर्थ आपल्या कामकऱ्यांना एकत्र जमवून काल तासभर मी केलेली बडबड वाया गेली म्हणायची. अरे या कुष्ठरोगाबद्दल जी माहिती मी सांगितली ती काही माझ्या पदरची नव्हती. तो पुस्तकांचा गठ्ठा पाहिलास ? गेले आठ दिवस वाचतोय मी हे ग्रंथ आणि तरी देखील–

**मुरली :** छे छेऽऽ... ते सगळं अगदी बरोबरच आहे. तसं तुम्ही जे जे सांगितलंत ते सगळ्यांना पुरेपूर पटलंय. कोणालाही त्याबद्दल कसली म्हणून शंका उरली नाहीये तरी पण सगळ्यांचं मत मत मात्र असं आहे... कीऽऽ नको बुवा ! उगाच कशालाऽऽ ?

**भाई :** अस्संऽऽ ! ( क्षणमात्र कामात मग्न. मग काम करता करतानाच ) दामले मास्तरांना मी इथं ठेवून घ्यायचं असंच ठरवलं तर आपली गडीमाणसं काय करणार आहेत ?

**मुरली :** तसं काय... ते नोकरी सोडून जातील. कष्टानं पोट भरणाऱ्या माणसांना काय, कुठंही काम मिळेल. शिवरामदादा सुद्धा त्यांना आपल्या शेतावर अगदी आनंदानं ठेवून घेतील.

**भाई :** आच्छा ! म्हणजे इथवर सगळं ठरलंय तर ?

**मुरली :** तशी आपल्याला सोडून जायची कोणाची इच्छा नाहीये भाई.

**भाई :** पण मी हट्ट सोडला नाही तर काय करायचं त्याची तयारी अगदी जय्यत करून ठेवलीय– असंच ना ?

**मुरली :** मला विचाराल तर तशी काही बहुतेक पाळीच यायची नाही. दामले मास्तर आणि जानकीबाई, आपण होऊनच सोडून जायच्या विचारात आहेत. म्हणजे त्यांच्या कानांवर ही कुरबूर गेली तेव्हा–

**भाई :** ( रागानं ) हा लांडा कारभार कोणी केला ? आपल्यापैकी कोणीतरी जाऊन बोललं असलं पाहिजे त्यांना.

**मुरली :** ते काही मला बुवा ठाऊक नाही, पण–

[ हे ऐकतच शांताक्का येऊन उभ्या राहतात.]

**भाई :** हे बघ मुरली, ते तसलं काही होणार नाही. मी होऊ देणार नाही. आईला आवडायचं नाही. दामले मास्तर आणि जानकी इथंच राहतील. आपल्या

गडीमाणसांना तेवढ्यासाठी इथं राहायचं नसेल तर—

**शांताक्का :** भाई—

**भाई :** थांब आई, तू मधे बोलू नकोस. आपली माणसं काम सोडून केव्हाही खुशाल जाऊ शकतात. मात्र मला त्यांचा निर्णय ताबडतोब कळला पाहिजे. ते जायचंच म्हणाले तर झाल्या दिवसांचा सगळ्यांचा पगार तात्काळ देऊन मोकळं करून टाक तू त्यांना. तेवढी रोख रक्कम आहे ना तिजोरीत ?

**मुरली :** होय भाई.

**भाई :** ठीक आहे. जा. तू. [ मुरलीधर निघून जातो. मग—]

**शांताक्का :** इतक्या निकरावर येऊन त्यांना दमदाटी करायची गरज होती का भाई ?

**भाई :** ( कुंचला उचलीत ) दमदाटी त्यांनी केलीय आई, मी नव्हे. दमदाटीपुढं मी कधीही मान तुकवणार नाही, एवढंच बजावलंय मी त्यांना. आजचा भाजीपाला सुद्धा काढला नाहीये अजून त्यांनी.

**शांताक्का :** ते समजलं मला म्हणून डे ऑफ घेतलाय मी आज हॉस्पिटलमध्ये.

**भाई :** तू डे ऑफ घेऊन काय फरक पडणार आहे ?

**शांताक्का :** अरे ती अडाणी, जिवाला घाबरणारी माणसं. तुझ्यासारखी शिकलीसवरलेली धीट माणसं देखील प्रसंग अंगावर आला की पाय लटपटून माघार घेतात, मग—

**भाई :** आई ते एकदाच घडलं. त्याची शरम वाटतेय मला. सगळं समजून घेतल्यावर आता मी कधीही भिणार नाही. रोग्याला आणि रोगाला देखील.

**शांताक्का :** तसंच त्या अडाणी माणसांना रोगाचं रूप कळेल तेव्हा ती सुद्धा भ्यायची नाहीत. माणसं दुष्ट नसतात रे भाई, ती दुबळी असतात, कारण ती अज्ञानी असतात.

**भाई :** इतकी ती सरळ, साधी— भोळीभाबडी माणसं आहेत असं समजू नकोस तू आई. मी त्याचं म्हणणं मान्य करणार नाही हे जाणून त्यांनी आधीच दोन हात खाली सुरुंग भरून ठेवलाय.

**शांताक्का :** म्हणजे ?

**भाई :** परस्पर दामले मास्तरांना भेटून ' तुम्ही इथं राहू नका ' म्हणून त्यांना सांगून आली आहेत ही माणसं. धनाला तर कोणीतरी धाकदपटशा सुद्धा दाखवला होता काल. धनाच सांगत होता मला.

**शांताक्का :** तसलं काही मात्र मुळीच चालायचं नाही.

**भाई :** आणि हा मुरली मला सांगतोय की दामले मास्तर आणि जानकी बहुतेक आपण होऊनच सोडून जातील. सणकच शिरली माझ्या डोक्यात हे ऐकून. असला काही आगाऊपणा या लोकांनी जाऊन केला असला तर कोणता स्वाभिमानी माणूस इथं राहील ग ?

**शांताक्का** : पोलादी कण्याची माणसंसुद्धा मोडून पडावीत असला प्रसंग आलाय त्यांच्यावर. आता इथून जायचं म्हटलं तरी वडिलांच्या या अशा अवस्थेत जानकी कुठं घेऊन जाईल त्यांना ?

**भाई** : या अशा अवस्थेत म्हणजे ? दामले मास्तरांच्या बायोप्सीचे रिपोर्ट्स आले का ?

**शांताक्का** : ( गंभीरपणे ) हूं.

**भाई** : काय आहेत रिपोर्ट्स ? पॉझिटिव्ह ? [ शांताक्का मानेनं होय म्हणतात ] लेप्रोमॅटस ?

**शांताक्का** : नाही. पण बॉर्डरलाइनवर आहेत. काही दिवस तरी त्यांनी एकट्यांनीच आहे तिथं राहायला हवं. जानकीला मी आपल्याकडं ठेवून घ्यायचं म्हणतेय.

**भाई** : धनाची काय अवस्था आहे ?

**शांताक्का** : पुष्कळ वर्षं औषधं घेतोय तो. त्यामुळं तो बरा झालाय. त्याची बर्न्ट औट केस आहे. बोटं झडली असली तरी तो आता निर्दोष आहे.

**भाई** : हे रिपोर्ट्स कळल्यावर तर आमची कामकरी माणसं अगदी हलकल्लोळ उडवतील.

[ हे ऐकतच बाहेरून जानकी येते आणि–]

**जानकी** : उडवतील नव्हे, उडवलाच आहे. पण भाई आम्ही तुम्हाला अडचणीत टाकू इच्छीत नाही. आमचा राग नाही. तुमची परिस्थिती आम्हाला कळू शकते.

**भाई** : पण म्हणजे काय ? माझ्या जमिनीवर कुणी राहावं त्याचे निर्णय माझी कामकरी माणसं ठरवायला लागली का ?

**शांताक्का** : जानकी कोणी काही म्हणालं असलं तरी तुम्ही आता तर इथून मुळीच जायचं नाही. माझी शपथ आहे तुला.

**जानकी** : एवढी कळवळून शपथ घालायची गरज आहे का शांताक्का ? इथून बाहेर पडल्यावर आमच्यापुढं काय वाढून ठेवलंय त्याची मला कल्पना नाहीये का ? पण तुम्ही बाबांना सांगा. ते तुम्हाला भेटायला आलेत.

**भाई** : बाबा आलेत ? कुठं आहेत ते ?

**जानकी** : बाहेर उभे आहेत ते.

**शांताक्का** : इश्यऽ, बाहेर काय म्हणून ? [ भाई आणि शांताक्का दाराशी जात "हे काय ? तुम्ही बाहेर थांबलात ? या मास्तर, आधी आत या आणि मग बोला. . ." असे म्हणतात. तशी दामले मास्तर संकोचानं आत येत दाराशीच उभे राहतात– ] आत या नाऽ

**दामले** : नको. उंबरा ओलांडून आत आलो हेच फार झालं. माझे रिपोर्ट्स समजल्यावर तर मी इथं येणंही बरं नाही. तुमच्या माणसाची तक्रार रास्त आहे. मी हा मळा सोडून जायला तयार आहे पण. . .

**शांताक्का :** त्याची काही गरज नाहीये मास्तर, तुम्ही राहाताहात तिथंच सुरक्षित आहात. सगळयांच्याच दृष्टीनं. तुम्हाला पुरतं बरं वाटेपर्यंत जानकीला मात्र मी इथंच ठेवून घ्यायचं ठरवलंय.

**दामले :** शांताक्का, मला आता माझी काळजी उरली नाही. जगण्याचे सगळे सोहाळे पाहिले. इथं काय आणि पुलाखालच्या कमानीत काय, मरायचा धीर होत नाही तोवर दिवस कंठायचे.

**जानकी :** असं का बोलता बाबा तुम्ही ? मी तुम्हाला बरी करणार आहे.

**दामले :** त्यात काही तथ्य नाही. बरी करशील तू मला. कदाचित. पण माणसात परत कशी आणशील ? त्याची मी आशा धरून नाहीये आता.

**भाई :** दामले मास्तर तुम्हाला परत माणसात आणण्यासाठीच धडपड चाललीय आमची, हे तुम्हाला दिसत गाही का ?

**दामले :** दिसतंय मला... सगळं सगळं कळतय मला. फार फार उपकार आहेत तुमचे माझ्यावर

**शांताक्का :** ही उपकाराची भाषा मला आवडत नाही मास्तर.

**दामले :** नाही नाही. तुम्हाला न आवडणारी उपकाराची भाषा नाही काढत मी. हात जोडतो शांताक्का, फक्त जीव राहावत नाही म्हणून एकच विनंती करतो— या पोरीला उजवून टाका. बऱ्यापैकी स्थळ असलं तरी चालेल. गरीबीत देखील ती संसार—

**जानकी :** हे काय बाबा ? माझ्या लग्नाची जिम्मेदारी तुम्ही यांच्यावर काय म्हणून टाकता ? माझी मी समर्थ नाही ? हे हे मला आवडत नाही. आज प्रसंग कोणता आहे आणि—

**दामले :** बरं बेटी. चुकलं माझं नाही बोलत मी काही.

**शांताक्का :** कोणाचं काही चुकलं नाही मास्तर, मला सगळं समजतं, सगळं लक्षात येतं. मला जसा माझा भाई, तशी दुसरी जानकी. भाईनं लग्नच करायचं नाही असं ठरवलं नसतं तर मी तिलाच सून करून घेतली असती. तरी पण काही हरकत नाही. मी तिच्यासाठी उत्तम स्थळ पाहीन आणि तुम्ही खडखडीत बरे झाल्यावर तुमच्या डोळ्यासमोरच तिचं लग्न लावून देईन— मग तर झालं ?

**भाई :** तुम्ही फक्त आपल्या औषधोपचाराची काळजी घ्या. तुम्हाला इथून दुसरीकडे कुठंही आसरा शोधत जायची गरज नाही. कोणीही अगदी देव आडवा आला तरी—

[ तोच धना धावऱ्या धावऱ्या येतो आणि भाईच्या आणि शांताक्कांच्या पायाशी लागत— " भाई मला वाचवा... शांताक्का मला वाचवा... " अशी गयावया करू लागतो तशी— ]

**भाई :** ( त्याला उठवत ) अरे अरे... एवढं घाबरायला काय झालं तुला धना ?

**धना :** तो सैतान आलाय. नक्कीच मला पकडून घेऊन जायला तो आलाय. तुम्ही नाही ना मला त्याच्या ताब्यात देणार ?

**शांताक्का :** कोण आलाय ? कोण तुला पकडून नेणार आहे धना ?

**धना :** राघूशेट ( गडबडीनं दाराशी धावून डोकावत ) अरे बापरे... हा काय... चांडाळ आलाच. बरोबर दंगल, किसन आणि हणमंतरावही दिसताहेत म...म... मला नाही जायचं... मी इथून जातो पण मला त्याच्या ताब्यात देऊ नका भाई... तो तो म... मला जिवे मारील...

**शांताक्का :** तुला पकडून जिवे मारायला ही काय मोगलाई आहे ? भाई, हा कोण, कोठला रे राघूशेट ?

[ हे ऐकतच राघूशेट येतो आणि उंबऱ्याबाहेर थांबतो. पाठीशी हणमंतराव, दंगल आणि किसन दिसतात. धना घाबरून भाईंच्या आड होतो. ]

**राघूशेट :** ( अदबीनं नमस्कार करीत ) नमस्ते बाईसाहेब. मीच तो राघूशेट. नदी-पल्याडच्या वाल्मिकनगर वस्तीवरचा मी एक बरा झालेला कुष्ठरोगी. साहेब, आपल्याकडं एका कामासाठी येणं भाग पडलं. परवानगी असेल तर उंबरा ओलांडून आत येतो.

**भाई :** ( त्याला न्याहाळत ) या. काय काम आहे तुमचं माझ्याकडं ?

**राघूशेट :** ( आत येत ) काम तसं थोडंसंच आहे. पण– ( दामले मास्तर आणि जानकी यांना पाहून ) अरे वा, हे मास्तर आणि या सिस्टरबाई इथंच भेटल्या की. भली गोष्ट झाली. साहेब, परवानगी असेल तर आधी थोडं यांच्याशी बोलून घेतो.

**भाई :** त्यांच्याशी बोलायला माझ्या परवानगीची गरज काय ?

**राघूशेट :** या घडीला ते तुमच्या मळ्यात आश्रय घेऊन उभे आहेत. पुलाखाली राहत होते तेव्हाची गोष्ट वेगळी. तेव्हाऽऽ... सगळ्या गोष्टी पद्धतशीर व्हायच्या म्हणजे–

**जानकी :** काय काम आहे तुमचं आमच्याकडं ?

**राघूशेट :** तुम्हांला ते ठाऊक आहे बाई. काही दिवसांपूर्वी माझा माणूस, म्हणजे हा हणमंतराव, माझा निरोप दामले मास्तरांना पोचवायला पुलाखाली आला होता, त्या वेळी तुम्ही सुद्धा तिथंच होता.

**जानकी :** त्यावेळी त्या निरोपाचं उत्तरही मी तिथल्या तिथंच दिलं होतं. ते मिळालं नाही का तुम्हाला ?

**राघूशेट :** मिळालं. पण आता परिस्थितीत फरक पडल्यावर तुम्हाला आपल्या उत्तराचा कदाचित फेरविचार करावासा वाटेल, असं वाटलं मला, म्हणून–

**जानकी :** उत्तराचा फेरविचार करावा असा परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही.

**राघूशेट :** ते खरं नाहीये बाई. नाही, म्हणजे तुमचा हट्ट तुम्ही तसाच चालू ठेवा हवं तर. पण परिस्थिती बदललीय. बदलतेय. मात्र, तुम्हाला त्याची पुरती माहिति मिळाली नसेल अजून कदाचित, पण–

**जानकी :** पुरती माहिती ? कसली माहिती ?

**राघूशेट :** माहिती म्हणजेऽऽ. . . माफ करा बाई, पण इथला आश्रय काही फार काळ टिकायचा नाहीये.

**भाई :** इतकं छातीठोकपणानं कशाच्या आधारावर सांगताहात हो तुम्ही ?

**राघूशेट :** ( हसून ) एक अंदाज. आणिक राघूशेटचे अंदाज कधी चुकत नाहीत साहेब. आपले शेतमजूर काम सोडून जाताहेत. तेवढ्यानं काही फार बिघडायचं नाही. नवे मजूर काय, आपण कोठूनही मिळवू शकाल. पण कुष्ठरोगापेक्षाही त्याचा गवगवा आणि बभ्रा भारी खतरनाक असतो साहेब. मळ्यावर कुष्ठरोगी राहतात, असा एकदा बभ्रा झाला. आणि तो होणारच, की बाजारात कोणी हात लावणार नाहीत तुमच्या भाजीपाल्याला. ( हसून ) बाकी गुराढोरांना चारा म्हणून माल उपयोगाला येईल म्हणाऽऽ

**शांताक्का :** आमचं काय होईल याची तुम्हाला का काळजी ?

**राघूशेट :** छे छे मला काळजी मुळीच नाहीये बाईसाहेब. परिस्थिती कशी बदललीय ते सांगतोय या बाईंना.

**जानकी :** हा मळा आम्हाला सोडावा लागला तरी इथल्या हॉस्पिटलमध्ये मला नोकरी आहे आणि—

**राघूशेट :** नोकरी 'होती' म्हणा बाई. आज–उद्याच कळेल तुम्हाला. वाईट बातमी आहे पण तुम्हाला मिळायच्या नोटिशीवर कालच थोरल्या डॉक्टर साहेबांनी सही केली, असं हेडक्लार्क पटवारीसाहेब सांगत होते.

**जानकी :** नोकरी जाणार असली तरी सुद्धा मी तुमच्या आश्रयाला येणार नाही, कधीही नाही.

**राघूशेट :** मर्जी तुमची. मास्तरसाहेब तुम्ही काय ठरवलंत ?

**जानकी :** माझ्या उत्तरात माझ्या वडिलांचं उत्तर आलं नाही ?

**राघूशेट :** नाही बाईसाहेब, मास्तर कुष्ठरोगी आहेत; तुम्ही नाहीत. दोन ध्रुवांचं अंतर आहे बाई या 'आहेत नाहीत' मध्ये. त्यांचं उत्तर त्यांनाच देऊ द्या. मास्तर, हा राघूशेट कधी कोणा कुष्ठरोग्याला, त्यानं याचना केल्यावाचून आश्रय देत नाही. तो मी तुम्हाला आपण होऊन बोलावतोय.

**दामले :** तुमच्या वस्तीवर येऊन मी काय करू म्हणता राघूशेट ? उभी ह्यात गेली माझी बालगोपाळांना चार भल्या गोष्टी शिकवण्यात. तो मी तिथं काय रोज हातभट्टी लावून पोट जाळू ?

**राघूशेट :** वाल्मिक नगरात चारशे कुटुंबं हातभट्टीवरच पोट भरतात, मास्तर. गटाराकडेला भिकेची शिळी भाकर खाऊन नाही; कमाईची तूप रोटी मिळवून, हक्काच्या झोपडीत. तरीपण तुम्हाला एक सवलत देतो. तुम्ही वस्तीवरल्या पोरांना लिखापढी शिकवा, या बाईंनी रोग्यांचं दवापाणी बघावं. तुमच्या झोपडीतली भट्टी आमची माणसं येऊन रोज लावतील आणि तयार माल संध्याकाळी घेऊन जातील. दाम रोख.

**शांताक्का :** अगदी राजरोस उघडपणे हातभट्टीच्या गोष्टी करताहात की? पोलिस खातं झोपलंय का? पोलिसांची भीती वाटत नाही तुम्हाला?

**राघूशेट :** बाईसाहेब, राघूशेट कोणालाही भीत नाही. सतरा वर्षांपूर्वी कुष्ठरोगी गोळा करून पहिली हातभट्टी पेटवली, तेव्हाही तो कोणाला डरला नाही. आरंभी पोलिसांनी एकदा धाड घातली. मारे पोलिस पार्टी घेऊन झ्याकीत आले वाल्मिक नगरात मी आमची पार्टी पुढं धाडली. पार्टी म्हणजे सडलेले, जखमा वाहाणारे पंचवीस महारोगी काढले आणि कानात एकच मंत्र सांगितला. "जा लेको सगळ्या पोलिसांना जाऊन घट्ट मिठ्या मारा... दुसरं तिसरं काही करू नका, फक्त मिठ्या मारा... सोडू नका..." ( हसतो ) जीव घेऊन दाही दिशा पळता पळता भुई थोडी झाली हरामजाद्यांना. पुन्हा फिरकलेच नाहीत हरामखोर. आताऽ, सगळे बांधून घातलेत हप्त्यानं...वरपासून खालपोत्तर पद्धतशीर! मग? बोला मास्तर—

**दामले :** बाबा रे ते जमणार नाही. तुझा मार्ग वेगळा, माझा वेगळा.

**राघूशेट :** ठीक ठीक! मी वाट पाहीन. दमछाक झाल्यावर तरी वाल्मिकनगराची वाट शोधत यालच तुम्ही. त्यावेळी मात्र–

**भाई :** त्यावेळचं त्यावेळी. तुमचं काम संपलं असलं तर—

**राघूशेट :** फक्त दोन मिनिटं साहेब. हा धना माझ्या राज्यातला माणूस. त्याला दवापाणी करून मी बरा केला आणि अन्नाला लावला. जरा दोन बरे घास पोटात गेल्याबरोबर साल्याची नियत बिघडली. तरण्याताठ्या पोरी पाहून त्याला हीरोगिरी करायची बुद्धी झाली. आमच्या माणसांनी मग त्याला चार रट्टे हाणून, शिक्षा म्हणून गावाबाहेर इथं रस्त्यावर आणून टाकला.

**भाई :** चार रट्टे? चांगला रक्तबंबाळ होईपर्यंत बदडला होतात की त्याला.

**राघूशेट :** ते सगळं पद्धतशीर झालंय साहेब. दोन दिवस अन्नपाण्यावाचून रस्त्यात उन्हातान्हात तडफडला असता म्हणजे सरळ आला असता. पण भोसडीच्याची नियत खराब असली तरी नशीब चांगलं निघालं. म्हणून त्याला तुमच्या मळ्यावर दवापाणी मिळालं, अन्न मिळालं आणि डोक्यावर छप्पर मिळालं.

**भाई :** हे सगळं मला कशासाठी सुनावताहात तुम्ही राघूशेट?

**राघूशेट :** आमच्या माणसाला आम्ही घेऊन जायला आलो आहोत साहेब.

**धना :** ( ओरडत ) नाही ..नाही . . . मला नाही जायचं . . . मी नाही जाणार भाई मला हे पुन्हा तळावर नेऊन बदडतील.

**हणमंतराव :** उगाच गळा काढून ओरडू नकोस धन्या. आज ना उद्या तुला यावंच लागेल. तुला कोणी मारणार नाहीये.

**धना :** नाही . . . नाही . . . मी नाही येणार . . . भाई मला सोडवा . . . म . . म मी पाया पडतो, मला पकडून पाठवू नका शेट बरोबर—

**भाई :** राघूशेट, धनाची इच्छा असेल तर घेऊन जा त्याला तुम्ही बरोबर. जबरदस्तीनं मात्र तुम्हाला कोणालाही नेता येणार नाही.

**राघूशेट :** इच्छेचा, जबरदस्तीचा सवालच नाही साहेब. धना आमचा माणूस आहे. त्याला परत यावंच लागेल.

**भाई :** आणि तो नाही आला तर ?

**राघूशेट :** ( थंड जरबेनं ) ठीक ठीक ! असली बेताल भुतं आपल्या पायांनी परतायला लावायचा मंत्र आहे माझ्या पोतडीत. जपून राहा धन्याऽ. राघूशेटशी केलेली हरामखोरी जड जाणार आहे तुला.

**भाई :** हे फार झालं राघूशेट. इतका वेळ तुमचं सगळं बोलणं मी निमूटपणे ऐकून घेतलं. पण आता तुम्ही धमक्या द्यायला लागलात, ते मात्र मी मुळीच खपवून घेणार नाही. तुमच्याबरोबर कोणीही येत नाही, येणार नाही. तुमचा आश्रय कोणालाही नकोय. समजून चला आणि मुकाट्यानं आल्या पावली आपला रस्ता सुधारा.

**राघूशेट :** ठीक आहे साहेब. मी तर जातोच आहे. पण जाताना मी आपल्यालाही एक इशारा देऊन ठेवतो इथले सगळे कुष्ठरोगी, त्यांच्या बायकामुलासुद्धा, राघूशेटच्या राज्यातली प्रजा आहे. त्यांना आश्रय देण्याची वहिवाट, त्यांच्यावर हक्क आणि अधिकार, फक्त राघूशेटचा. साहेब, राघूशेट आपल्या राज्यात, कोणा परक्याची ढवळाढवळ सहन करीत नाही. त्याच्या उरावर दुसरं राज्य मांडायला तर कोणीच छाती करीत नाही. जे धजावले, ते बाराच्या भावात निघाले. कपाळाला राख फासून देशोधडीला लागले. तुम्ही नवीन आहात म्हणून बजावतो, साहेब, सावध ! राघूशेटच्या वाटेला जाऊ नका. भंग्यांना वळणावर आणण्याइतकं ते सोपं नाहीये.

**भाई :** ( उसळून ) ही धमकी तुम्ही कोणाला देताय राघूशेट ? मला ?

**राघूशेट :** ( थंड अदबीनं ) तसदीची माफी मागतोय मी साहेब. ( पाठ वळवीत ) चला रे लेकरांनो... दंगल, किसन, हणमंतराव

[ राघूशेट, पाठोपाठ दंगल, किसन, हणमंतराव जातात. मुरलीधर कधीचा येऊन उभा आहे. त्याच्याकडे वळत... भाई ]

**भाई :** तू काय बातमी आणली आहेस मुरली ?

**मुरली :** आपल्या शेतमजुरांनी काम सोडून जायचं ठरवलंय.

**भाई :** ठीक आहे. त्यांचे पगार करून टाक आणि त्यांना जाऊ दे.

**मुरली :** पगार घेऊन माणसं गेलीसुद्धा.

**शांताक्का :** निदान आजचा भाजीपाला काढून जावं, ऐनवेळी ही माणसं काय करतील, एवढासुद्धा विचार केला नाही त्यांनी ?

**भाई :** पोटासाठी राबणाऱ्यांची निष्ठा पोटापुरतीच असायची आई. मला त्यांचं मुळीच आश्चर्य वाटत नाही. तुझ्यापुरतं तू काय ठरवलं आहेस मुरली ?

**मुरली :** अजून ठरवलं नाहीये काही. पण विचार करतोय. आज तरी जात नाहीये मी.

**भाई :** म्हणजे दोन्ही डगरीवर हात ठेवून बघतो आहेस.

**शांताक्का :** हे रे काय भाई तुझं ? त्याला विचार करायला वेळ नको का ? मुरली, इथला प्रकार तुला माहीत आहे. माघार घेणारी आम्ही माणसं नव्हत. वाटलं तुला तर राहा नाहीतर जा. पण कडूपणा ठेवून जाऊ नकोस.

**दामले :** भाई तुम्ही माझं ऐकाल तर बाबत छोटी आहे. एवढ्या टोकापर्यंत ताणू नका. वाटल्यास अजूनही आम्ही—

**भाई :** मास्तर माझे प्रश्न आता मला सोडवू द्या. तुम्ही कोणी त्यात आणखी गुंते निर्माण करू नका. आई, आता आजचं मळ्यातलं भाजीपाल्याचं काम आपल्यालाच करायला हवं. तू आहेस, मुरली आहे, जानकी आहे, धना आहे— जमेल तसं आणि जमेल तेवढं उरकून टाकू.

**दामले :** मला काही काम द्याल तर उपकार होतील भाई.

**भाई :** त्याचाच विचार करतोय मी. सध्या तुम्ही प्रकृतीला जपा.

**शांताक्का :** जानकी, मास्तरांना तू घरी नेऊन सोड आणि विहिरीजवळ ये. फार विचारात पडू नकोस. ही नोकरी सुटली तर आपण दुसरा काही मार्ग काढू. तुला रिकामं घरी बसू द्यायची नाही मी.

**जानकी :** नोकरीची काळजी नाहीये मला शांताक्का. तरी पण मला ठाऊक आहे आमच्या आयुष्याचं गणित इतक्या सरळ सोप्या रीतीने सुटणार नाहीये भाई. आमच्यासाठी तुम्ही सहजपणे फार मोठा धोका पत्करलात—

**भाई :** त्यासाठी आभार वगैरे मानताय का ? ते भाषण इतक्यात करू नका. आता कुठं लढाईला तोंड पडतंय.

**जानकी :** तुमचे आभार मानण्याएवढी ढोंगी नाहीये मी. मला एवढंच म्हणायचं होतं की तुमच्या प्रयत्नाला तरी यश येऊ द्या आणि आमची ही परवड संपू द्या. येते मी शांताक्का. चला बाबा [ जानकी जाते. दामले मास्तरही तिच्या पाठोपाठ 'श्री हरी ! श्री हरी !' उद्‌गारत जातात. मग–]

**भाई :** धना, अवजारं घेऊन तू शेताकडं चल. मुरली, विहिरीवरला पंप चालू करून

पाणी सोड, तोवर येतोच आम्ही. [ धना आणि मुरली जातात. भाई आणि शांताक्का दोघेही विचारमग्न स्थितीत शेतावर कामासाठी जाण्याची तयारी करू लागतात. ]

**भाई :** आई, त्या राघूशेटचं बोलणं तू ऐकलंस ना मघाशी ?

**शांताक्का :** ऐकलं. का रे ?

**भाई :** तो काही सरळ बोलत नव्हता. बोलण्यात कटुता होती; तिढे होते आणि खवचटपणाही भरपूर होता.

**शांताक्का :** दमदाटीही काही कमी नव्हती.

**भाई :** ती सोडून दे. तरी पण कुठं तरी फार फार खरं बोलत होता तो. अनुभवाचं आणि व्यवहाराला धरून.

**शांताक्का :** माझ्या लक्षात आलंय ते. मग ?

**भाई :** नाही, त्यानं मला खूप काही सुचवलंय. मुद्दाम नसेल पण त्याच्या बोलण्या-बडबडण्यातून मला एक नवी दृष्टी मिळालीय.

**शांताक्का :** तेही माझ्या ध्यानात आलंय. एरवी तू त्याची मानगूट पकडून सरळ त्याला रस्त्यावर फेकला असतास. कोणती नवी दृष्टी मिळाली तुला त्या हातभट्टी-वाल्याकडून ?

**भाई :** म्हणजे, हातभट्टी चालवून चारशे कुटुंबं जर पोटभरू शकतात तर कुष्ठरोग्यांना शेतावर आणि यंत्रावर आपले हात चालवून उदरनिर्वाह करायला काय हरकत आहे ? सगळेच कुष्ठरोगी काही टोकाच्या अवस्थेत आसन्न मरण नसतात ! इथं आपल्याला एक प्रयोग करून पाहाता येईल.

**शांताक्का :** आपल्या मळ्यावर तू कुष्ठरोग्यांचा 'धर्मदाय आश्रम' काढायचा विचार करतो आहेस का ?

**भाई :** मी नेमकं काय करणार आहे ते मला ठाऊक नाही. त्याबद्दल मी विचार करतोय, चाचपडतोय. शेतमजुरांनी काम सोडून एक आव्हान माझ्यापुढं टाकलंच आहे. त्यामुळं यापुढं हा काही नुसताच भाजीपाला आणि धान्य पिकवून, 'पैका' करणारा मळा राहाणार नाहीये. मळ्याचं रूप बदलणार आहे. बदलतंय ! पण एक गोष्ट नक्कीच. कुष्ठरोग्यासाठी सुद्धा 'धर्मदाय' म्हणून मी काही एक करणार नाही. माणसाला पुरतं मोडून भुईसपाट करणारं भिकेमारखं दुसरं जलाल विष नाही. उपजीविकेला शरीर–कष्टाशिवाय दुसरा पर्याय नाही. श्रमाशिवाय प्रतिष्ठा नाही आणि प्रतिष्ठा मिळाल्याशिवाय कुष्ठरोगी पुन्हा माणसात येऊ शकणार नाहीत. याला आपण 'श्रमानंद नगर' म्हणू या का ? जिथं रोगी आणि निरोगी खांद्याला खांदा भिडवून कष्ट करतील, घाम गाळतील आणि एक नवं चैतन्यमय, आनंदमय जीवन फुलवतील.

**शांताक्का :** भाई, या जमिनीवर काय पिकवायचं हे तुझं तू ठरव. तुझ्या बरोबरीनं कष्ट उपसायला माझी काही ना नाही. पण तू करशील त्यात जानकीला मात्र गुंतवू नको.

**भाई :** माझी कोणावर सक्ती नाहीये, पण उद्या आपण रुग्णालय विभाग उघडायचं ठरवलं तर–

**शांताक्का :** तरी सुद्धा जानकीला मोकळं राहू दे. बऱ्यापैकी मुलगा मिळताच तिचं लग्न करून टाकावं असं ठरवलंय मी.

**भाई :** ठीक आहे. ते होऊन जाईल. पण–––

**शांताक्का :** होऊन कसं जाईल आपोआप ? जानकीचे वडील हे असे. कुष्ठरोग्याच्या हातून पाणीसुद्धा घेत नाहीत माणसं, मग कुष्ठरोग्याची मुलगी सहजासहजी उजवता येईल थोडीच ? त्यासाठी खटपट करायला हवी.

**भाई :** ते खरंय आहे. पण समंजस माणसांचा अगदीच दुष्काळ पडलाय आपल्या समाजात असं मला वाटत नाही. एक–दोन स्थळं माझ्याही डोळ्यापुढं आहेत. तिथं मी शब्द टाकला तर तो मुळीच खाली पडायचा नाही अशी खात्री आहे मला.

**शांताक्का :** कोण आहे रे बाबा तुझ्या खात्रीचा मुलगा ? लुळापांगळा, आंधळा तर नाहीये ना कोणी ?

**भाई :** छे छे, भलतंच काय बोलतेस आई ? अगदी हातीपायी नीट, धडधाकट आहे मुलगा. दिसायला बेताचा म्हणजे सुमारच आहे.

**शांताक्का :** दिसण्याचं जाऊ दे.

**भाई :** तसा पैकेवालाही फार नाहीये तो.

**शांताक्का :** आपलं आणि बायकोचं तरी पोट भरील ना तो ?

**भाई :** नक्कीच. एरवी त्याचं स्थळ कोण सुचवील आई ?

**शांताक्का :** पुष्कळ झालं. तू शब्द टाकलास तर करून घेईल म्हणतोस जानकीला तो ?

**भाई :** हे निदान मला तरी त्याची खात्री वाटतेय.

**शांताक्का :** स्वभावानं चांगला आहे ना ?

**भाई :** तसा समंजस आहे. जरा किंचित विक्षिप्त आहे. पण–

**शांताक्का :** असू दे. पुरुष विक्षिप्तच असायचे. तुझे वडील नव्हते ? कोण आहे तो ? कुठं असतो ? काय करतो ?

**भाई :** ते सगळं त्याच्याशी बोलणं झाल्यावर सांगतो तुला. ( गडबडीनं ) चला विहिरीकडं जायला हवं आपल्याला. माणसं खोळंबून पडली असतील. [ जाऊ लागतो, तशी त्याची वाट आडवीत ]

**शांताक्का :** अरे सगळं नको सांगूस. पण त्याचं नाव–गाव तरी कळू दे.

**भाई :** अग असं काय करतेस ? मी नाही म्हणतोय का ? पण आधी एकदा त्याच्याशी बोलतो आणि मग—

**शांताक्का :** नाही. आधी तो कोण आहे मला कळायलाच हवं. तुझ्या एवढ्या खात्रीचा माणूस म्हणजे माझ्या माहितीलाच असणार. सांग. सांग ना ?

**भाई :** तू म्हणजे अशी आहेस आई. . .

**शांताक्का :** असू दे. आधी सांग.

**भाई :** ( गालात हसत ) अग जो माझ्या शब्दाबाहेर मुळीच जाणार नाही, असा दुसरा कोण असणार ? मीच की.

[ झटकन् तिचा हात दूर करीत बाहेर पळतो. ]

**शांताक्का :** ( स्तंभित होते. पाहात ) आंऽ ऽ ऽ ? भाइ तू ऽ ऽ ऽ ?

[ शांताक्का थक्क होऊन पाहात उभ्या राहिल्या असतानाच— पडदा ]

## अंक पहिला संपला

OOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOOO

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ सुमारे तीन वर्षांचा काळ उलटला आहे. नदीकाठावर वाल्मिक नगरच्या परिसरात खंडोबाचे एक जुनाट पडके देऊळ आहे. देऊळ ओसच पडले आहे पण या देवळा-बाहेर, नदीघाटाकडून गावाकडे जाणारा जो रस्ता आहे, त्याला लगटूनच एक पिंपळपार आहे. वाल्मिक नगरात जाणाऱ्या–येणाऱ्याला या पारावरूनच जावे लागते. म्हणून टेहळणीसाठी राघूशेटची माणसं दिवसभर या पारावर मुक्काम करून असतात. बहुधा रोज सायंकाळी स्वतः राघूशेट इथं येऊन आरामात बसतात. हवा खाण्यासाठी आणि झोपडपट्टी वाल्याकडून ' खबरा ' घेण्यासाठी.

वेळ सायंकाळची. पडदा वर जाऊन रंगमंच उजळतो त्यावेळी राघूशेट बिडी शिलगावीत पारावर बसलेले दिसतात. समोर किसन आणि हणमंतराव उभे आहेत. ]

**राघूशेट** : ( झुरका घेऊन धूर सोडत ) काय ? काय म्हणालात हणमंतराव ? आयला, काय नावं असतात एकेक. टिन क्यान फ्याक्टरी ? म्हणजे रे काय ?

**हणमंतराव** : टिन्च्या पत्र्याचे डबे म्हणा, थाळया म्हणा, भांडीकुंडी म्हणा, तयार करण्याचा कारखाना.

**राघूशेट** : आणि तो कारखाना विलायतेतल्या साहेबलोकांनी या हरामखोरांना काढून दिला ?

**किसन** : होय शेट. दिडकी न घेता, फुकट !

**राघूशेट** : आयला, म्हणजे साल्यांची चंगळच झाली की ?

**हणमंतराव** : एवढंच नाही शेट, कारखान्यातील यंत्रं कशी चालवायची ते कुष्ठ रोग्यांना शिकवायला तिकडचे साहेब लोक येऊन राहिलेत इथं महिनाभर.

**राघूशेट** : कुठं ? कुष्ठ रोग्यांच्या श्रमानंद नगरात ?

**किसन** : होय शेट.

**हणमंतराव** : आपला धनाच काम करतोय त्यांच्या हाताखाली.

**राघूशेट** : धना ? हत्साला...हा कुष्ठरोगी कसला बोडक्याचा कारखाना चालवणार ?

**किसन** : नाही धनी. तो बरा झालाय आता. डाक्तरांनीच यंत्रावर काम करायची परवानगी दिलीय त्याला.

**राघूशेट :** डाक्तर म्हणजे त्या भाईंची बायको, जानकीच ना ? अरे ती तर बोलून चालून एक नर्सबाई.

**हणमंतराव :** शेटसाहेब, कलकत्त्याला जाऊन भाईसुद्धा कुष्ठरोग्यांना दवापाणी द्यायची डाक्तरी शिकून आलेत की. वस्तीवरल्या रोग्यांना तपासून औषधंसुद्धा—

**राघूशेट :** तेच देतात. ठाऊक आहे मला.

**किसन :** केवढा मोठा दवाखाना, केवढं मोठं इस्पितळ बांधलंय त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी.

**राघूशेट :** कुष्ठरोग्यांना वेठबिगारीला लावूनच ना ? फक्त अन्नावारी. कोणाला कधी दिडकी हातात मिळते का ते जाऊन विचार की ?

**हणमंतराव :** कुष्ठरोग्याकडून शाळासुद्धा बांधून घेतलीय त्यांनी. बरे झाल्यापासून दामले मास्तर शिकवतात त्या शाळेत पोरांना.

**राघूशेट :** ते कानावर आलंय माझ्या. पण साल्यांना बांधकामासाठी पैका कोठून मिळतो ? भोसडीच्चे डाका तर घालीत नाहीत कुठं रातचे ?

**हणमंतराव :** डाका कशाला ? श्रमानंद नगरात पाच–पन्नास उद्योग चाललेत. छापखाना धडधडतोय; शियणाची यंत्रं फिरताहेत; गालीचे विणताहेत.

**किसन :** मंडईतल्या गाळेवाल्यांनी कुष्ठरोगी भाजीपाला तयार करतात म्हणून नाकारला, तर भाईंनी मुंबईला ट्रक सुरू केला. सोळा आणे जिरवली गाळेवाल्यांची.

**हणमंतराव :** आता भाजीपाल्याच्या जोडीला मणमण धान्य पिकवताहेत.

**राघूशेट :** होय होय— कोंबड्या पाळताहेत आणि गवळीवाडाही चालवताहेत. ठाऊक आहे मला ते मूर्खांनो, तोंडं किती झाली आहेत श्रमानंद नगरात त्याचा काही हिशेब केलात ? अरे या धंद्यातून मिळणारा पैका तर पोटं भरायला फस्त होत असेल. साल्यांनी दवाखाना बांधला, इस्पितळ उभं केलं; शाळा बांधली; कुष्ठरोग्यांसाठी रहायचे गाळे बांधले; सरकार–दरबारी झगडून बहिरोबाच्या डोंगराखालची चारशे एकर खडकाळ जमीन मिळवली, पण विहिरी बांधून नाला अडवून आणि खतांचे डोंगर ओतून जमिनीचं सोनं केलं— या सगळ्याला पैका लागतो ना ?

**हणमंतराव :** मला वाटतं शेट, भाईंना परदेशातून देणग्यांचा वर्षाव होतोय. एरवी गावातून एक दिडकी मिळाली नाही की मिळायची नाही त्यांना.

**राघूशेट :** हुं. कानावर आलंय माझ्या ते. नशीबच फळफळलंय साल्याचं या तीन वर्षांत. कुष्ठरोगी होऊन जणू दुनियेवर उपकारच केलेत ना साल्यांनी ? ( थबकून ) सगळ्या कुष्ठरोग्यांना किती घंटे राबावं लागतं रे किसन रोज तिथं ?

**किसन :** आठ आठ घंटे. वेळेला जास्तच पण कमी नाही.

**राघूशेट :** आणि हे भोसडीचे खुषीनं राबतात, नाही का ? आणि वर त्या भाईला 'देवमाणूस' म्हणतात.

**किसन :** 'देवमाणूस' नाही शेट, भाईंना ते देवच मानतात

**राघूशेट :** ते मानतात तर मानू देत. तू नाही ना त्या देवाच्या भजनी लागलास ?

**किसन :** छा छा शेट... भलतंच काय ?

**राघूशेट :** मला वाटलं त्याची माया पाहून तुम्ही लोकसुद्धा पाघळायला लागला आहात ?

**हणमंतराव :** साहेब दुरून डोंगर साजरे. हा देव माया करीत नाही, प्रत्येकाकडून रगडून ठोकून काम करून घेतो. कोणी रोगी रिकामा बसलेला खपत नाही त्याला. एक हात तर एका हातानं, एक पाय तर एका पायानं, बोटं नसली तर हाताच्या नुसत्या खुंटानं— पण काम कर— असला खाक्या आहे तिथं. कोण्णांचे लाड नाहीत की कोण्णाला काही फुकट नाही. कोणी कामचुकारपणा केला की शिव्या-गाळी, रट्टे, प्रसंगी लाथासुद्धा- म्हणे हो, मी जाऊन काही पाहिलं नाही.

**राघूशेट :** त्याच लायकीचे आहेत भडवे. त्याच्या शिव्या आणि लाथासुद्धा गोड लागत असतील हरामजाद्यांना.

**हणमंतराव :** काही म्हणा शेट, हा भाई मोठा धोरणी, हुशार आणि जिगरबाज माणूस आहे. सगळ्यांच्यावर अशी जबरदस्त छाप ठेवून राहिलाय म्हणता तो–

**राघूशेट :** म्हणून तर बोल बोल म्हणता त्यानं तुम्हाला खडे चारले. श्रमानंद नगर उभं राहात होतं त्यावेळीच मी बोंबलून तुम्हाला इशारा देत होतो की त्याची चाल ओळखा. कानीकपाळी ठणाणा केला मी तुमच्या. काय केलंत तुम्ही ? नुसते कुल्ले खाजवीत मिजाशीत राहिलात. साल्योऽऽ, या तीन वर्षांत त्यानं आपल्या नगरातली पाच–पन्नास माणसं, बायका–पोरांसुद्धा फितवून नेली आणि आपल्या वस्तीवर चिट-कून दिली. तुमच्या डोळ्यादेखत, तुमच्या नाकावर टिच्चून. तरी तुम्ही ढिम् जागचे हलला नाहीत.

**हणमंतराव :** पण त्यामुळं आपलं काय नुकसान झालं शेट ? जेवढी माणसं गेली तेवढी नवी भरती झाली, नाही का ?

**राघूशेट :** यडपट आहेस तू हणमंतराव. यात नफा–नुकसानीचा काय सवाल आहे ? राघूशेटच्या राज्यातला इसम शहाजोगपणे वस्ती सोडून जातोच कसा ? इथं हराम-जाद्यांना काय कमी होतं आणि तिथं काय जास्त मिळालं ?

**हणमंतराव :** काही नाही. माझं ऐकून ठेवा शेट— जे गेले ते पस्तावले. त्यांना परतीची वाट आपण बंद केलीय म्हणून, नाहीतर–

**राघूशेट :** हणमंतराव, गफलत करू नका. जे पळाले त्यांची मला पत्राज नाही. पण हा भाई आपल्याला फार जड जाणार आहे. फार काळ तो आपल्याला स्वस्थ बसू द्यायचा नाही. साला, उलट्या काळजाचा हुशार वकील, जिद्दी शेतकरी आणि खतर-नाक शिकारी आहे. आणि आपण तर हातभट्टीच्या धंद्यात गळ्यापोत्तर रुतलो आहोत. त्याची वस्ती आपण वेळीच उखडून काढली नाही तर एक दिवस आप-ल्याला तो राख फासून पळवून लावील. हा दीडदमडीचा, आपल्या उरावर एक

जळता निखारा आहे, हे तुम्हाला कळतं की नाही ?

**हणमंतराव :** तो जळता निखारा असला तरी आपोआप विझणार आहे. आपण धावाधाव करायची मुळीच गरज नाही. गावातले लोक आणि शिवरामदादांच्यासारखे म्युनसीपालटीचे अध्यक्ष श्रमानंद नगर नष्ट करून टाकणार आहेत. शिवरामदादांच्या स्वच्छ आणि सुंदर शहराच्या योजनेत कुष्ठ रोग्यांच्या वस्तीला मुळी जागाच नाही.

**राघूशेट :** मग तशी लेकाच्यांनो, आपल्या वस्तीला तरी कुठं जागा आहे ?

**हणमंतराव :** शेटसाहेब, तुम्ही विसरता आहात– आपली वस्ती शेवाळयासारखी नदी काठाला चिकटून एका भिकार जागेवर चोरूनमारून उभी राहिलीय. श्रमानंद नगरासारखी उघडपणे लोकांच्या नाकावर टिच्चून आपली वस्ती आपण मिरवीत नाहीये. भाईंच्यावर लोक भयंकर बिथरलेत. तुम्ही जरा वाट पाहा शेट– शिवरामदादा आणि भाई यांच्यात हल्ली विस्तव जात नाही, हे ठाऊक आहे ना आपल्याला शेट ?

**राघूशेट :** हणमंत्या, ज्या गोष्टी तुला आणि या किसनला ठाऊक आहेत, त्या मला कळत नाहीत, इतका मला बुद्दू समजलात काय रे ?

**हणमंतराव :** शेट साहेब, आपण खोदखोदून विचारलंत म्हणून –

**राघूशेट :** मुद्दामच खोदखोदून विचारलं. वस्तीवरल्या सगळयांनाच मी विचारतो. कशासाठी ठाऊक आहे ? श्रमानंद नगराकडे पळून जाण्याचा कोणाकोणाचा बेत आहे ते कळावं म्हणून. हरामखोरी करणारे बत्तमीज गाफीलपणे काहीतरी बोलून जातात आणि मला अंदाज येतो.

**हणमंतराव :** नाही शेट –

**राघूशेट :** किसन्या, मारत्याच्या टपरीवरून पान तयार करून आण. तंबाखू एकशेवीस बत्तीस जलदी. [ किसन 'होय शेट' म्हणत लगबगीनं जातो. मग ] हणमंतराव, या किसन्यावर नजर ठेवा. त्याची चाल मला काही सरळ दिसत नाही.

**हणमंतराव :** नाही शेट, किसन कधीही दगलबाजी करून पळून जाणार नाही याची–

**राघूशेट :** मला तुमची ग्यारंटी नकोय. तुला तुझी बायकोसुद्धा जरबेत ठेवता आली नाही.

**हणमंतराव :** ( व्यथितपणे ) शेट साहेब–

**राघूशेट :** साल्यांनी माझी माणसं पळवून नेऊन माझं नाक कापलंय, त्याची तुला लाज नसली तरी मला शरम वाटते. उगाच तुला मुंडी खाली घालायला लावण्यासाठी मी बोललो नाही. हणमंतराव, कोणीतरी आधीच मुंडी छाटलेल्या धडाचे, नंतर हातपाय तोडण्याइतका राघूशेट शेंदाड शिपाई नाहीये, समजलात ?

[ तेवढ्यात किसन पान तंबाखू घेऊन येतो. पान तोंडात घालून चघळत क्षणभराने पान थुंकत गोड हसून मृदूपणाने] बाकी हणमंतराव, तुझा अंदाज बरोबर आहे. आज ना उद्या आपले गाववालेच या भाईला त्याच्या नगरासकट धुळीला मिळवणार

आहेत. या पिल्लाचे पंख झडून पडताना पाहण्यात बडा मजा येणार आहे यार... (हसतो) शिवरामदादांना जाऊन भेटायला हवं एकदा.

**हणमंत :** हो हो वाल्मिक नगरात पाण्याचे नळ आणतो म्हणून—

**राघूशेट :** अरे पाण्याची बात छोडो यार नदी आटली तरी गटारं भरभरून वाहताहेत तोवर हातभट्टीला पाण्याचा कधीच तुटवडा पडायचा नाही. स्वच्छ आणि सुंदर नगरात हा शिवरामदादा, भाईचा गणपती कोणत्या मखरात बसवतोय तेऽऽऽ——

**किसन :** (दूरवर पाहात) आं ? भाई ? इथं ?

**हणमंतराव :** (पाहात) होय खरंच की... बरोबर जानकीही दिसतेय शेट. पण हे लोक इथं कसे आले ? कशासाठी—

**राघूशेट :** (थंडपणे बिडी काढून शिलगावीत) आले असले तर येऊ देत. तुम्ही का एवढे कासावीस झालात ? आज ना उद्या ते इथं येणार हे मला ठाऊक होतं. हणमंतराव, चमत्काराशिवाय कोणी उगाचच नमस्कार करीत नाही आणि मतलबाशिवाय कोणी कोणाच्या दारी फुकाची पायधूळ झाडीत नाही.

[ तोच भाई आणि जानकी येतात. येतायेता जानकी हणमंतरावांना पाहात म्हणते— "हे पाहा हणमंतराव..." तशी भाई पाहात उद्गारतात— "अरे वा ! राघूशेट देखील इथंच आहेत की. छान. नमस्ते राघूशेट" ]

**राघूशेट :** नमस्ते साहेब ..नमस्ते ताई...आज इकडं कशी काय पायधूळ झाडलीत ? का नदीची शोभाबिभा पाहायला घाटाकडं निघालात ? (मिस्किलपणे हसतो.)

**भाई :** नाही राघूशेट. तुम्हाला भेटायसाठी मुद्दामच इकडं यायचं ठरवलं आम्ही. एक काम आहे तुमच्याकडं.

**राघूशेट :** (छद्मीपणानं) काम ? माझ्याकडं ? (हसून) काय गरिबाची मस्करी चालवलीत साहेब ? माझ्यासारख्या भिकार इसमाकडं हो तुमचं कसलं काम निघायचं ? अरे किसन, समोरच्या चायवाल्याच्या झोपडीतून दोन खुर्च्या आणून ठेव साहेब लोकांसाठी. खुर्च्या चांगल्या धड पायाच्या पाहून मग आण हो. नाहीतर साहेब तोंडघशी पडायचे आन ठपका राघूशेटवर यायचा. (हसतो)

[ किसन लगबगीनं जातो ]

**भाई :** (त्याच्याकडं दुर्लक्ष करीत, पारावर टेकत) राघूशेट, तुम्ही एकदा श्रमानंद नगराला भेट द्यायला हवीत आणि—

**राघूशेट :** थांबा साहेब... तिथं टेकू नका. गदळ वस्तीतला पार आहे हा. कपडे खराब होतीलच पण—

**भाई :** असू दे. श्रमानंद नगरात आम्ही काय काय करतो आहोत ते तुम्ही स्वतः भेट देऊन पाहायला हवं.

**राघूशेट :** (हसत) भेट ? आणि मी ऽ ? साहेब तुम्ही मला गवर्नर समजलात का

पुढारी, का मंत्री ? मस्करी करायची तल्लफच आलीय साहेब आज तुम्हाला... (हसत) करा बाबांनो, मस्करी करा.

**जानकी :** नाही राघूशेट. श्रमानंद नगरात मंत्र्यापुढाऱ्यांना आम्ही कधी बोलावलं नाही की बोलावणार नाही. कार्याचं महत्त्व पटून ते आपण होऊन येतील तेव्हा येऊ देत. पण आमचे सगळे उद्योग तुमच्यासारख्यानीच स्वतः येऊन पाहायला हवेत.

**राघूशेट :** असं, नाही का ? भली लवकर आठवण झाली राघूशेटची ?

**भाई :** लवकर नाही. थोडा उशीरच झालाय. पण आमच्या नगराला थोडा आकार येऊन स्थिरस्थावर होईपर्यंत थांबणं भागच होतं.

**राघूशेट :** अस्सं ! ( किसन खुर्च्या आणून ठेवतो, तशी ) बसा भाईसाहेब... बसा ताईसाहेब.... ( दोघेही बसतात. मग ) ताईसाहेब; 'माझ्यासारख्यांनीच तुमच्या वस्तीवर यायला हवं,' असं तुम्ही म्हणालात आता. 'माझ्यासारख्यांनीच' म्हणजे काय ? नेमका अर्थ ध्यानी नाही आला माझ्या. माझ्या कुष्ठरोगाबद्दल म्हणत असाल तर, मी आता पुरता बरा झालोय. हे हातमोजे, हे पायमोजे, झडलेली बोटं तुमच्यासारख्यांना दिसून उलटी ओकारी होऊ नये म्हणून... ( हसतो ) काय ?

**जानकी :** प्रश्न नुसता तुमचा नाहीये राघूशेट. वाल्मीक नगरातल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या सगळ्या लहान मोठ्या रुग्णाइतांना वेळच्या वेळी औषधोपचार व्हायला नको का ?

**राघूशेट :** ताईसाहेब, त्यांचं ती बघायला भक्कम आहेत की हां माझंही लक्ष आहे ! थोडंफार. या उप्पर नाही कोणी दवापाणी वेळच्या वेळी केलं, काय ? तर मरतील साले झडून झिजून. त्यांच्यासाठी कोण रडणार आहेत या दुनियेत ? नाही ताईसाहेब, तुम्ही जातीनं इथं रोज येऊन दवापाणी करणार आहात का रोग्यांना ?

**जानकी :** मी इथं नाही येणार. म्हणजे तेवढ्यानं भागणार नाही. श्रमानंद नगरात आम्ही हॉस्पिटल उघडलंय, लॅबोरेटरी काढलीय. तुम्ही तुमच्या माणसांना तिथं धाडलंत तर—

**राघूशेट :** ( छद्मीपणानं हसत ) वा ताई... वा... छान सल्ला देताय. आमचे 'पेशंट लोक मी तुमच्या नगरात पाठवू म्हणता ? वारे वा, झकास ! आमची माणसं, बायकापोरांसुद्धा तुमच्या नगरात यायला लागली आणि पुढं ती बरी झाली, तर ती पुन्हा वाल्मिक नगरात येतील म्हणता ? ती तिकडंच गायब होणार की ! तुम्ही मला काय बावळट समजता ताईसाहेब ? तुम्ही मला काय धंद्यातून उठवायला बघताहात साहेब ? ( हसत ) वा रे वा ! आमची माणसं म्हणे तुमच्याकडं पाठवा. दवापाण्यासाठी. साहेब, इथं वाल्मिक नगरात जेवढं दवापाणी रोग्यांना मिळतं तेवढं पुरेसे आहे. पोट भरणारा धंदा धडपणे करण्याइतपत ती बरी असली म्हणजे रगड झालं की !

**जानकी :** असं तुम्ही समजता, पण—

**राघूशेट :** नाही ताईसाहेब, असं त्या रोग्यांनाही वाटतं. अहो इथली माणसं मुळात मला गवसली तेव्हा ती कोण होती? ती मुळी माणसंच नव्हती. भीक मागणारी नाहीतर उष्ट्या-खरकट्यावर जगणारी ती जनावरं झाली होती. मी त्यांना धंद्याला लावलं म्हणून ती माणसासारखी दिसायला लागली. ताईसाहेब, या अडाणी लोकांना रोगी असणं आणि खडखडीत बरं होणं, यांतला फरक कुठं कळतोय? त्यातून कोणाकोणाला कळला, तरी एवढा लांबचा पल्ला पद्धतशीर दवापाणी करून गाठायला एकालाही वेळ नाही, दम नाही, की धीर नाही.

**भाई :** आज त्यांना कळत नसेल, वेळ नसेल, धीर नसेल. पण बरोबरीचे रोगी खडखडीत बरे झालेले पाहून आज ना उद्या त्यांना शहाणपण सुचेलच की. त्याची मी इतक्यात चिंता करीत नाही. पण म्हणूनच कुष्ठरोग्यांसाठी आम्ही काय काय उद्योग सुरू केलेत ते बघायला तरी तुम्ही स्वतः एकदा नगरात या आणि—

**राघूशेट :** छे छे मी स्वतः मुळीच यायचा नाही. त्याची काही गरज नाही. इथं बसल्या जागी बूड न हलवता तुमचे सगळे उद्योग मला कळतात साहेब. तुमच्या सगळ्या झकापकीपरीस आमचा एक धंदा एकदम श्रेष्ठ आहे. कष्ट थोडे, पैका रग्गड. काय? (हसतो)

**भाई :** धंद्याबद्दल तुमच्याशी वाद घालायला काही आम्ही आलो नाही. तुमच्या धंद्याबद्दल आमची काही मतं असली तरी त्याबद्दल मी तुम्हाला दोष देणार नाही. या धंद्यावाचून माणसं जगवण्याचा तुम्हाला दुसरा मार्गच शिल्लक नव्हता हे मला मान्य आहे. तरीदेखील मी तुम्हाला एक विनंती करायला आलोय.

**राघूशेट :** कसली?

**भाई :** तुमच्या वस्तीवरल्या सगळ्या छोट्या मुलांना तुम्ही या धंद्यात गुंतवू नका. या मुलांना तरी तुम्ही आमच्या स्वाधीन करा.

**राघूशेट :** का? कशासाठी? आमच्या पोरांना इथं काय कमी आहे?

**भाई :** श्रमानंद नगरात आम्ही त्यांना औषधपाणी तर देऊच पण त्यांना लिहायवाचायला शिकवू आणि—

**राघूशेट :** ते काय म्हणून? इथं देखील आमची पोरं शिकतात की.

**जानकी :** इथं ती दुसरं काय शिकणार? हातभट्टीचा धंदा ना?

**राघूशेट :** बरोबर ताईसाहेब. नाहीतर तुमच्या नगरात नेऊन तुम्ही त्यांना काय वकिल, डाक्तर, इंजीनेर करणार आहात?

**जानकी :** त्यात काय? बुद्धीत कुवत असेल ती मुलं आज ना उद्या—

**राघूशेट :** (हसत) होतील होतील... वकील, डाक्तर, इंजीनेरसुद्धा होतील. पण मला सांगा ताई, ती माणूस होतील का? त्यांना चाकरी कोण देणार? पोटापाण्याचा

उद्योग ती कुठं जाऊन करणार ? पुन्हा वोंबलत ती इथंच येऊन तडफडणार ना ?

**भाई :** वकील डाक्तराचा पल्ला जरा लांबचा झाला राघूशेट. पण या घडीला तरी त्यांना इज्जतीनं आणि अब्रूनं पोट भरता येईल असेच उद्योगधंदे आम्ही–

**राघूशेट :** इज्जत ? अब्रू ? ( खळखळून हसतो ) कुष्ठरोग्यांना इज्जत आणि अब्रू असते का हो साहेब ? तुमची काहीतरी गफलत झालीय साहेब. या आपल्या नदीच्या पल्याड जे गाववाले राहातात ना, त्यांना असते इज्जत आणि अब्रू. तुमच्या या अब्रूदार इज्जतवाल्यांनी, रस्त्यावरून गावाबाहेर पिटाळलेली जनावरं तेवढी आमच्या वस्तीवर राहातात. त्यांना असतो एक रोग आणि एक वीतभर पोट. साहेब इज्जतवाल्यांची दुनिया वेगळी, आमची वेगळी. पुन्हा सांगतो आमच्या लोकांचं बेष्ट चाललंय. तुम्ही कशाला ही नसती झ्यांगटं फुकाफुकी कुष्ठरोग्यांच्या मागं लावताय ?

**जानकी :** राघूशेट, इज्जत, अब्रूची गोष्ट सोडा. पण हा हातभट्टीचा गुन्हेगारीचा धंदा किती दिवस बिनबोभाट चालेल असं वाटतं तुम्हाला ?

**राघूशेट :** त्याचं असं आहे ताई, मागणी आहे तिथं पुरवठा होणारच. राघूशेटच्या हातभट्टीला मरण नाही कारण मागणी वाढतेय. आणि बोभाट्याच्याबद्दल म्हणाल तर त्याची मला कधीच काळजी नव्हती आणि नाही. अहो असं काय करता ताई ? वरपासून खालपोत्तर मंडळींच्या घरोघरी राघूशेटचे हप्ते बिनचूक पोचताहेत. ( हसतो )

**जानकी :** सगळेच अधिकारी हप्ता घ्यायला सोकावलेत असं समजू नका. काही नेकीचे अधिकारी–

**राघूशेट :** असतील की. पण त्यांना कसं मोडून काढायचं ते बाकीचे हप्तेवाले उंदीर झक्क जाणतात. रोगजंतू एकदा शरीरात घुसले की बघता बघता सगळं रक्तच नासून टाकतात, नाही का ताई ?

**भाई :** तुम्ही म्हणता ते काही खोटं नाही. पण हे असं चालणार नाही राघूशेट. ही परिस्थिती बदललीच पाहिजे, आणि–

**राघूशेट :** काही एक बदलणार नाहीये साहेब. तुमची ही सगळी यातायात फुक्कट आहे कारण आमच्या दुनियेतल्या माणसांना शरीराचा महारोग झाला असला तर तुमच्या दुनियेतल्या अब्रूदार इज्जतवाल्यांना मनाचा महारोग झालाय.

**भाई :** व्हॉट अ वर्ड ! मनाचा महारोग ?

**राघूशेट :** हो हो मनाचा महारोग. पैसा खाऊन खाऊन साल्यांची मनंच सडलीयत. लाचलुचपतीशिवाय कोणा एकाचं तरी पाऊल उचलतं का हो साहेब ? एक गंमत बघा. हापीसर लोक हापापल्यासारखे हप्ते खातात आणि अट्टल बेवडे तल्लफ भागविण्यासाठी माझे उंबरे झिजवतात. मग राघूशेटचा धंदा तेजीत चालेल नाही

तर काय ? साहेब, आधी तुमच्या दुनियेला जडलेल्या या खाबूगिरीच्या महारोगावर इलाज करा आणि मग आमच्या दुनियेच्या वाटेला जा.

**जानकी :** राघूशेट, मघापासून तुम्ही 'आमची दुनिया, तुमची दुनिया' या भाषेत बोलताहात. आपण सगळे जगतो राहातो ती दुनिया एकच आहे हे—

**राघूशेट :** ( कडाडत ) गलत्... बिलकुल गलत्. तुमच्या दुनियेशी आमच्या दुनियेचा काही संबंध नाही. संबंध असलाच तर तो भीक घालण्या–मागण्यापुरता, दारू गाळण्या–विकण्यापुरता आणि दरमहाचे हप्ते देण्या–घेण्यापुरता. बास... बाकी काही सोयर सुतक नाही. आमची दुनिया म्हणजे कुष्ठरोग झालेल्यांची दुनिया. ज्यांना बघताक्षणीच अब्रूदार इज्जतवाल्यांच्या पोटात गोळा उठतो, मस्तकात तिडीक जातं आणि डोळ्यांत भय उसळतं, त्यांची दुनिया. ज्यांच्या रोगावर डाक्तर दवापाणीसुद्धा करायला राजी नसतात त्यांची दुनिया. कुष्ठरोग झाल्याशिवाय कोणालाही ही दुनिया दिसत नाही. कळत नाही की कुणाचं इथं पाऊल पडत नाही. पण एकदा ही दुनिया दिसली, कळली आणि येऊन चिकटली की सुटत नाही. कुष्ठरोगी अगदी खडखडीत बरा झाला तरी या दुनियेचा बिल्ला कपाळावरून निघत नाही. ( थबकून ) एरवी हायस्कुलात पहिल्या चार इयत्ता पहिला नंबर मिळवून पास होणाऱ्या कोणा ऐका राघूला 'शेट' होण्यासाठी हातभट्टी कशाला पेटवावी लागली असती ? ते सोडा ताईसाहेब, ते विसरा ! तुमचा नवरा एक भला पण महामूर्ख माणूस आहे. त्यानं तुमच्याशी लग्न केलं म्हणूनच तुम्ही बचावलात. एरवी नाक मुठीत धरून बापाच्या पाठोपाठ तुम्हाला आमच्या दुनियेत आसरा घ्यावा लागला असता. ( थबकून ) साहेब, तुम्हाला राघूशेटचा आणि आमच्या वाल्मिक नगराचा पुरता बंदोबस्तच करायचाय ना ? अगदी साधी आणि सोपी गोष्ट आहे. तुमच्या दुनियेतल्या मनाच्या महारोग्यांना कुष्ठरोग्यासारखे वाळीत टाका. अगदी तद्दन कुष्ठरोग्यासारखे वागवा. आणि मग बघा चमत्कार. आहे तुमच्यात ही हिम्मत ? ( हसतो ) सगळेच कुष्ठरोगी ! कोण कोणाला वाळीत टाकणार ? नेकीचाच माणूस वाळीत पडायचा. ( हसतो )

**भाई :** राघूशेट, तसा काही जालीम इलाज करायची वेळ येईल तेव्हा मी माघार घेणार नाही की तुमचीही गय करणार नाही. पण आता स्वच्छच सांगतो. शरीराचा काय किंवा मनाचा काय, महारोग पुरता निपटून काढायचा, तर त्यासाठीसुद्धा लहान मुलानांच हाती धरलं पाहिजे, याबद्दल माझी खात्री झालीय. मी तेच करणार आहे. बाकी सगळे मुर्दाड बनचुके— ते हप्तेवाले, तुम्ही हातभट्टीवाले आणि ते दारूबाज आपल्या कर्मानं मरतील तेव्हा खुशाल मरोत. मला ती घाण या घडीला तरी उपसायची नाहीये. पण म्हणूनच मी तुम्हाला विचारतोय—तुमच्या वाल्मिक नगरातली छोटी मुलं तुम्ही माझ्या स्वाधीन करायला तयार आहात का ?

**राघूशेट :** ( न्याहाळत हसतो. मग ) हूं . . . मतलबाला पक्के आहात साहेब तुम्ही बघू. . . विचार करायला हवा. वस्तीवरल्या माणसांचा विचार घ्यायला हवा. किती मुलं खुषीनं जायला तयार आहेत, किती आईबाप मुलांना जाऊ द्यायला राजी आहेत, ते पाहायला हवं.

**भाई :** ठीक आहे. तुम्ही चौकशी करून ठेवा. आम्ही पुन्हा येऊ.

**राघूशेट :** छे छे तुम्ही तसदी घेऊ नका साहेब. मीच येईन केव्हातरी.

**भाई :** ते तर फारच उत्तम. जानकी, निघायचं ना आपण ?

**राघूशेट :** साहेब तुम्ही फार कडक शिस्तीचे आहात असं ऐकतो.

**भाई :** ( थबकून न्याहाळत ) ते खरंय ( थबकून ) मग ?

**राघूशेट :** नाही... एवढ्या कडक शिस्तीत सुद्धा तुमच्या वस्तीवरली तुमच्या मर्जीतली माणसं बाहेर जाऊन लफडी करतात... याचं आश्चर्य वाटतं. ( हसतो ).

**जानकी :** हा प्रश्न तुम्ही सरळपणानं विचारलेला नाहीये राघूशेट. तुम्हाला नेमकं काय म्हणायचंय ?

**राघूशेट :** ( छद्मीपणानं ) म्हणायचं म्हणजे इतकंच की, ज्याला मी एकदा अद्दल घडवली म्हणून त्यावेळी तुम्हाला घुस्सा आला त्या तुमच्या धनाची हीरोगिरी अजून संपलेली नाहीये.

**भाई :** कोण धनाऽ ? छे छे शक्यच नाही.

**राघूशेट :** आमच्या वस्तीवरल्या एका तरुण पोरीला फूस लावून पळवून न्यायच्या उद्योगात तो गुंतलाय. काय हणमंतराव ?

**हणमंतराव :** शेवंतीशी तो लग्न करणार आहे म्हणतात.

**भाई :** लग्न ? साफ खोटं आहे. श्रमानंद नगरातल्या कुष्ठरोग्यांना लग्न करायची परवानगी नाही.

**किसन :** खंडोबाच्या देवळात त्यांच्या आणाभाका सुद्धा झाल्यात धनी.

**भाई :** हा काय प्रकार आहे जानकी ?

**जानकी :** धनाला विचारू या आपण.

**राघूशेट :** विचारा आणि वेळीच लगाम घाला हरामजाद्याला. उगाच त्याच्यावरून तुमच्या—आमच्यात दुष्मनी नकोय.

**भाई :** तुमच्या इशाऱ्याबद्दल आभारी आहोत आम्ही. बराय येतो आम्ही

[ दोघेही जायला निघतात तशी— ]

**राघूशेट :** थांबा साहेब. हणमंतराव, माझ्या एक लक्षात आलं नाही पण तुमचाही भेजा खलास झाला काय ?

**हणमंतराव :** काय झालं शेट ?

**राघूशेट :** अरे कधी नव्हे ते हे साहेब लोक तिकडच्या दुनियेतून पाहुणे म्हणून आपल्या वस्तीवर आले, त्यांचा काही रीतसर पाहुणचार तर कराल ?

**हणमंतराव :** मी विचारणारच होतो आपल्याला शेट, पण–

**जानकी :** त्याची काही गरज नाहीये राघूशेट.

**राघूशेट :** असं कसं ताईसाहेब ? किसन, लेको भर बाजारात अंगावरल्या जखमांची आरास मांडीत, मिळेल त्या भिकेवर आणि उष्ट्या–खरकट्यावर तुम्ही एकेकाळी पोसलात, त्या उपकाराची थोडी तरी याद ठेवाल की नाही ? वाड्यावर जा आणि फ्रीजमधून कोकाकोला घेऊन ये. जा पळ.

**भाई :** थांब किसन. राघूशेट, आम्हाला दोघांनाही हा पाहुणचार करायची काही गरज नाहीये. कोकाकोलाच काय पण काहीही पेय आम्हाला नकोय.

**राघूशेट :** देशी नाही, इम्पोर्टेड कोकाकोला साहेब–

**भाई :** तरी देखील नको.

**राघूशेट :** काही भ्यायचं कारण नाही साहेब ! ( छद्मीपणानं ) आमचे हात बाहेरच्या बाटलीला लागले असले तरी आतला कोकाकोला एकदम् 'स्वच्छ आणि सुंदर'– ( हसत ) आपल्या गावासारखा.

**जानकी :** ( हसून ) कुष्ठरोगाच्या स्पर्शाला घाबरून आम्ही नको म्हणतोय असं वाटलं की काय राघूशेट तूम्हाला ? तर मग तूम्ही नुसतेच उर्मट नाहीयेत, ( थबकून न्याहाळत ) अडाणी देखील आहात.

**राघूशेट :** अडाणी ? मी ? तो कसा काय हो ताईसाहेब ?

**जानकी :** सांगते.

( भाईंच्या डाव्या हाताची सदऱ्याची बाही खचकन् वर खेचते, तशी )

**भाई :** ( चटकन् हात सोडवून घेत ) नाही नाही जानकी... त्या गोष्टीचा पुन्हा कधी कोठे उच्चार करायचा नाही असं आपलं ठरलं होतं. भानावर ये.

**जानकी :** माझं भान सुटलंय असं समजू नका तुम्ही. केवळ फुशारकी मारण्यासाठी मी त्याचा उच्चार करीत नाहीये, पण या एका सैतानाच्या बच्च्याला जाग येतेय का एवढंच मला पाहायचंय. इकडं पाहा राघूशेट ( पुन्हा भाईंच्या हाताची अस्तनी वर करून कोपऱ्याजवळची धमनी दाखवीत ) कलकत्त्याच्या इन्स्टिट्यूट-मध्ये भाई कुष्ठरोगाचा अभ्यास करीत होते त्या वेळी टोचून घेतल्याचे वण अजून दिसताहेत.

**राघूशेट :** ( बसल्या जागेवरून पाहात ) काय टोचून घेतलं होतं ?

**जानकी :** महारोगाचे जंतू.

**राघूशेट :** ( ताडकन् उठत किंचाळत ) महारोगाचे जंतू ?

**भाई :** होय महारोगाचे जंतू.

**राघूशेट :** ( जवळ जाऊन पाहात ) महारोगाचे जंतू तुम्ही जाणूनबजून मुद्दाम टोचून घेतले म्हणता ?

**जानकी :** एकदा नव्हे दोन वेळेला. पहिल्या टोचण्याचा परिणाम झाला नाही तेव्हा जखमा वाहणाऱ्या कुष्ठरोग्याच्या जखमेतले जंतू काढून ते टोचून घेतले भाईंनी.

**राघूशेट :** ( थरारत ) प...पण कशासाठी ?

**भाई :** तुमचा काय अंदाज आहे ? पैशाचं मोठं घबाड मिळवण्यासाठी ?

**राघूशेट :** न...नाही नाही ..पण हा काय वेडेपणा केलात साहेब ?

**भाई :** राघूशेट, महारोग हा फक्त मनुष्यप्राण्यालाच होणारा रोग आहे. त्याची लस शोधून काढायची तर त्यासाठी माणसाच्या शरीरावरच प्रयोग करायला हवेत. अशा प्रयोगासाठी कोणता धडधाकट माणूस खुषीनं आपलं शरीर देईल ?

**राघूशेट :** म्हणून तुम्ही आपलं शरीर देऊ केलंत ?

**भाई :** कोणीतरी हा वेडेपणा करायलाच हवा होता, नाही का ?

**राघूशेट :** त ... तुम्हाला महारोगाची भीती नाही वाटली ?

**भाई :** भीती ? ( हसतो ) कधी काळी पूर्वी एकदाच वाटली होती. अगदी दरदरून घाम फुटून पळून जाण्याइतका, महारोग्याला नुसता बघून मी जाम घाबरलो होतो. तेव्हा घाबरलो, म्हणून तर श्रमानंदाचं एवढं रणांगण मांडून पाय रोवून मी उभा राहिलोय इथं. एकदा लढायचं ठरल्यावर मग भीतीबीती पार पळाली.

**राघूशेट :** ताईसाहेब, तुम्ही त्यांना रोगाचे जंतू टोचून घ्यायला परवानगी दिलीत ?

**जानकी :** रोगाशी लढायचं ठरल्यावर कोणीतरी या टोकाला जायलाच हवं की ? त्यांच्या ऐवजी मी कलकत्त्याला गेले असते तर—

**भाई :** राघूशेट, आम्ही कोणतीही गोष्ट एकमेकांच्या विचारानं करतो. आमच्यात दुमत संभवूच शकत नाही.

**राघूशेट :** दोन वेळा जंतू टोचून घेऊनही तुम्हाला काहीही झालं नाही ?

**भाई :** काहीएक परिणाम झाला नाही. माझ्या रक्तातल्या पेशी महारोगाच्या जंतूंना फार भारी ठरल्या असल्या पाहिजेत. ( हसतो ) पण तसं काय, कुष्ठ रोग्यांच्या गराड्यात राहातो आम्ही. तेव्हा हा रोग आम्हाला केव्हाही होऊ शकेल.

**राघूशेट :** पण मला सांगा साहेब—

**भाई :** तुम्हाला सांगायची ती मुद्द्याची गोष्ट एवढीच आहे राघूशेट, की कुष्ठरोग्याचा बाटलीला हात लागला म्हणून कोकाकोला नको म्हणायला मी घाबरट माणूस नाहीये. आता कोणत्याही अवस्थेतल्या रोग्याला आणि रोगाला मी भीत नाही एवढे समजून चला. तुम्ही माझी मागणी मान्य करा, मग कोकाकोलाच काय घेऊन बसलात ? मी तुमच्या घरी येऊन तुमच्या पंगतीला जेवायला बसेन. मग तर झालं ? चल जानकी. [ दोघेही जातात ]

**राघूशेट :** ( चकित होऊन आ वासून बघत राहत )
हे . . . हे वेणं काही वेगळंच आहे, हणमंतराव ( थबकून किंचाळत ) आयलाऽ . .
हा माणूस आहे, का राक्षस आहे, का देव आहे ?
[ हणमंतराव आणि किसनही थक्क होऊन बघत असतानाच – अंधार ]

**प्रवेश पहिला संपला**

# अंक दुसरा

## प्रवेश दुसरा

[ आणखी काही दिवस उलटले आहेत. भाईंची पर्णकुटी. पहिल्या अंकात पाहिले होते तेच दालन. वेळ सायंकाळची. रंगमंच उजळतो तेव्हा मुरलीधर एका टेबलावर फाईलमध्ये डाकेने आलेली पत्रे लावून ठेवण्याचा उद्योगात गुंतलाय. क्षणभरानं बाहेरून बोलत शांताक्का आणि दामले मास्तर येतात. ]

**मास्तर :** तुम्ही म्हणता ते खरंय शांताक्का, पण थोडा जमाखर्चाचा विचार करायला नको का ? तुम्ही हा सगळा पैशाचा कारभार माझ्यावर सोपवलाय म्हणून इशारा देणं मला भाग पडतंय. पसारा वाढतोय. आवाक्याच्याबाहेर जातोय.

**शांताक्का :** विशेष कोणाची पत्रं आली आहेत का रे आज मुरली ?

**मुरली :** कॅनडाहून जे मिशन येणार आहे त्यांनी आपला प्रोग्रॅम पाठवलाय आज. बाकी अशीच इतर काही. भाई बघतील आल्यावर. या पेशंट लोकांची मला गंमत वाटते शांताक्का. अहो— ‘ सध्या जागा नाहीये. इतक्यात येऊ नका ’ म्हणून कळवलं तरी प्रत्येक गाडीला माणसं येतच आहेत. जागा नसली तर झाडाखाली राहू म्हणतात.

**शांताक्का :** बसा मास्तर. तो म्हणाली म्हणून रोग्यांना झाडाखाली ठेवता येईल का आपल्याला ? पत्र्याच्या शेड्स तरी उभ्या करायलाच हव्यात आपल्याला. मुरली, अरे ते वासे उभे राहिले की नाही बघ बाबा जाऊन. पत्रे केव्हाच येऊन पडलेत [ मुरली फाईल ठेवून जातो. ]

**मास्तर :** ‘ फूड फॉर पीस ’ नं गहू द्यावयाची तयारी दाखवली होती आपल्याला पण भाईंनी ती मदत नाकारली.

**शांताक्का :** मदत नाकारली नाही मास्तर, गव्हापेक्षा गव्हाचं भांडार निर्माण करणारं उत्पादन तंत्र द्या असं कळवलं आपण त्यांना. म्हणूनच बहिरोबाच्या माळावर आज ट्रॅक्टर्स आणि बुलडोझर्स फिरायला लागले ना ?

**मास्तर :** शांताक्का, खाणारी तोंडं किती वाढली आहेत ते—

**शांताक्का :** नुसती तोंडं वाढली आहेत म्हणू नका, तोंडाबरोबर दोन दोन हातसुद्धा वाढताहेत. उगीच घाबरू नका मास्तर आणि घबराट पसरवू नका. अडचणी

आल्या तर त्यांना तोंड द्यायलाच हवं.

**मास्तर :** शांताक्का मला वाटतं आता आपण देणग्या मिळवायला—

**शांताक्का :** मास्तर, आपण देणगीसाठी हात पसरून हिंडत नसलो तरी आलेली देणगी आपण कधी नाकारलेली नाहीये. फक्त देणगीची रक्कम उद्योग आणि अन्नधान्य निर्माण करण्यासाठीच वापरायची, पोट भरण्यासाठी नाही, एवढाच भाईचा हट्ट आहे आणि तो बरोबर आहे.

**मास्तर :** रोग्यांचे हात उद्योगधंद्यात आणि शेतात राबतात हे ठीकच आहे शांताक्का, पण श्रमानंद नगरातल्या स्वयंपाकघरात कोण कष्ट उपसतं? हाताखाली बऱ्या झालेल्या बायका राबत असल्या तरी चुल्यापुढं तुम्हाला आणि जानकीलाच धड-पडावं लागतं, नव्हे का? तेही दवाखान्यातलं आणि इस्पितळातलं काम सांभाळून.

**शांताक्का :** त्याबद्दल आमची काही तक्रार आहे का?

**मास्तर :** तक्रार तुमची नाही आणि जानकीचीही नाही. पण आता मला वाटतं... कदाचित मी तिचा बाप आहे म्हणून वाटत असेल की जानकीला आता विश्रांती मिळायला हवी... काही दिवस हवापालटही व्हायला हवा. म्हणजे... मला असं म्हणायचंय शांताक्का—

**शांताक्का :** तुम्हाला काय म्हणायचंय ते मला कळलंय मास्तर. जानकीला दिवस आहेत हे मला ठाऊक आहे. मी तिची सर्वतोपरी काळजी घेतेय. पण त्यालाही मर्यादा आहेत. तिनं कधी तुमच्यापाशी—

**मास्तर :** छे छे... भलतंच काय शांताक्का? मी हा विषय तुमच्यापाशी काढला हे तिला कळलं तर ती माझ्यावर भडकेल.

**शांताक्का :** ते मला ठाऊक आहे. गरीब घरातल्या गरोदर मुलींना जेवढी विश्रांती मिळते ती जानकीलाही मिळतेय... मिळणार आहे. हवापालट करण्याबद्दल तुम्ही बोललात. मी तिला तुमच्या कोणत्याही नात्यागोत्यातल्या माणसांच्या घरी पाठवायला तयार आहे. तिला आपल्या घरात ठेवून घेणारा एखादा तरी मायेचा पूत तुम्हाला दिसतोय का?

**मास्तर :** ( मान खाली घालून ) तसा कोणी असता, तर पुलाच्या कमानीखालून मला इथं आणायची पाळी, शांताक्का तुमच्यावर आली असती का?

**शांताक्का :** झालं तर! ती इथं आहे तीच ठीक आहे. तिला इथंच सुख अंगी लागेल. (थबकून) तिच्याशी माझं बोलणं झालंय याबद्दल. तिचंही माझ्यासारखंच मत आहे.

**मास्तर :** ते मला ठाऊक आहे शांतक्का, पण ( थबकतात )

**शांताक्का :** ( वाट पाहून ) थबकलात का? पण काय? ( वाट पाहून ) मास्तर तुमचा माझ्यावर आणि भाईवर पूर्ण विश्वास आहे ना?

**मास्तर :** ( गलबलून ) हे—हे काय विचारता शांताक्का? तुमच्यावर नाही तर मी

कोणावर विश्वास ठेवणार?

**शांताक्का :** मग मी काय सांगते ते ऐका. तुमच्या मनात काय आलं ते मला कळलंय. जानकी माझी सून असली तरी मी तिला मुलीसारखीच वागवतेय, तिची सगळ्या परीनं काळजी घेतेय. ती इथं या आमच्या घरातच बाळंतीण होणार आहे (थबकून) तिचं मूल इथंच वाढणार आहे... या श्रमानंद नगरातच इतर मुलांच्या बरोबरीनं लहानाचं मोठं—

**मास्तर :** (आवेगानं) नाही नाही शांताक्का, तसं होता कामा नाही!

**शांताक्का :** का नाही?

**मास्तर :** तुम्हाला ठाऊक आहे शांताक्का, या एका रोगापायी मला आणि माझ्या बायकोला काय काय छळ सोसावा लागलाय तो. पण हा छळ आमच्यापुरता राहिला नाही. केवळ आमच्या पोटी जन्म घेतला म्हणून जानकीलाही तो वनवास अगदी अकारण भोगावा लागला.

**शांताक्का :** थांबा. तसं म्हणू नका मास्तर. जानकीशी लग्न करायला एक भाई उभा राहिलाच ना?

**मास्तर :** होय होय राहिला. त्याबद्दल तुमचे आणि भाईंचे माझ्यावर आणि माझ्या लेकीवर डोंगराएवढे उपकार आहेत. पण—

[हा संवाद ऐकतच क्षणमात्र दाराशी, बाहेरून आलेले भाई आणि जानकी थबकतात, ते उसळून आत येत— ]

**भाई :** ही उपकाराची भाषा आधी बंद करा मास्तर. या श्रमानंद नगरात कोणी कोणावर उपकार करीत नाही की दया दाखवीत नाही. इथं अन्नवस्त्रच नव्हे तर प्रेमसुद्धा मिळवावं लागतं, कमवावं लागतं हे ठाऊक आहे ना तुम्हाला?

**मास्तर :** होय ठाऊक आहे, पण—

**भाई :** मी आणि जानकीनं एकमेकांना पसंत केलं म्हणूनच आमचं लग्न झालं, हे खरंय ना?

**मास्तर :** खरंय.... खरंय...

**जानकी :** मान खाली घालून तुम्ही पुन्हा पुन्हा असं लाचारीनं का बोलता बाबा? माझ्यावर काय असा प्रसंग कोसळलाय म्हणून—

**मास्तर :** रागावू नकोस बेटी. मी काय म्हणतो ते ऐकून तर घे.

**जानकी :** तुम्हाला काय म्हणायचंय ते मी पुष्कळवेळा ऐकलंय. तुमच्या मुद्रेवर ते कायमचं कोरलेलं मला दिसतंय. मी वनवासात नाहीये आणि तुम्हीसुद्धा इथं आल्यापासून वनवासी राहिलेला नाहीत. आता तर तुम्ही पुरते बरे झाला आहात.

**मास्तर :** होय होय जानकी, मी पुरता बरा झालोय. पण शहरवासीय लोक अजून फटकून दूर राहतात. मला दूर ठेवलं तर ठेवू द्यात. पण उद्या तुझ्या पोटी जन्माला

येणाऱ्या बछड्याला सुद्धा हा शाप भोगायलाच हवा का?

**भाई :** मास्तर, श्रमानंद नगर हा शाप नाहीये. शापित माणसांना एकमेकांच्या आधारानं आपण हा उःशाप उभा करतोय. शहरवासीय माणसं आपल्यापासून फटकून दूर राहिली तर राहू द्यात. किती दिवस ते दूर राहतील? आजवर आहे तशी परिस्थिती कायम राहणार असं तुम्ही का धरून चाललात? लोक बदलताहेत... बदलणार आहेत... आपण त्यांना बदलायला लावणार आहोत.

**जानकी :** आणि त्याची थोडी फार झळ माझ्या मुलाला लागणार असली तर मग त्यानंही ती सोसायलाच हवी. शहरवासीयांच्या दांभिकपणापेक्षा श्रमानंदनगरात राहूनच तो अधिक सच्चा आणि शहाणा होईल.

**शांताक्का :** मास्तर, तुम्ही हा हताशपणा सोडून द्या. मनावरली सगळी मरगळ झटकून टाका. तूम्हाला काय झालंय ठाऊक आहे का? औषधोपचारानं तुम्ही बरे झाला असलात तरी तुमच्या मनाच्या जखमा पूर्णपणे भरून आलेल्या नाहीत. तुमच्या मनाला बसलेल्या धक्क्यातून तुम्ही अजून पुरते सावरला नाहीत.

**जानकी :** बाबा तुम्ही शाळेत शिकवता पण तुमच्या शिकवण्यात पूर्वीचा उत्साह राहिलेला नाही. या काळ्या कोशातून तुमची तुम्हीच प्रयत्नाची पराकाष्ठा करून सुटका करून घेतली पाहिजे.

**मास्तर :** तुम्ही म्हणता ते काही खोटं नाही. पण म्हणजे मी काय करायला हवं?

**भाई :** मी सांगतो. मास्तर शाळेची वेळ संपल्यावर तुम्ही रोज सायंकाळी विहिरीच्या काठावर नुसते विचार करीत बसता ना, ते सोडून द्या. बागेत फुलझाडांची मशागत करायला या. सगळ्या पोरांच्या संगतीत दिलखुलासपणे वागडायला या. बघा तरी कळ्यांची फुलं होताना बघण्यात काय मजा येते ती.

**मास्तर :** ( डोळे लखलखत वर पाहात ) मी...मी येऊ तिथं? चालेल?

**भाई :** अहो चालेल का म्हणून काय विचारता? हे सगळं राज्य तुमचं आहे. मास्तर, हे श्रमानंद नगर मला नुसतं कुष्ठरोग्यांचं रुग्णालय आणि करुणालय करायचं नाहीये. इथं सृष्टीतला सगळा आनंद चारी दिशांनी ओसंडून गेला पाहिजे.

**जानकी :** खरंच बाबा उद्यापासून तुम्ही—

**भाई :** उद्यापासून कशाला? आजपासून...आत्ता सुरुवात करा. आनंदोत्सवाला मुहूर्त लागतो का? उद्यानाकडं चला तुम्ही. मी येतोच आहे तुमच्या पाठोपाठ.

**मास्तर :** काही हिशेबाबद्दल बोलायचं होतं.

**भाई :** ते उद्या बोलू. अशी सुंदर श्रावणातली कोवळ्या उन्हाची सायंकाळ पुन्हा येणार आहे का? तुम्ही बागेत चला आधी.

**मास्तर :** ( प्रसन्न स्मित करून ) तुम्ही म्हणजे असे आहात...येतो मी. [ मास्तर जातात. ]

**जानकी :** बाबांच्या बाबतीत मी तर अगदी हतबुद्ध झालेय.

**भाई :** ( बसत ) डोन्ट लूज पेशन्स जानकी. ही विल बी ऑल राइट !

**शांताक्का :** छोटा नातू अंगाखांद्यावर खेळायला लागला की त्यांचं जगच बदलून जाईल बघ.

**भाई :** ( पत्रांची फाईल उचलीत ) प्रश्न, प्रश्न, सगळे प्रश्नच. वृद्धांचे वृद्ध म्हणून, तरुणांचे तरुण म्हणून आणि मुलांचे मूल म्हणून– पण प्रश्नच. ( फाईल झराझरा चाळू लागतो )

**शांताक्का :** ( हसून ) वेड्या महंमदाच्या जिद्दीनं एक गाव वसवायसाठी जबाबदारी घेतलीस, मग प्रश्नाशिवाय काय वाट्याला येणार तुझ्या ?

**भाई :** आय डोन्ट रीग्रेट फॉर दॅट !

**जानकी :** चहा घेणार ना तुम्ही ?

**भाई :** चहा नको मला. साईटवर सगळ्यांच्या बरोबर घेतलाय मी. पण जरा गरम पाणी आणलंस तर पाय शेकीन. अगदी पायाचे ( पावलं चोळीत ) तुकडे पडायची पाळी आलीय.

**जानकी :** बागेत जाणार आहात तुम्ही स्वतः ?

**भाई :** जायलाच हवं की. तुझ्या बाबांना फुलांत आणि मुलांत रुजवायचं ठरलंय ना ?

**जानकी :** ( हसून ) बाबांचं आपलं निमित्त. तुम्हालाच फुलांमुलांत, मातीत धुडगूस घालायला मनापासून आवडतं.

**भाई :** तसं म्हण हवं तर. पण आज तुझी सुटका नाही. तुलाही आज ओढून घेऊन जाणार आहे. मातीत खेळायला.

**जानकी :** छे ग बाई ! मी नाही हो यायची. आज दिवसभर मी दवाखान्यात उभीच्या उभी आहे.

**भाई :** म्हणून काय झालं ? सगळेच उभे आहेत. श्रमानंद नगरात बसतो कोण ? अगं आई, जपानमध्ये तर ऑफिसात फक्त एका टाईपिस्टला तेवढी बसायला खुर्ची असते. बाकी साहेबापासून चपराश्यापर्यंत सगळे ऑफिस टाइमात उभेच्या उभे.

**शांताक्का :** अरे तिच्या अवस्थेचा काही विचार करशील की नाही ? नाजूक आहे ती. तुझ्यासारखी रानदांडगी नाहीये.

**भाई :** अहाऽऽ... किती कौतुक किती कौतुक ?

**जानकी :** काऽ ? मत्सर वाटायला लागला वाटतं ?

**भाई :** छे छेऽ . अगं मी सुद्धा तुझं कौतुक करण्यासाठीच तुला बागेत बोलावतोय. बघतेस काय अशी ? काल तूच तर म्हणाली होतीस... 'माती खावीशी वाटतेय' म्हणून.

**जानकी :** ( लाजून किंचाळत ) इश्शऽ... काही तरी काय ऽ ? [ हातातली पर्स

फेकून त्याला मारते आणि लाजून आत पळते. शांताक्का आणि भाई खळखळून हसतात. मग भाई फाईलीतला पत्रव्यवहार चाळू लागतो. तशी–]

**शांताक्का :** दुपारी धना येऊन भेटून गेला मला.

**भाई :** ( एक पत्र पाहून आनंदानं शीळ घालीत ) ओ गुड शो ! आई कॅनडाच्या मिशनचे लोक येताहेत या आठवड्यात.

**शांताक्का :** ठाऊक आहे मला ते.

**भाई :** बघ बघ .. प्रश्न निर्माण झाले की उत्तरंही सापडायला लागतात. आता. आपल्या बऱ्याच अडचणी दूर होतील. विशेषतः—

**शांताक्का :** मी काय सांगतेय ते ऐक. दुपारी धना येऊन भेटून गेला मला.

**भाई :** मला कळलंय ते.

**शांताक्का :** त्याच्याबद्दल काय करायचं ठरवलं आहेस तू ?

**भाई :** ठरवणारा मी कोण ? ठरवायचंय आपण सगळ्यांनी मिळून.

**शांताक्का :** मला काय वाटतंय ते सांगू ?

**भाई :** नको. आता तुला काय वाटतं आणि मला काय वाटतं त्या खोलात जाण्यात अर्थ नाही. जानकीनं परस्पर निर्णय घेऊन टाकला आणि धनाला सांगितला देखील.

**शांताक्का :** काय ? निर्णय घेतला ? धनाला सांगितला देखील ?

**भाई :** हो. धनाला तिनं लग्न करायला परवानगी दिलीय.

**शांताक्का :** छे छे... असं कसं होईल ?

**भाई :** ' कसं होईल ' ते तू जानकीलाच विचार.

[ हे ऐकतच जानकी पाण्याचं घमेलं घेऊन येते आणि भाईच्या पायाशी ठेवते. भाई पाण्यात हात घालून बघतो तशी–]

**जानकी :** घाबरू नका. आधणाचं पाणी नाही ठेवलंय मी.

**भाई :** ( पाण्यात पाय ठेवीत ) काय नेम सांगावा तुझा ? नवऱ्याच्या पायावर चक्र पडलंय. त्याला घरातच डांबून ठेवायला—

**जानकी :** पुष्कळ मार्ग आहेत माझ्यापाशी. हा असला अघोरी प्रकार तुम्हालाच सुचेल. आठवतंय का— रात्रीच्या अंधारात उभी पिकं कापून न्यायला आलेल्या गुंडाच्या अंगावर उकळतं पाणी टाकून–

**भाई :** फार जुनी... त्रेता युगातली गोष्ट झाली ती.

**जानकी :** ( मिस्किलपणे ) होय का ? मग आजची गोष्ट कोणती ?

**भाई :** ती आई तुला विचारतेय. तिला उत्तर दे.

[ जानकी शांताक्कांच्याकडे बघते. दरम्यान त्या लोकरीचा स्वेटर विणीत गंभीरपणे बसल्या आहेत. क्षणार्ध बोचक शांतता. भाई फाईलीतली पत्रं बघू लागतो. ]

**शांताक्का :** (वर न बघताच) जानकी, तू धनाला लग्न करायला परवानगी दिलीस ?

**जानकी** : होय आई.

**शांताक्का** : आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर ?

**जानकी** : होय आई. जबाबदारी मी घेतली पण निर्णय मात्र आपल्या सगळ्यांचा आहे, असं सांगितलं मी त्याला.

**शांताक्का** : अगं पण जानकी, आपण सगळे विचार करीत होतो अजून त्याबद्दल.

**जानकी** : इतकं विचारात पडण्यासारखं त्यात काही गहनगूढ गंभीर नाहीये, अशी माझी खात्री पटली तेव्हा निर्णय मीच घेऊन टाकला. तुम्हाला दोघांनाही क्षणाची फुरसद नव्हती तरी—

**शांताक्का** : हा अधिकार बये तुला कोणी दिला ? केव्हा दिला ?

**जानकी** : आई, हा अधिकार तुम्ही मला दिलात. लग्न करून या घरात आणलीत तेव्हाच दिलात.

**शांताक्का** : जानकी, तू हे काय बोलते आहेस ?

**जानकी** : आई, तुमची सून होण्याआधी मी तुमच्या हाताखाली काम करणारी रुग्णालयातली एक सिस्टर होते. इमर्जन्सीमध्ये निर्णय कसे घ्यायचे असतात, ते तुम्हीच मला शिकवलं होतंत.

**भाई** : ( ताडकन् वर पाहात ) पण जानकी, ही इमर्जन्सी होती का ? थोडे दिवस थांबला असता धना तर काय—

**जानकी** : ( मिस्किलपणे ) लग्न करणाऱ्यांना किती घाई असते ते निदान लग्न झालेल्यांनी तरी विसरू नये. [ हसते. शांताक्का सुद्धा हसतात ]

**भाई** : कळलं ! कळलं ! तरी देखील—

**जानकी** : तरी देखील कुष्ठ रोग्यांनी लग्न करायला तुमचा किती तीव्र विरोध होता, ते मला ठाऊक होतं. तुम्ही एकदा हट्टाला पेटलात म्हणजे, आपलं तेच खरं करून दाखवाल; सगळा शहाणपणाचा युक्तिवाद पालथ्या घड्यावरल्या पाण्याप्रमाणे ठरेल हे मला माहीत होतं, म्हणून मी निर्णय घेतला आणि सांगून टाकला.

**भाई** : ( चिडून ) बघ बघ आई, ही कशी बोलतेय ती; जणू काही मी कोणी एक हुकूमशहाच आहे. आणि या श्रमानंद नगरात —

**जानकी** : ( मिस्किलपणानं ) शंका आहे की काय ? तुम्ही एकशे एक टक्के हुकूमशहाच आहात. फक्त आईंचा तुमच्यावर वचक आहे म्हणून—-

**भाई** : ( उसळून ) आई, तुझं काय म्हणणं याच्याबर ?

**शांताक्का** : ते तुमचं तुम्ही दोघं पाहून घ्या. मला काहीही म्हणायचं नाहीये. पण जानकी, आज तू एका धनाला लग्न करायला परवानगी दिलीस खरी पण उद्या त्याचं उदाहरण पाहून इतर कुष्ठरोगी स्त्री पुरुषांना लग्न करायची इच्छा झाली तर ? त्यांना आपण कसे काय अडवणार आहोत ?

**जानकी :** पण आई अडवायचं मुळी कारणच काय ? लग्न करून संसार करावासा वाटणं ही माणसाची नैसर्गिक इच्छा आहे ना ?

**भाई :** ( ओरडून ) माय डीयर गुड लेडी, ही माणसं रोगी आहेत, कुष्ठरोगी. डोन्ट फरगेट दॅट !

**जानकी :** सो व्हॉट ? कुष्ठरोग्यांनासुद्धा प्रेम करण्याचा आणि सहजीवन जगण्याचा अधिकार नाही का ? आई मला तर वाटतं की कुष्ठरोग्यांना आपण लग्न करून संसार थाटायची संधी दिली तर, ती दोघे परस्परांची अधिक चांगली काळजी घेतील; दु:खात तर सहभागी होतीलच, पण त्यापेक्षा एका नव्या चैतन्याचे कोवळे किरण मिळून ती तृप्त, आनंदी होतील. आई, मला सांगा, आपण ही आनंदभूमी घडवतोय की ब्रह्मचाऱ्यांचा कर्मठ मठ उभा करतोय ?

**शांताक्का :** ( क्षणार्ध थबकून ) दोघांकडं मान वर करून आळीपाळीने पाहत ) माझ्याकडं काय पाहतो आहेस भाई ? अरे माझं निमित्त करून जानकीनं प्रश्न तुला टाकलाय. तिला पटेलसं उत्तर दे. ( पुन्हा मान खाली )

**भाई :** पटवून घेतलं तर उत्तर अगदी सरळ साधं सोपं आहे. लग्न करायला कुष्ठ रोग्यांना तुम्ही परवानगी दिलीत की मुलं होऊ देण्याचा त्यांचा हक्क तुम्हाला मानावाच लागेल. कारण ही म्हणणार की ती एक सहजात प्रेरणा आहे आणि आईचा तो हक्क आहे. कुष्ठरोग्यांना मुलं व्हावीत का, हे मुळी विचारण्यातच अर्थ नाही. कारण ही म्हणणार की कुष्ठरोग अनुवंशिक नाही. जन्मल्यापासून मुलांना वेगळं वाढवलं तर त्यांना धोका पोचत नाही. पण मुलांना असं वेगळं वाढवायची व्यवस्था आपल्याकडं आहे का, असा प्रश्न विचारला तर ही म्हणणार, नसेल तर तशी व्यवस्था केली पाहिजे. दॅट्स ऑल.

**जानकी :** मी काय म्हणणार ते सगळं तुम्हीच सांगून टाकताहात. जरा मला सांगू द्याल का ?

**शांताक्का :** सांग सांग मुली काय ,सांगणार आहेस तू ?

**जानकी :** भाईंनी मी काय म्हणणार म्हणून जे जे सांगितलं तसलं. मी काही एक म्हणणार नाही. जोपर्यंत बऱ्या झालेल्या कुष्ठरोग्याना समाजात पूर्वीचं स्थान मिळत नाहीये तोपर्यंत त्यांना मुलं होता कामा नयेत. आपल्या नगरातल्या बहुसंख्य रोग्यांनी हे मान्य केलंय. म्हणून जे रुग्ण मुलं होऊ न देण्याची शस्त्रक्रिया करून घ्यायला तयार असतील त्यांनाच लग्न करायची परवानगी द्यायला हवी.

**भाई :** धनाची तयारी आहे त्याला ?

**जानकी :** होय. दोघांशी बोललेय मी.

**भाई :** जानकी, हे काही खरं नाही. मला काही त्यात तथ्य वाटत नाही.

**जानकी :** त्यात तुम्हाला तथ्य वाटत नसेल तर मग तुम्हाला आणि मला दुसरं एक

पथ्य पाळावं लागेल. रुग्णाइतांना जर विवाहाची परवानगी नसेल तर त्यांच्या डोळ्यांसमोर तुम्हाला आणि मलाही वैवाहिक जीवन जगता येणार नाही. तयारी आहे त्याला तुमची ?

**भाई :** हॅ हॅऽ, काहीतरीच, चमत्कारिक फंटूश बोलू नकोस.

**शांताक्का :** फंटूश तूच आहेस भाई. ती शहाण्यासारखं बोलतेय. ( उठत ) तेव्हा हा प्रश्न संपलाय आता. ( आत निघून जातात )

**भाई :** ( मिस्किलपणे ) बरं वाटलं ना, नवऱ्याचं नाक कापलं गेलं म्हणून ? [ जानकी हसते तशी— ] बरंय... बच्चंजी... आमचाही एक दिवस उगवेल...

**जानकी :** तुमचे सगळेच दिवस उगवतात. एखादा दिवस माझा उगवला तर एवढा जळफळाट ? पाय काढा पाण्यातून. निवून थंडगार झालंय ते. [ भाई पाण्यातून पाय काढतो व तिनं दिलेल्या नॅपकीननं पुसू लागतो. जानकी पातेलं घेऊन आत जाऊ लागते तोच धना येतो. तशी—) धना तुझं काम झालंय रे. आता लग्न कधी करायचं ते जरा सवडीनं ठरवू या.

**भाई** ( मिस्किलपणे ) फार घाई नाही ना तुला ? नाही म्हणजेऽऽ आणखी कोणाकोणाला लग्न करायचंय त्याचा एकदा शोध घे. सगळ्यांचाच दणक्यात बार उडवून देऊ या. काय ?

**जानकी :** काही तरीच काय चेष्टा करता हो ? तो बिचारा—

**भाई :** ही चेष्टा नाही जानकी. माझ्या डोक्यात काही वेगळी चक्रं फिरायला लागली आहेत. या लग्नाचा आपण जरा उपयोग करून घेऊ या.

**धना :** भाई, मी वेगळ्या कारणासाठी आलोय. आपल्या वस्तीवरल्या कामकऱ्यांत एक नवीनच कटकट सुरू होतेय.

**भाई :** कसली नवीन कटकट ?

**धना :** शहरातले दोन युनियन लीडर गेल्या आठवड्यापासून रोज चकरा मारताहेत. आपल्या वस्तीच्या हद्दीबाहेर झाडाखाली त्यांच्या सभा भरताहेत.

**भाई :** माझ्या कानावर आलंय ते. पण धना मी त्यांची पर्वा करीत नाही. माझा आपल्या माणसांच्यावर विश्वास आहे.

**धना :** मला जे दिसतंय त्यावरून एवढा विश्वास टाकण्यासारखी आपली सगळी माणसं सरळ नाहीयेत.

**भाई :** सरळ नाहीयेत ? कोणाकोणाला वाकड्यात शिरायचंय ?

**धना :** इतक्यात मी नांव सांगत नाही, पण काही जणांच्या डोक्यात हवा शिरलीय.

**जानकी :** ( पातेलं ठेवीत ) काय म्हणणं आहे त्यांचं !

[ धना घुटमळतो, थबकतो तशी— ]

**भाई :** ( आवेगानं ) सांग ना ? अरे निदान आज मी कुठं उभा आहे, ते तरी मला

कळू दे. बोऽल...

**धना :** भाई, ही सगळी शेतजमीन, इथली कारखानदारी यावर मालकी हक्क कोणाचा आहे ?

**भाई :** ( थबकून न्याहाळत, कपाळावर आठी ) का ?

**धना :** युनियनचे लीडर आपल्या लोकांना सांगतात, की सगळी मालमत्ता भाईंच्या नावावर आहे. तुम्ही लोक फक्त वेठबिगाराचे धनी आहात.

**भाई :** ( मुद्रा तंग ) अस्सं ! आणखी काय सांगतात ?

**धना :** कूळकायदा लावायला सांगा म्हणतात. कारखानदारीत सुद्धा हिस्सा मागा, म्हणून पढवतात.

**जानकी :** ( संतापानं ) आणि ते पढवतात म्हणून हे नंदीबैल माना डोलावतात. अरे आमच्या मळयासुद्धा, सगळ्या मालमत्तेचा भाईंनी एक सार्वजनिक ट्रस्ट—

**भाई :** थांब जानकी. वाकड्यात शिरणाऱ्यांना वाकडीच उत्तरं दिलं पाहिजेत. होय. धना, सगळ्यांना सांग इथली एकूण एक मालमत्ता, माझ्या एकट्याच्या मालकीची आहे. हां . तुम्ही लोक काम करता; मी तुम्हाला पोटाला घालतो; औषधपाणी करतो; रहायला जागा देतो; शिवाय खर्चाला दोन पैसे देतो. इथं तुमच्या–माझ्यातला व्यवहार खरं म्हणजे संपला. तरी देखील माझ्या एकूण मालमत्तेत तुम्हाला सगळ्यांना वाटणी हवी असली, तर तीही द्यायची माझी तयारी आहे. पण माझी एक अट आहे. तुम्ही सगळे कुष्ठरोगी प्रथम इथं आलात तेव्हा कशा अवस्थेत होता, हे तुम्हाला ठाऊक आहे. तरी सुद्धा मी तुमच्यापैकी प्रत्येकाला महिनान् महिना माझ्या घरात ठेवून घेतलंय. खरंय ना? आता तुम्ही युनियनच्या पुढाऱ्यांना सांगा, तुम्ही श्रमानंद नगरातल्या कुष्ठरोग्यांना, फक्त पंधरा दिवस स्वतःच्या घरात ठेवून घ्या. तेवढं तुम्ही केलंत, तर तुम्ही म्हणाल ते ऐकायची माझी तयारी आहे.

**धना :** ते सोडा हो भाई. ते काय ठेवून घेणार घरात ? कामकऱ्यांना पायाला हात लावू देत नाहीत. कामकऱ्यांचे पैसे घेतात; पण ते सुद्धा नाण्यात आणि नाणी देखील औषधी पाण्यात भिजवून मग खिशात घालतात. आपल्याच माणसांना अकला नाहीत.

**भाई :** ( विचारात पडत ) याच्या पाठीमागं कोणीतरी आहे. नुसते युनियन-लीडर नाहीत जानकी.

**जानकी :** कोणी का असेना, त्याचा काय सवाल आहे ? पण–

**भाई :** ठीक आहे, धना तू जा. पुन्हा कोणी बोलताना ऐकलंस तर आता मी दिलेलं उत्तर अगदी तसेच ठणठणीतपणे सांग त्यांना. जा.

[ धना जाऊ लागतो त्याच वेळी बाहेरून शिवरामदादा येतात. दोघांची दारात

टक्कर व्हायची. पण विजेचा झटका बसावा तसे "अरेऽ अरेऽ जरा बघून चाल" असे ओरडत शिवरामदादा उडी मारून दूर होतात. धना जातो. तशी—]

**भाई :** ( हसत ) काय, काय हा घबराट दादा...? अरे नुसता धक्का लागल्यानं माणसाला कुष्ठरोग होत नाही. त्यातून धना बरा झालाय. ही इज अ बर्न्ट औट केस. तेव्हा पुलाखालच्या कमानीत तुला जायची वेळ येणार नाहीये.

**शिवराम :** हे बघ, तू मला मित्रा म्हणालास तरी चालेल. इथं मी अलीकडं यायचं सोडून दिलंय, हे तुला ठाऊक आहे ना?

**भाई :** मग आजच आमच्यावर मेहेरनजर कशी झाली?

**शिवराम :** एका कामासाठी येणं भाग पडलं. मी आलोय ते—

**भाई :** नगराध्यक्ष म्हणून.

**शिवराम :** बरोबर.

**जानकी :** चहा घेणार ना दादा!

**शिवराम :** चहा? पाणी सुद्धा पिणार नाही मी इथं.

**भाई :** नको तर राहिलं. जानकी तू जा. तयारी कर आपल्याला बागेत जायचंय. तू तयार होईतोवर यांना उरकून टाकतो मी. बसाल तर खरे अध्यक्ष महाराज— की उभ्यानंच बोलणार आहात!

**शिवराम :** बसतो. ( इकडे तिकडे पाहात, चटकन एका आसनावर; हातात गुंडाळी करून आणलेली छोटी चटई पसरून मग ओशाळत हसत त्यावर बसतो. तशी— )

**भाई :** ( हसत ) वा रे बहाद्दर. बघ बघ जानकी. असल्या कातडीबचाऊ नगराध्यक्षांच्या नगरात बऱ्या झालेल्या कुष्ठरोग्यांचं पुनर्वसन करायला निघालो आहोत आपण. व्हॉट अ ज्योक! वा रे वा! ( जानकी जाता जाता वळून बघते. हसते आणि जाते. मग ) बोला, 'स्वच्छ नि सुंदर'वाले दादा. तुम्ही कशासाठी आलात इथं!

**शिवराम :** या दोन-तीन वर्षात इथला सगळा परिसर खूपच बदललाय. अगदी आत शिरताच जो बागबगीचा उभा केलाय तो पाहून तर मी थक्कच झालो. फार फार सुंदर.

**भाई :** तुला आवडली म्हणजे खरंच सुंदर असली पाहिजे आमची पार्क.

**शिवराम :** इतक्या तरतऱ्हेची फुलझाडं मिळाली कुठून तुला!

**भाई :** आच असली म्हणजे मिळतात फुलझाडं. अगदी युरोप—अमेरिकेतून सुद्धा कलमं धावत येतात.

**शिवराम :** आमच्या म्युनिसीपल पार्कच्या सगळ्या माळयांना आणून दाखवली पाहिजे एकदा ही गार्डन.

**भाई :** म्युनिसीपालटीची गोष्ट सोडून दे. तिथं सगळीच माणसं फक्त पाट्या टाकतात.

बाग कधी अशी फुलत नाही.

**शिवराम :** नवल नाही, शहरातले पुरुषच नाही तर बायकामुलं सुद्धा फिरत फिरत हवा खायला तुमच्या पार्कमध्ये येतात.

**भाई :** खरंय !

**शिवराम :** मला तर वाटतं गावकऱ्यांनी इथं यावं म्हणूनच तू एवढ्या धोरणीपणानं आणि अफाट श्रम पैसा ओतून ही बाग फुलवली आहेस.

**भाई :** तेही खरं आहे.

**शिवराम :** खरं असलं तरी ते बरं नाही. कुष्ठरोग्यांच्या बरोबर इथली गावातली माणसं अशी रोज मिसळायला लागली तर—

**भाई :** त्याची काळजी करू नकोस दादा. जे कुष्ठरोगी पूर्ण बरे झाले आहेत किंवा ज्यांच्यापासून कसलाही धोका संभवत नाही अशाच माणसांना या बागेत यायची परवानगी आहे.

**शिवराम :** तरी देखील शहराच्या आरोग्याच्या दृष्टीनं मला ही गोष्ट गैर वाटते. ही मिसळण ताबडतोब थांबली पाहिजे.

**भाई :** दादा तू नगराध्यक्ष असलास तरी ही मिसळण थांबवणं तुझ्या हातात नाहीये. तू काय कायद्यानं लोकांना इथं यायची बंदी करणार आहेस ?

**शिवराम :** ते शक्य नाहीये हे मला ठाऊक आहे. पण त्याची गरजही नाहीये. बहुसंख्य लोक शहाणे आहेत. ते तुझ्या श्रमानंद नगराकडं फिरकणारच नाहीत.

**भाई :** बहुसंख्य लोक शहाणे नाहीयेत दादा, ते भित्रे आहेत, अडाणी आहेत. पण त्यांनाही कधीतरी जाग येईल आणि—

**शिवराम :** तोपर्यंत आम्ही थांबणार नाहीये.

**भाई :** आम्ही म्हणजे ? कोण आम्ही ?

**शिवराम :** आपल्या शहरातले सगळे नगरपिते आणिक लोक सुद्धा.

**भाई :** तुम्ही काय काय करणार आहात ?

**शिवराम :** तसं आम्ही पुष्कळ काही करू शकतो. पण इतक्यात मला वाकड्यात जायचं नाहीये. सामोपचारानं वाटाघाटी करून आपण मार्ग काढू शकतो. फक्त तू समजून घेतलं पाहिजेस आणि सहकार्य दिलं पाहिजेस.

**भाई :** काय समजून घ्यायचं ? आणि कसलं सहकार्य हवंय तुला ?

**शिवराम :** समजून घ्यायचंस ते हे की जाहीर रीतीनं कोणी बोलत नसलं, तरी या गावातल्या किमान नव्वद टक्के शहरवासीयांना तुमची ही वस्ती मान्य नाहीये. श्रमानंद नगर उभं राहिल्यापासून इथं गावोगावचे कुष्ठरोगी फार मोठ्या संख्येनं यायला लागले आहेत. एक टूरीस्ट सेंटर म्हणून या गावाची नवी छबी मी घडवतो आहे. एक उद्योगप्रधान शहर म्हणून या शहराभोवती इंडस्ट्रीयल इस्टेट स्थान

करण्याचे माझे आटोकाट प्रयत्न चाललेत. अडचण एकच आहे. श्रमानंद नगर ! प्रांताच्या नकाशात आमचं शहर हे कुष्ठरोग्यांची वसाहत म्हणून प्रसिद्धीला यावं, हे कोणालाही चालणार नाही. सगळ्यांचा सक्त विरोध आहे.

**भाई :** अरे दादा, सरकारनंसुद्धा आमच्या प्रयत्नाला चारशे एकर जमीन देऊन प्रोत्साहन दिलंय आणि—

**शिवराम :** तीन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ती. त्यावेळी मंत्रीमंडळात 'निष्ठावंत' लोक नव्हते. सरकारची ती चूकच होती.

**भाई :** अरे मोठमोठ्या परदेशी संस्थांनी मदतीचा ओघ सुरू केलाय श्रमानंद नगरासाठी. शाळेतल्या मुलांनीसुद्धा उपवास करून देणग्या पाठवल्या आहेत आम्हाला आणि—

**शिवराम :** हलवायाच्या घरावर तुळशीपत्र. आमच्या गावात कुष्ठरोग्यांची वस्ती फळफळली तर त्यांच्या बापाचं काय जातंय ?

**भाई :** ( ताडकन् उठत ) मी काहीतरी वाईट घाणेरडं काम करतोय असं तुला म्हणायचंय का ?

**शिवराम :** भले तुझे काम चांगलं, थोर मानवतावादी असेल. पण ते या गावाच्या पंचक्रोशीत नको. जाऊन दुसऱ्या कोठल्या तरी गावावर हा उपकार कर ना ?

**भाई :** म्हणजे हा केरकचरा आहे आणि तो दुसऱ्याच्या घरापुढं मी नेऊन टाकावा, असं तुला म्हणायचंय.

**शिवराम :** श्रमानंद नगराची वस्ती या जागेवरून उठली पाहिजे एवढंच माझं म्हणणं आहे. आणि माझं म्हणजे आपल्या गाववाल्यांचं.

**भाई :** आपल्या गाववाल्यांना वाल्मीक नगरची वस्ती चालते काय ?

**शिवराम :** खरं म्हणजे ती मलाही पसंत नाहीये. तरीपण ती झोपडपट्टी आहे. एकठ्ठा मतांचा प्रश्न आहे. राघूशेट हे एक 'निष्ठावंत' पुढारी आहेत. निवडणुकीच्या वेळी—

**भाई :** ( उपरोधानं ) ओ होऽ ! राघूशेट... एक निष्ठावंत पुढारी ? ( हसतो )

**शिवराम :** मुख्य म्हणजे ती झोपडपट्टी घाणेरड्या दलदलीच्या जागेवर उभी आहे. त्यांची आम्हाला फारशी अडचण नाहीये. तेव्हाऽऽ

**भाई :** ( हसत ) समजलो, समजलो ! ( खळखळून हसत ) शाब्बास दादा ..पुढल्या निवडणुकीत तू नक्कीच निवडून येणार आणि मंत्रीसुद्धा होणार....

**शिवराम :** त्यासाठीच मला तुझं सहकार्य हवंय. श्रमानंद नगर इथून उठलं की निवडणुकीतलं माझं यश एकशे एक टक्के कायम झालं बघ

**भाई :** वा वा वा ! छान छान. पण दादा गड्या, मला एक सांग. इथली आमची वस्ती उठवायचं ठरलं तर या सगळ्या लेकरांना घेऊन मी कुठं जाऊन राहू ?

**शिवराम** : त्याचीही योजना करता येईल. कोकणात नाहीतर विदर्भात नाही तर मराठवाड्यात——

**भाई** : नाही तर अंदमानात——

**शिवराम** : तुम्हाला इथं काय आणि तिथं काय, जमीन मिळाल्याशी कारण. सगळी कडची माती एकच.

**भाई** : आणि माणसंही तशीच, भ्याड आणि मुर्दाड.

**शिवराम** : सगळा खर्च आमचा. तुम्हाला दिडकीची तोशीस पडणार नाही.

**भाई** : ओ हो... केवढं औदार्य .. केवढे मोठे उपकार ! ( हसतो ), तर दादा, मी सगळं काही समजून चुकलोय. आता माझा निर्णय सांगतो तेवढा समजून घे. तुला वा तुझ्या नगरपित्यांना वा तुझ्या नव्वद टक्के शहाण्या गाववाल्यांना जे हवंय, ते मी कधीही करणार नाही, नाही, नाही. श्रमानंद नगर आहे तिथंच, तस्संच राहणार आहे. कारण गावं बदलली तरी माणसं आणि त्यांची माणुसकी काही बदलणार नाही. कुष्ठरोगांबद्दल लोकांचं अज्ञान जसजसं दूर होईल तसतशी त्यांची भीतीही कमी होईल. इथं कुष्ठरोग्यांना पद्धतशीर औषधोपचार होतोय. त्यांच्या अन्न-वस्त्र-निवाऱ्याचीही सोय झालीय. आता तर त्यांना लग्न करून संसार उभारण्याची संधी सुद्धा आम्ही देतोय.

**शिवराम** : ( किंचाळत ) कुष्ठरोग्यांची लग्नं ? तुझं डोकं तर फिरलं नाही ?

**भाई** : ते तू हवं ते समज. पण लग्न ही पहिली पायरी आहे. श्रमानंद नगर हे काही मला कुष्ठरोग्यांचं गाव ठेवायचं नाहीये. ही काय कायमची वसाहत नाहीये. इथले रोगी बरे झाल्यावर पुन्हा आपआपल्या गावांत, आपल्या घरांत आणि आपल्या माणसांत सन्मानपूर्वक गेलेच पाहिजेत. हे काम जेव्हा पुरं होईल तेव्हा श्रमानंद नगर जसं निर्माण झालं तसंच नाहीसं होईल. इट वुइल टेक सम टाईम, बट ....

**शिवराम** : मूर्खांच्या नंदनवनात वावरतो आहेस तू भाई. अरे या गावातला कोण शहाणासुरता माणूस इकडं फिरकेल ? ‘श्रमानंदनगराकडं फिरकू नका. कुष्ठरोगाचा धोका आहे’ अशी दवंडी देत एक व्हॅन मी गावातून फक्त चार दिवस फिरवली तर——

**भाई** : ते तू करूनच पाहा दादा. तसाच प्रसंग पडला तर मी उभ्या देशातून मित्र मेळावा इथं बोलावीन. गावोगावी श्रमानंदनगराला थोडेतरी मित्र भेटतीलच की नाही ? अवघी मानवजात मुर्दाड झालेली नाहीये.

**शिवराम** : ( थबकून, न्याहाळत ) अस्संऽ ! म्हणजे नेहमीप्रमाणं तू टोकाला जायचं ठरवलं आहेस तर ? वाकड्यातच शिरायचं तू ठरवलं आहेस.

**भाई** : वाकड्यात तू शिरतो आहेस दादा. माझे सगळे प्रयत्न धुळीला मिळवायची योजना तुझी आहे, पुन्हा सांगतो, श्रमानंदनगरापासून आपल्या गावाला कसलाही

धोका नाही, उपद्रव नाही की—

**शिवराम :** तरी देखील ही वस्ती आम्हाला या गावात ठेवायची नाहीये.

**भाई :** आणि मीही ठामपणानं सांगतो की श्रमानंदनगर इथंच नांदणार आहे.

**शिवराम :** ठीक आहे. शांताक्कांना आणि जानकीला बोलाव. त्यांच्या समक्ष मला तुला शेवटचा इशारा द्यायचाय.

[ तशी आतून क्रुद्ध शांताक्का आणि पाठीशी भयभीत जानकी येतात आणि ]

**शांताक्का :** शिवरामदादा, आम्ही दोघी भाईच्या पाठीशी ऊभ्या आहोत. तुमचा शेवटचा इशारा काय असेल तो द्या.

**शिवराम :** समजलो मी. भाई, माझ्याशी भांडण करणं ही आज इतकी सोपी गोष्ट राहिलेली नाहीये. भांडण करणाऱ्याला भांडण मिटवायची मी एक संधी जरूर देतो. दुसरीही देतो. तिसऱ्या वेळी मात्र ( थबकून ) भांडण करणाऱ्यालाच मी संपवतो. येतो मी. [ तिरीमिरीत ताडताड निघून जातात. ]

**शांताक्का :** ( व्यथित मुद्रेनं) भाई, हे भांडण आपल्याला कुठं घेऊन जाणार आहे ? ज्यांच्यासाठी तू प्राण पाखडतो आहेस ते तुला आपल्यातला मानत नाहीत. तू मालक आणि ते मजूर, अशी त्यांची धारणा. आणि या गावातले लोकसुद्धा तुझ्या विरोधात उभे. मला एकच प्रश्न पडलाय. श्रमानंदनगराचा हा सगळा गदारोळ आपण कशासाठी, कोणासाठी मांडलाय ?

**भाई :** आई, मला कोणाचा पाठिंबा आहे आणि कोण माझ्या विरोधात उभे आहेत याची मी चिंता करीत नाही. कारण ही सगळी धडपड मी माझ्यासाठीच करतोय आणि स्वतःला मी या नगरात विसर्जित करून टाकलंय. दॅट्स ऑल !

**शांताक्का :** एक मोठं वादळ येतंय भाई... मला तरी चिन्हं बरी दिसत नाहीत.

[आवेगानं त्या आत जातात. क्षणार्धं स्तब्धता. भाईंची मुद्रा विचारगंभीर. तेवढ्यात जानकी व्याकुळ होऊन धाव घेऊन त्याच्या पायाशी बसत— ]

**जानकी :** मला आता मात्र खरंच भीती वाटायला लागलीय. तुमच्या जीवाला धोका आहे. तो चांडाळ काय वाटेल ते करील; तुमच्यावर मारेकरीसुद्धा घालील.

**भाई :** ( तिला जवळ घेत ) वेडी आहेस का तू जानकी ?

**जानकी :** ( भयभीत होत ) आपण हे गाव सोडून जाऊ या. कुठंही जाऊ... कसेही राहू... ( डोळे भरून येत ) मला दुसरं काही नको... तुम्ही... एक तुम्ही सुखरूप असलात म्हणजे सगळं भरून पावलं.

**भाई :** घाबरू नकोस जानकी. कोणी माझ्या जीवाला अपाय करणार नाही. अगं महारोगाच्या जंतूंनासुद्धा मी भीत नाही, तो काय दादाच्या पोकळ धमक्यांना मी घाबरणार आहे ? ते सोड. या जगात भिण्यासारखी एकच गोष्ट आहे. रोग आणि रोगी यांच्याबद्दल दादासारख्या माणसांचा मुर्दाडपणा. [ जानकी मस्तक झाकून

अस्फुट हुंदका देते तशी, ] हे-हे काय बरं जानकी ? आपल्या लग्नाच्या पहिल्या रात्री मी तुला काय म्हणालो होतो ते तू इतक्यात विसरलीस का ? मी म्हणालो होतो— आपण कुष्ठरोगाशी युद्ध मांडलंय. आपण सगळेच युद्धयमान आहोत. कोणालाही काहीही घडू शकेल. मरण यायचं तेव्हा खुशाल येऊ देत; पण तोवर आपण असं उत्कट गाढ प्रेम करूया, की एकेक क्षण म्हणजे एकेक दिवस ठरावा. आणि एकेक दिवस म्हणजे एकेक आयुष्य व्हावं... ' खरंय ना ?

[ ते उद्‌गार ऐकताच जानकी डोळे पुसून भारावून भाईंच्या मुद्रेत पाहाते. भाईही तिच्याकडे भारावून बघतात. त्याच वेळी पडदा. ]

## अंक दुसरा संपला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ मागील अंकातील घडामोडीनंतर तीन साडेतीन महिन्यांचा काळ उलटला आहे. भाईंच्या पर्णकुटीतले तेच दर्शनी दालन वेळ सायंकाळची. पडदा वर जाऊन रंगमंच उजळतानाच टेपरेकॉर्डरवर ध्वनीमुद्रित केलेल्या समूहगीताच्या ओळी ऐकू येतात. समूहगीत स्त्री-पुरुषांनी मिळून वाद्यवृंदाच्या साथीत म्हटले आहे. टेपरेकॉर्डर छोट्या टेबलावर समोर ठेवून जानकी ऐकत बसली आहे.

" ... कोंडलेल्या वादळाच्या ह्या पाहा अनिवार लाटा
माणसासाठी उद्याच्या, येथुनी निघतील वाटा
पांगळ्यांच्या सोबतीला येऊ द्या बलदंड बाहू
निर्मितीच्या मुक्त गंगा, द्या इथे मातीत वाहू
नांगरू स्वप्ने उद्याची; गर्द ही फुलतील शेते
घाम गाळील ज्ञान येथे, येथुनी उठतील नेते
वेदनेच्या गर्भरानी गर्जली आनंद द्वाही,
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही
शृंखला पायी असू दे मी गतीचे गीत गाई ॥ दुःख०

जानकीच्या पायात मोजे आहेत आणि तिने शाल पांघरली आहे. पदर डोक्यावरून आणि डोळ्यात काजळ आणि लांब हाताचे पोलके अंगात, यावरून ती बाळंतपणातून नुक्तीच उठून हिंडू फिरू लागली आहे हे लक्षात येते. टेपवरील गीत संपता संपताच आतून पाळण्यातल्या मुलाचा रडण्याचा आवाज ऐकू येतो. तशी ती स्वतःशीच 'अगबाई! हा उठला वाटतं...' असे म्हणत टेपरेकॉर्डर बंद करीत "आले रेऽ राजा" अशी साद देत धावतच आत जाते. क्षणभराने बाहेरून बोलत येतात शांताक्का, मास्तर आणि हणमंतराव. ]

**शांताक्का :** ( आत येता येता ) नऊ जोडपी विवाहासाठी उभी राहायची आहेत. बाकी सगळ्या तयारीकडं बघतेय मी, पण हणमंतराव पौरोहित्याची काय व्यवस्था केलीय ?

**हणमंतराव :** बाहेरून कोणी भटजी येतीलसं मला वाटत नाही बाई.

**शांताक्का :** बाहेरून कोणाचीच मदत मिळेल असं धरून चालू नका. ( आतल्या दाराशी जाऊन डोकावत ) जानकीऽ... कुठं गेली ही मुलगी ? मित्रमेळाव्याला तरी कितीशी माणसं येतील याची मला शंकाच आहे.

**मास्तर :** भाईंनासुद्धा खात्री वाटत नाहीये त्याची. पण तरीसुद्धा आपल्याकडून जय्यत तयारी हवी असं म्हणाले ते.

**शांताक्का :** तयारी तयारी ती काय करायची ? इतकी माणसं रोज जेवतात त्यात आणखी पाच पन्नास. दोन दिवस आधी शाळेचे वर्ग धुवून स्वच्छ करून बिछायती घातल्या की राहायचाही प्रश्न मिटेल.

**मास्तर :** शांताक्का, विवाहविधी वैदिक पद्धतीनं थोडक्यात पार पाडायचा असं ठरवलंय. पौरोहित्य मी करणार आहे.

**हणमंतराव :** लग्नातल्या मंत्रोपचारांची कॅसेट मिळते की बाजारात.

**शांताक्का :** तुम्ही काय टेपरेकॉर्डरवर लग्न लावणार आहात ?

**हणमंतराव :** त्याला काय झालं ? हल्ली सत्यनारायणाची पूजासुद्धा कॅसेट लावूनच पुष्कळ ठिकाणी करतात. भटजी मिळताहेत कुठं ? आमच्या वाल्मिक नगरमध्ये तर—

**शांताक्का :** तुम्ही आता वाल्मिकनगर विसरा हणमंतराव. (पुन्हा दारातून डोकावत) जानकीऽऽ पुन्हा ही विहिरीकडं गेली की काय ?

**हणमंतराव :** मुद्दाम विसरायची गरज नाही बाई. वाल्मिक नगरची वस्तीच आता उठेलसं वाटतंय मला.

**मास्तर :** वस्ती उठणार ? बाकी बरोबरच आहे. तुम्ही इतके लोक वस्ती सोडून इथं आलात—

**हणमंतराव :** लोकांचं काही नाही हो. चार लोक गेले तर आठ येऊन उभे राहातात. पण राघूशेटनी हातभट्टीचा धंदाच बंद करून टाकायचा ठरवलंय. म्हणजे असं फकीरा काल इथं आला तो सांगत होता.

**शांताक्का :** इतकं भलेपण सुचलं त्यांना तर देवच पावला म्हणायचा.

**हणमंतराव :** तसं म्हणू नका बाई, धंदा वाईट असला तरी माणूस म्हणून शेट भला आदमी आहे. जरा तडक होता, कडक होता पण—

**मास्तर :** तुमच्यावर राघूशेटचा फारच राग झाला असेल नाही ?

**हणमंतराव :** राग व्हायचं कारण काय ? मी काय दंगल, किसन फकीरा किंवा धनासारखा पळून थोडाच आलोय ? सांगून सवरून—

**शांताक्का :** तुमचा धना कुठं दिसला नाही आज मला हणमंतराव ? की शेवंतीला भेटायला पळाला पुन्हा तिच्या घरी ?

**हणमंतराव :** छे छे बाई...तसं काही नाही. सकाळीच भाई त्याला बरोबर घेऊन

गेलेत. बहिरोबाच्या जंगलाकडं.

**शांताक्का :** ( चकित होत ) बहिरोबाच्या जंगलाकडं ? म्हणजे भाई आजही पुन्हा बहिरोबाच्या जंगलात गेलाय ? याचं चाललंय तरी काय तिकडं ? [ तेवढ्यात जानकी येते तशी-- ] अगं होतीस कुठं तू इतका वेळ ? किती हाका मारल्या मी तुला.

**जानकी :** होय ? मी मागीलदारी विहिरीवर होते. थोडे कपडे धुवायचे होते बाळाचे. पण मला--

**शांताक्का :** अग पण तेवढ्यासाठी तू कशाला उघड्यावर पाण्यात गेलीस ? पुरता महिनासुद्धा झाला नाही तुला बाळंतपणातून उठून. माणसं नाहीयेत का आपल्याकडं ?

**जानकी :** तसं नाही आई, नुसतंच बसायचं ते--

**शांताक्का :** अग बाळंतीणीनं काळजी कशी घ्यायची ते मी तुझ्यासारख्या परिचारिकेला शिकवायला हवं का ?

**जानकी :** चुकलं माझं आई. आता नाही जायची.

**शांताक्का :** बाळाला न्हाऊ घालायचंय ना ?

**जानकी :** हो. पण बाळाचा डोळा लागलाय. दुपारभर जागाच होता तो.

**शांताक्का :** ठीक आहे. उठला म्हणजे बघू. भाई आज पुन्हा बहिरोबाच्या जंगलात गेलाय ?

**जानकी :** होय आई. नागपाऱ्याचा कड्डू बोलवायला आला होता त्यांना. कड्डूचा मुलगा सेरेब्रल मलेरियानं फार आजारी आहे म्हणाला.

**शांताक्का :** परवा अस्वलानं काही आदिवासींना फाडलं म्हणून निरोप घेऊन कोणी आला त्यावेळी हा असाच धावला होता.

**जानकी :** त्या लोकांचा फार विश्वास आहे आई यांच्यावर

**शांताक्का :** अग ते मला कळतं ग. पण हा जाऊन तिथे काय करणार आहे ? हा काय सगळ्या रोगावर उपचार करणारा डॉक्टर आहे ?

[ हा प्रश्न ऐकतच बाहेरून भाई येतो ]

**भाई :** आई, मी जसा आणि जितपत डॉक्टर आहे त्याचीच गरज आहे नागपाऱ्याच्या आदिवासींना. मी गेलो म्हणून कड्डूचा मुलगा वाचला. नाहीतर काही हाती लागत नव्हता तो.

**जानकी :** कसे गेलात ? केव्हा पोचलात ?

**भाई :** ते काही विचारू नकोस. प्रथम जीपनं, मग झांजरवाडीच्या ओढ्याला पाणी आलं होतं म्हणून पोहत आणि पुढं जंगलातून चालत.

**मास्तर :** फार म्हणजे फारच हाल झाले असतील नाही ?

**भाई :** इटस ऑल इन् द गेम. छोट्या काय म्हणतोय. जागाच आहे ना ?

**जानकी :** थांबा. तुम्ही आत जाऊ नका. त्याला उठवून ठेवाल. आता जरा डोळा

लागलाय त्याचा.

**शांताक्का :** तुझाच मुलगा तो भाई. झोपेतसुद्धा सदा अस्वस्थ.

**भाई :** नॉट बॅड. हळूहळू माणसाळेल. हणमंतराव, मांडवाचं सामान घेऊन गाड्या आल्या आहेत; तेवढं ताब्यात घेऊन तुम्ही गाडीवाल्यांना मोकळं करा अगोदर. आणि मुरलीला पाठवून द्या इकडं. आजचं टपाल आणि झालेल्या कामाचा रिपोर्ट मला हवाय म्हणावं.

[ 'होय साहेब' म्हणून हणमंतराव जातात. भाई अस्वस्थतेनं येरझरा घालू लागतो तशी— ]

**शांताक्का :** जरा बैस की रे स्वस्थ.

**जानकी :** चहा घेणार ना ?

**भाई :** ( आपल्या तंद्रीत ) ऊं ?... ( थबकून भानावर येत ) नको. आई, आपल्या या कुष्ठरोग्यांना फक्त आपल्या समाजानंच नाकारलं आहे, पण दिवाभीताप्रमाणं जंगलात जगणाऱ्या या आदिवासींना गेल्या वीस शतकांनीसुद्धा दूर भिरकावलंय. माणसाच्या आकारातली जणू जंगलातली ही जनावरंच ! आदिवासींना मिळणारी सर्वांत स्वस्त गोष्ट म्हणजे मरण आणि सर्वांत महाग गोष्ट म्हणजे दोन वेळचं जेवण. पशू पक्षी कीडामुंगी पासून गवतापर्यंत पोट जाळण्यासाठी ते काय वाटेल ते खातात. मातीची ढेकळंसुद्धा खातात, पण शेती करीत नाहीत. होऽ कारण धरतीमातेवर नांगर धरणं म्हणजे त्यांच्या दृष्टीनं महापाप. रोगाची साथ आली की पटापटा मरतात आणि साथीवर उपाय म्हणून रेड्याबोकडाप्रमाणं तिथली आई पोटच्या गोळ्यावरदेखील सुरी चालवते. त्यांना मांत्रिक भगत लुटतात, जंगलाचे ठेकेदार लुटतात, फॉरेस्ट अधिकारीसुद्धा लुटतात. चिमूटभर तंबाखू नाहीतर तांब्याभर दारू हा त्यांचा विसावा. घरोघरी जहरी मलेरियानं माणसं भुईसपाट झालेली. आपण कशासाठी जगतोय याचाच मुळी त्यांना पत्ता नाहीये. एकटा एक डॉक्टर तिथं जाऊन काय रडणार का डोकं फोडून घेणार ?

**शांताक्का :** तरीसुद्धा तू तिथं धावत गेलासच ना ?

**भाई :** पूर्वी शिकारीसाठी जात होतो त्या वेळी त्यांची ओळख झाली. आता अडी-नडीला औषधं घेऊन जातो. पण हे काही काही खरं नाही.

**शांताक्का :** काही खरं नाही म्हणजे ?

**भाई :** तिथं जाऊन कोणीतरी ठाण मांडून त्यांच्यात राहायलाच हवं. तो डॉक्टर असायला हवा; त्या आधी तो मास्तर असायला हवा; त्याही आधी तो शेतकरी असायला हवा. सुतार, लोहार आणि गवंडीसुद्धा असायला हवा.

**जानकी :** ( हसून ) आणिक वकीलसुद्धा— जंगल ठेकेदारांशी भांडण करण्यासाठी.

**भाई :** ( आपल्याच नादात ) येस. येस, बरोबर बोललीस तू.

**शांताक्का :** ( मिस्कीलपणे ) आणि इतक्या सगळ्या विद्या अवगत असणारा महापुरुष तुझ्याशिवाय दुसरा कोण आहे ?

**भाई :** ( विचारात हरवत ) तेही काही खोटं नाही. पण हे एका माणसाचं मुळी कामच नाहीये. पाचपंचवीस वादळी तरुणांनी मिळून जंगलावर हल्ला करायला हवा.

**शांताक्का :** अहो राजे, तुम्ही श्रमानंद नगराचा प्रपंच मांडून त्यात खोल रुतून बसला आहात, याची जाण आहे का तुम्हाला ?

**भाई :** छे छे ! आई, श्रमानंद नगराचा प्रपंच मांडला असला तरी मी काही त्यात रुतूनबितून बसलो नाहीये. त्याची गरजही नाहीये. श्रमानंद नगराची घडी आता चांगली भक्कम बसलीय. कोणीतरी थोड्या दक्षतेनं कारभार केला तरी—

**शांताक्का :** पण कोणीतरी म्हणजे कोण ? सध्या तरी तुझी सुटका नाही.

**भाई :** तसं का म्हणतेस ? जानकीचे बाबासुद्धा ही धुरा सांभाळतील.

**मास्तर :** मीऽ ? छे छे शक्यच नाही.

**भाई :** मास्तर, कुष्ठरोगी असणं आणि नसणं यात जमीनअस्मानाचं अंतर आहे, हे मला कोणी सुचवलं होतं ? श्रमानंद नगराचा आता ट्रस्ट होतोय. त्याचे प्रमुख ट्रस्टी, कुष्ठरोगाचा स्पर्श झालेलेच असायला पाहिजेत.

**मास्तर :** भाई तुम्ही काय म्हणताहात त्याचा रोख माझ्या ध्यानी आलाय. युनियन लीडरच्या नादानं काही कुष्ठरोग्यांनी कूळकायद्याची आणि नफ्यामधे हिश्याची मागणी—

**भाई :** ते प्रकरण संपलंय मास्तर; माझ्या मनात त्यातलं काहीही नाही पण कुष्ठ-रोग्यांचा त्राता वा उद्धारकर्ता ही पदवी मला नकोय. उद्धार हा ज्याचा त्यानंच केला पाहिजे आणि त्यासाठीच—

**मास्तर :** छे छे छे ते शक्य नाही. ते मला जमणार नाही उगीच मला भलत्या भरीला घालू नका. या नगराचा शास्ता तुमच्यासारखाच हवा शिस्तीला कडक आणि अन्तःकरणानं प्रेमळ.

**भाई :** ठीक आहे. बघू या. कोणीतरी सापडेलच की कधीतरी मी इथं नसणार आहे. आणि त्या वेळी या नगरचा रथ चालवण्यासाठी कोणाला तरी—

**शांताक्का :** तशी वेळ येईल तेव्हा कोणीतरी तुझी जागा घेईलच. पण मला एक सांग भाई, श्रमानंद नगराला तू कंटाळला आहेस का ? तुला इथं राहावंसं वाटत नाही का ?

**भाई :** काहीतरीच काय बोलतेस आई ? मी कंटाळायसारखं इथं काय आहे ? श्रमानंद नगर सोडून दुसरीकडं मी कुठं जाऊन राहणार ?

**शांताक्का :** तर मग इथल्या ट्रस्टची धुरा कोणावर तरी सोपवून मोकळं व्हायचा विचार तुझ्या मनात येतोय, याचा अर्थ काय ?

**भाई** : खरं सांगू आई? अर्थ एकच आहे. श्रमानंद नगरचं आव्हान माझ्या दृष्टीने संपत आलंय.

**शांताक्का** : ( थक्क होत ) काय ? काय बोलतोस काय हे तू भाई? श्रमानंद नगराचं आव्हान संपत आलंय ? इतक्यात ?

**भाई** : .. बुजलेल्या व्रणांचे तोंड, मला आता उसवत बसायचे नाही.
आणि कणाकणात स्वप्ने पेरून रात्रही मला झिंगवायची नाही.
हृदयावरच्या जुन्या जखमा स्मृतींच्या गिधाडांना खाऊ देण्यात काय अर्थ ?
वर्तमानातच जगले पाहिजे.
आणि वर्तमान हे आहे की, जागृतीच्या जांभया देत,
आदिमानव उठला आहे.
इतिहासात काळ्या कातडीने एकदा गोकूळ निर्माण केले आहे.
गोकुळात ज्याने प्रथम गवळ्यांची उठावणी केली,
त्याच्र कृष्णाच्या, जंगलात राहणाऱ्या या जमाती आहेत.
जे ज्यांचे हक्काचे होते, ते लुटणाऱ्यांना धडा देऊन
ज्याचे त्यास कृष्णाने परत केले होते.
उन्मत्त फणा उभारून आयत्या डोहात मिरवणाऱ्या कालियालाही त्याने ओढून
चेंदून ठेचून टाकला होता आणि—
अवघे जीवन ' कंसमुक्त ' केले होते.
तीच... नेमकी तीच ' कंसमुक्ती ' आज पुन्हा हवी आहे.
आदिमाता ईव्हने जाणिवेचे फळ नुकतेच खाल्ले होते,
तेव्हापासून, पाऊस पडणाऱ्या मेघाशी जुळलेले,
आदिमानवाचे उत्कट नाते अजून शाबूत आहे.
तसा तो आपल्या जीवनाशी जुगार क्षणोक्षणी खेळत असतो.
पण दुसऱ्यांच्या, नव्हे असंख्यांच्या जीवाशी जुगार खेळणारा
' अणुमानव ', याच्या पोटी उपजलेला नाही.
निसर्ग क्रूर झाला तरी आदिमानवाचे इमान अजून ढळलेले नाही.
कारण आदिमानवाच्या डोळ्यापुढे नाचतात त्याला धुंद करणारे मोर,
तर शहरी अणुमानवापुढे नाचतात नशा आणणाऱ्या मोहरा
माझ्या प्रिय युवकांनो,
या युगयात्रेत माझ्याबरोबर येण्याची मी तुमच्यावर सक्ती करीत आहे.
केवळ—तुमच्या आणि माझ्या अस्तित्वाला अर्थाचा सुगंध देण्यासाठी
[ भारावलेली जानकी धावून भाईचा हात धरीत विचारते— ]

**जानकी** : कधी ? कधी लिहिलीत ही कविता ?

**भाई :** मग तू ऐकलंस काय ? एवढा टेपरेकॉर्डर आणि कॅसेट तुझ्याकडं पाठवून दिली होती आणि तरी—

**जानकी :** नाही हो मी फक्त 'शृंखला पायी असू दे' गीत तेवढं ऐकलं.

**शांताक्का :** भाई तुझ्या डोक्यात एक नवंच वादळ घोंगावायला लागलंय काय ?

**भाई :** असं दिसतंय खरं.

**शांताक्का :** पहिलं वादळ शमण्यापूर्वीच ?

**भाई :** ( हसून ) माझ्या जन्माच्या वेळी प्रचंड वादळ झालं होतं असं तूच एकदा मला सांगितलं होतंस, नाही का ?

[ तेवढ्यात आतून मुलाच्या रडण्याचा आवाज येतो. तशी— ]

**जानकी :** ( लगबगीनं जाऊ लागते ) अगबाई, बाळ उठला वाटतं !

**भाई :** ( मधे पडत ) थांब. नाऊ ही इज माय प्रॉपर्टी. ( आत जातो )

**शांताक्का :** सूनबाई, मला वाटत होतं की लग्न झाल्यावर तरी हा स्थिरावेल, माणसाळेल—

**जानकी :** आई, तुमच्या उदरी एक विलासी फकीर आणि विरागी सम्राट जन्माला आलाय. एक वादळ शमण्यापूर्वीच दुसरं वादळ उठवायचं आणि त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून द्यायचं; हेच त्यांचं माणसाळणं आहे. ते समजूनच घ्यायला हवं. त्याबद्दल तक्रार कोणी, कोणापाशी, कशासाठी करायची ?

[ तेवढ्यात भाई खुषीत दुपट्यात गुंडाळलेल्या चिमुकल्या जीवाला दोन्ही हातांत आडवं घेऊन 'टारररॉव रॅव...' करीत गात, गिरक्या घेत नाचत येतो तशी त्याच्या मागोमाग धावत "अहो हे काय...हे काय !... तो पडेल..." असं ओरडत जानकी त्याच्याशी झोंबू लागते तेवढ्यात मुरलीधर येतो जानकी मुलाला घेते आणि आत जाते. "नातवाला बघायचंय ना तुम्हाला मास्तर ? चला आत. मुलाला न्हायला घालून टाकू या गं..." म्हणत शांताक्का आणि पाठोपाठ मास्तरही आत जातात. मुरलीला पाहताच भाई— ]

**भाई :** बोला मुरलीधर शेट, राज्याची खबर काय आहे ? आलबेल ?

**मुरली :** झांजरवाडीच्या ओढ्यापाशी काय प्रकार घडला भाई ?

**भाई :** ( चकरून ) शूऽक. कीप क्वायेट. तुला कोणी सांगितलं ? धना बरळला वाटतं ? त्याचे कान एकदा चांगलेच उपटले पाहिजेत. तरी मी त्याला बजावलं होतं.

**मुरली :** नाही भाई, तुम्ही त्याला रागाऊ नका. तो फक्त माझ्यापाशी बोलला. तेही गन् परत देताना त्यातली एक गोळी उडालेली माझ्या लक्षात आली म्हणून मी विचारलं तेव्हा.

**भाई :** ऑल राईट, ऑल राईट ! प्रकार तसा काही विशेष घडला नाही. दोन गुंड

आले होते माझ्या अंगावर. पण एक बार नुसता हवेत टाकल्यावर ते पळाले. भ्याड लेकाचे

**मुरली :** नक्की हा शिवरामदादांचाच—

**भाई :** बस्...पुरे...नो मोअर डिस्कशन्, आणि हे आईला किंवा जानकीला मुळीच कळता कामा नये, याद राख. गाठ माझ्याशी आहे.

**मुरली :** ते ठीक आहे. पण तुम्ही जपून, संभाळून—

**भाई :** अरेऽऽच्या! पुरे म्हटलं ना? जपून संभाळूनच आहे मी. मला रिपोर्ट हवाय.

**मुरली :** तुम्हाला सांगायचं म्हणजे राघूशेट आलेत.

**भाई :** राघूशेट ? आलेत? श्रमानंद नगरात?

**मुरली :** होय. दीडदोन तास झाले त्यांना येऊन.

**भाई :** अरे मग ते आहेत कुठं? काय करताहेत?

**मुरली :** सगळीकडं हिंडून बघताहेत. आपल्या लोकांशी बातचीत करून माहिती विचारून घेताहेत.

**भाई :** माझ्यावर एकदम गरम झालेत का?

**मुरली :** ते मला कसं कळणार? भाईंना भेटणार का, म्हणून मी विचारलं तेव्हा म्हणाले– "आधी सगळं बघतो आणि मग जाताना भेटतो."

**भाई :** अस्सं. ठीक आहे. येऊ दे येतील तेव्हा. त्यांना कोणी माणूस दिला आहेस की नाही सगळं दाखवायला?

**मुरली :** किसन आणि फकीरा त्यांच्याच बरोबर फिरताहेत की. आल्या आल्या खूप तापवलं राघूशेटनी त्या दोघांना.

**भाई :** फरगेट इट! पत्रं किती आली?

**मुरली :** मित्रमेळाव्याची चौकशी करणारी पत्रं प्रत्येक डाकेनं येताहेत. पण प्रत्यक्ष किती माणसं येणार त्याचा अंदाज अजून येत नाही.

**भाई :** बाथरूम्स उभ्या राहिल्या? विहिरीपासून पाईप लाईन टाकली? [मुरली 'होय' म्हणतो तशी–] म्युनिसिपालिटीवर कोणत्याही बाबतीत अवलंबून राहायचं नाही हे लक्षात ठेव

**मुरली :** आम्ही कोणावरच अवलंबून नाहीये भाई.

**भाई :** शिवरामदादांनी पत्रक वगैरे काढलं? गावात व्हॅन वगैरे काही फिरवली?

**मुरली :** नाही. तिकडच्या गोटात अगदी सामसूम आहे.

**भाई :** त्याचीच मला काळजी वाटतेय.

**मुरली :** आज मार्केटयार्डात मी गेलो होतो त्या वेळी दादा भेटले होते. म्हणाले– 'काही मदत लागली तर मला कळव.'

**भाई :** तू विचारायचंस की नाही... 'तुम्ही गप्प बसायला काय घ्याल?' त्यांना

रीतसर आमंत्रण पाठवलंस ना? आपल्याकडून चुकायचं नाही.

**मुरली :** आमंत्रण केव्हाच गेलंय. 'मिळालं' म्हणून म्हणालेदेखील.

[ तेवढ्यात बाहेरच्या दाराशी राघूशेट येतात आणि बाहेरूनच विचारतात— "आत येऊ का साहेब?" तशी भाई पुढं होत म्हणतो. "नमस्ते राघूशेट, याऽऽ" राघूशेट आत येतात आणि भाईच्या इशाऱ्याबरोबर मुरलीधर निघून जातो. ]

**राघूशेट :** सलाम साहेब. राघूशेटचे तुम्हाला लाख लाख सलाम.

**भाई :** बसा तर खरे! कशाबद्दल इतके सलाम?

**राघूशेट :** (बसत) अबबबबऽ...खटाटोप तर तुम्ही काहीच्या काही बेफाटच करून राहिलात. आयला, बघता बघता या माळावर एक नवं गाव उभं केलंत की राव! काय हो साहेब, हे हे स्वच्छसुंदर शहरवाले, भोसडीच्चे, बुडाला वणवा लागल्यागत जळ जळले असतील, नाही? (हसतो) हां ऽऽ पण राव आमचे हे कुष्ठरोगीसुद्धा काही कमी डँबीस आहेत, असं समजू नका. एकजात बेभरवशाचे, उलट्या काळजाचे आणि उलट्या खोबडीचे. दोन घास सुखानं पोटाखाली उतरले की यांच्या शरीरात, त्याचं रगत होत नाही, त्याची मस्ती होते आणि हरामजाद्यांना त्याचा माज यायला लागतो. तुम्हाला, कूळकायदा लावा आणि नफ्यात हिस्सा द्या, म्हणून मागणी करीत होते नायी का दीडदमडीच्चे?

**भाई :** ते प्रकरण मिटलंय आता राघूशेट.

**राघूशेट :** हॅ ऽऽऽ! मिटलं कसचं? तुम्ही पड खाऊन फारच नरमाईनं मिटवलंत ते प्रकरण. तुमच्या जागी मी असतो, तर साहेब, त्या युनियनवाल्यांची हाडं मोडून सहा महिन्यांसाठी इस्पितळात धाडलं असतं, थेट! आणि या साल्यांना नागवे करून चाबकानं असं फोडून काढलं असतं की—

**भाई :** हां हां हांऽ...हाच तुमच्या माझ्यात फरक आहे. असं करून चालणार नाही राघूशेट. त्यांच्या मागणीतही काही थोडं तथ्य होतं. ही सगळी माझी एकट्याची मालमत्ता आहे असा त्यांचा समज करून दिला गेला होता, म्हणून—

**राघूशेट :** आयला, ही मालमत्ता तुमची नाही तर कोणाची? या या हरामखोरांच्या बापजाद्यांची? या साल्यांचे बापजादे कोणाच्या गावी तालेवार होते ते विचारा की एकेका गटारफुंक्याला.

**भाई :** नाही राघूशेट. कोणाचे बापजादे काय करीत होते हे मी कोणाला कधीच विचारीत नाही. जो श्रम करतो त्याला त्याचा मोबदला इज्जतीनं मिळायलाच पाहिजे.

**राघूशेट :** आयला, तेही खरंच! तुम्ही इज्जत अब्रूदारवाले, नाही का?

**भाई :** इज्जत आणि अब्रू कोणाला नको असते राघूशेट? तुमची इतकी माणसं

तुम्हाला सोडून खुषीनं इथं आली ती कशासाठी ? त्यांना तुमच्या वस्तीवर हातभट्टीच्या धंद्यात काय कमी पैसा मिळत होता ?

**राघूशेट :** हां साहेब. तेही मी आता कळून चुकलोय. माणसं भुकेकंगाल असतात तेव्हा ती फक्त भाकरीसाठी मरतात. त्यासाठी चोरीमारी, प्रसंगी गळासुद्धा घोटतात. पण एकदा भाकरीची निर्वेध तरतूद झाली की मग साल्यांना इज्जतीची आणि अब्रूची आग उपटते. चार लोकांनी भलेपणा द्यावा यासाठी भोसडीच्चे इथं येऊन रक्त ओकेपर्यंत राबतील, पण—

**भाई :** माणसाचा पिंडच तसा आहे राघूशेट. खातेऱ्यात माणसं मनापासून कशी रमतील ?

**राघूशेट :** साहेब, हे तुम्ही म्हणावं हे ठीक आहे. पण हे वाल्मिकनगर उभारण्यासाठी मी किती कष्ट घेतलेत, काय काय सोसलंय, काय काय भोगलंय –

**भाई :** त्याची मला पूर्ण कल्पना आहे राघूशेट. मी सुद्धा असंच एक नगर उभारण्यासाठी जीवापाड राबलोय.

**राघूशेट :** तुमची आमची बरोबरी कशी होऊ शकेल साहेब ? तुमचं आहे राजमान्य राजश्री खजरोसनगर. आमचं आहे चोरट्या हातभट्टीचा धंदा करणारं गुन्हेगारनगर. आमची वस्ती उठवण्यासाठी शहरवाले आणि पोलिसवाले यांनी काय कमी चालबाजी केली ? पण मी सगळ्यांना पुरून उरलो. पण साहेब, तुम्ही मात्र आमच्या वस्तीच्या मुळावरच घाव घातलात.

**भाई :** मी हो तुमच्या वस्तीच्या मुळावर कसा काय आलो ?

**राघूशेट :** तुम्ही माझ्या वस्तीवरली माणसंच फूस लावून नेलीत, त्यांना राहायला घरं दिलीत, पोटासाठी रोजगार दिलात.

**भाई :** तेवढंच नाही राघूशेट, मी त्यांना इज्जत आणि अब्रू दिली. त्यांना हवी होती म्हणून.

**राघूशेट :** ( उठून सलाम करीत ) त्याबद्दल तुम्हाला राघूशेटचे लाख लाख सलाम साहेब.

**भाई :** ( हसून ) तुम्ही काय आज मला लाखो सलाम करायसाठी इथं आलात ?

**राघूशेट :** साहेब कुस्तीत जो आपल्याला चारी मुंडे चीत करतो त्याला सलाम करायलाच हवा की.

**भाई :** ( हसून ) अरे कसली चारी मुंडे चीत करायची भाषा बोलताहात राघूशेट ? तुम्ही आणि मी मल्ल आहोत, का आपण कुस्त्यांच्या फडात उतरलो आहोत ? कोणी हरलेलं नाही आणि जिंकलेलं नाही. मी पुन्हा सांगतो. तुम्ही हातभट्टीचा धंदा करून कुष्ठरोग्यांना जिवंत ठेवलंत हे तुमचे त्यांच्यावर उपकारच आहेत. मी त्याबद्दल तुम्हाला मुळीच दोष देत नाही. तुम्हाला त्याशिवाय दुसरा मार्गच

नव्हता. दोष असलाच तर तो समाजाचा आहे. मला जरा अनुकूलता दिसली म्हणून मी थोडी वेगळ्या दिशेनं पावलं टाकली. खरं म्हणजे तुमचंच काम मी पुढं नेतोय. तुम्ही मला मदत करायची. ते सोडून मी तुमच्या वस्तीच्या मुळावर आलोय, असं तुम्ही मानता ?

**राघूशेट :** आता कसलाच सवाल नाहीये साहेब. मी धंदाच बंद करून टाकलाय. या भोसडीच्यांना नकोय तर धंदा चालू ठेवायची मलाही काही आग नाहीये. माझ्यापुरतं बक्कळ कमावलंय मी.

**भाई :** म्हणून म्हणतो आता तुम्ही श्रमानंद नगरात माझ्या मदतीला या.

**राघूशेट :** काय मस्करी करताय साहेब ? अहो, मी अनपढ माणूस. माझी हो तुम्हाला कसली मदत होणार ?

**भाई :** राघूशेट, वाल्मिकनगरचा सगळा कारभार तुम्ही किती खबरदारीनं केला होता ते मला माहीत आहे. अहो तोच रथ तसाच चालवायचाय. फक्त रस्ता वेगळा आणि दिशाही वेगळी.

**राघूशेट :** साहेब, तुम्ही झेप तर मोठीच घेतलीय पण माझं मत विचाराल तर तुमची उडी अलीकडंच पडलीय. कुष्ठ रोग्यांना उपचार झाले, रोजगार मिळाला, इज्जतही मिळाली पण वेगळ्या वस्ती जमातीचा शिक्का काही त्यांच्या कपाळावरून निघाला नाही.

**भाई :** त्याचसाठी मी पुढचं पाऊल उचलतोय. लोक आपल्याला जवळ करत नसतील तर आपण लोकांना जवळ केलं पाहिजे एवढं धावधोपून हा मित्रमेळावा मी कशासाठी भरवतोय राघूशेट ?

**राघूशेट :** तुमच्या मेळाव्याला बाहेरून कोणी मित्र येतील असं वाटतं तुम्हाला ?

**भाई :** तुमचा काय अंदाज आहे ?

**राघूशेट :** अंदाज नाही, माझी खात्री आहे. कोण्णी येणार नाही. तुमची फटफजिती होणार आहे.

**भाई :** तुमची माझी पैज ?

**राघूशेट :** हो हो पैज तुम्ही हरलात तर मला काय द्याल ?

**भाई :** तुम्ही मागाल ते देईन. पण मी पैज जिंकली तर ? बाडबिस्तरा घेऊन तुम्ही इथं येऊन राहाल ?

**राघूशेट :** तुम्ही म्हणाल तर आजही येईन मी. त्यासाठी पैज कशाला ? तिथं तरी माझं काय गाठोडं ठेवलंय आता ?

**भाई :** तर मग याच तुम्ही. माझ्या सगळ्या योजना मी तुम्हाला समजावून सांगतो.

**राघूशेट :** ( उठत ) खरं म्हणजे मी तम्हाला इशारा द्यायला आलो होतो.

**भाई :** कसला इशारा ?

**राघूशेट** : तुमच्या जीवाला धोका आहे. शिवरामदादांनी आमच्याच वस्तीवरल्या एका ट्रक ड्रायव्हरला सुपारी दिली होती. सकाळी तुम्ही एकटे फिरायला जाता त्या वेळी–

**भाई** : माझ्या अंगावर ट्रक घालायचा, असंच ना? (हसतो) मी मरणाला भीत नाही राघूशेट. व्हायचं असेल ते होईल.

**राघूशेट** : ट्रकवाल्याची आता भीती नाही. तो माझाच माणूस होता म्हणून मी त्याला सज्जड दम भरून मोडून काढला.

**भाई** : अहो माझ्या मरणावर टपलेल्यांना बाकीचे मार्ग मोकळे नाहीत का?

**राघूशेट** : म्हणून तुम्ही जपून संभाळून राहिलं पाहिजे.

**भाई** : त्याची काही गरज नाही. मी पुन्हा सांगतो, व्हायचं असेल ते होईल. मी कशालाही भीत नाही.

**राघूशेट** : अहो पण साहेब, हा सगळा राज्यासारखा प्रपंच ऐसपैस मांडून बसला आहात, त्याचं काय होईल?

**भाई** : मग तुम्हाला मी इथं कशासाठी बोलावतोय राघूशेट? हा जगन्नाथाचा रथ आहे. तो कोणा एका माणसासाठी अडून पडता कामा नये.

**राघूशेट** : (क्षणमात्र डोळे विस्फारून बघत) आयला, तुम्ही तर भलतेच नंबरी निघालात! [आणि पाठ वळवून राघूशेट एकदम जातात. भाई टेपरेकॉर्डर जवळ जातो. तो आतून शांताक्का येऊन उभ्या आहेत. दृष्टादृष्ट होताच—]

**शांताक्का** : भाई, तुझा विचार तरी काय आहे?

**भाई** : आज खूष आहे मी आई. मी आज एक माणूस मिळवला.

[शांताक्का बघतच राहतात. भाई टेपरेकॉर्डरचा स्विच दाबतो. तशी 'शृंखला पायी असू दे' हे समूहगीत ऐकू येऊ लागते. त्याच वेळी अंधार.]

**प्रवेश पहिला संपला.**

# अंक तिसरा

## प्रवेश दुसरा

[ मागील प्रवेशातील घडामोडीनंतर सुमारे महिनाभराचा काळ उलटला आहे. समय रात्रीचा. वेळ दहा वाजण्याची. रंगमंच प्रकाशाने उजळतो त्या वेळी दिसतो तोच पर्णकुटीतला दर्शनी दालनांचा भाग. दूरवर कुठेतरी संपत असलेल्या मित्रमेळाव्याचा गलबला अस्पष्टपणे ऐकू येत आहे. एकटी जानकीच दुपट्यात गुंडाळलेल्या मुलाला खांद्यावर टाकून येरझारा घालीत नि मुलाला थोपटत अंगाई गीत म्हणते आहे. मधेच ती दाराबाहेर जाऊन क्षणमात्र दूरवर न्याहाळते. तेवढ्यात बाहेर अंधारात पावलं वाजतात. तशी ती दारातूनच ओरडून विचारते "कोण आहे रे?" तशी उत्तर येते—"बाई, मी आहे आपला धना." "कोण धना, तू होय? येरे...आत ये..." असं म्हणत जानकी आत येते. पाठोपाठ धनाही येतो व दाराशीच अदबीनं उभा राहतो. "थांब हं, मी बाळाला पाळण्यात ठेवून येते..." असे म्हणत जानकी लगबगीने आत जाते. क्षणभराने बाहेर येत— ]

**जानकी :** आटोपला का मित्रमेळावा?

**धना :** आटोपलाच म्हणायचा. शेवटचे पाहुणे जाताहेत. भाई आणि आई त्यांनाच निरोप देत उभे आहेत बागेपाशी. काय पाहुणे...काय पाहुणे...धरण फुटल्यागत माणसांचे लोंढेच्या लोंढे नगरात येऊन थडकले या दोन दिवसांत बाई.

**जानकी :** सगळ्यांचे सगळे अंदाज फसले आणि सगळी व्यवस्था कोलमडली ना?

**धना :** ते काही विचारू नका. अहो मेळाव्यात ज्यांची लग्नं झाली त्या नव्या नवऱ्या, त्यांना देखील पोळया लाटायला बसावं लागलं.

**जानकी :** ऐकलं मी सगळं. मी मात्र मुलाला घेऊन बसलेय घरात. काही उपयोग झाला नाही माझा.

**धना :** असं कसं म्हणता बाई, तुमच्यासारख्या दोन महिन्यांच्या लेकुरवाळया बाईनं येऊन राबण्यासारखा धबडगा होता का तो? अहो भल्या भल्या बाप्यांचे कांटे ढिले झाले या दोन दिवसांत. पण कोण्णी त्याचं काही मानलं नाही वस्तीवरली झाडून लहान-थोर सगळी माणसं खुषीनं राबत होती. अहो एवढी मोठमोटी माणसं, जन्माच्या कर्मी आम्हाला कधी बघायलासुद्धा मिळाली नसती, ती आमच्या

पंगतीत बसून जेवत होती, आमच्या बायकांनी रांधलेलं आणि आमच्या माणसांनी वाढलेलं अन्न घेऊन! डोळ्यांचं पारणं फिटलं बाई.

**जानकी** : पाहुण्यांच्यापैकी कोणीसुद्धा कपाळाला आठ्या घातल्या नाहीत ना?

**धना** : एकानंसुद्धा नाही. भाईंनी भाषणच एवढं पद्धतशीर करून सांगितलं होतं सगळं, की कुणाच्या मनात शंका यायचं कारणच नव्हतं.

**जानकी** : तुझी शेवंती राबत होती की नाही मांडवात?

**धना** : तिचं तर ज्यात त्यात पुढं पाऊल. तुम्ही दिलेली साडीचोळी ल्याली आणि मिरव मिरव मिरवून घेतलं तिनं.

**जानकी** : भेटल्या होत्या सगळ्या नव्या नवऱ्या मला. सांगितलं त्यांनी मला. प्रत्येकीनं उखाण्यात नावं सुद्धा घेतली. तू मात्र राहिला आहेस.

**धना** : ( लाजत ) हॅ हॅ...मी बाप्यामाणूस...मी काय नाव घेतोय...

**जानकी** : बघ बघ कसा आहेस? लग्न होऊन दिवस उलटला नाही तो नवरा संचारला का रे तुझ्या अंगात?

**धना** : तसं काही नाही...तसं काही नाही बाई...( बाहेर डोकावत ) मंडळी येतील इतक्यात. मी मुद्दाम आधी आलो होतो म्हणजे ऽऽऽ ( घुटमळतो )

**जानकी** : राघूशेटनी शेवंतीलासुद्धा साडीचोळी दिली म्हणे.

**धना** : ( वाईट्ट मुद्रेनं ) हो दिली

**जानकी** : तुला काय दिलं?

**धना** : ( कडवटपणानं ) मला काय देणार? कधी काळी मारहाण केली तेवढीच. एका शब्दानं पुसलं नाही मला की ढुंकून पाहिलं नाही माझ्याकडं.

**जानकी** : असं? बरं बघू या. तू काय सांगत होतास?

**धना** : संध्याकाळीच जंगलातून कड्डू येऊन बसलाय. भाईंना नेण्यासाठी.

**जानकी** : अरे मधमाश्यांचं आग्या मोहोळ उठलं आणि नागपाऱ्याच्या सगळ्या आदिवासी माणसांची काय दैना दैना करून टाकली ते...

**धना** : सांगितलं त्यानं मला. कार्यक्रम संपल्याबरोबर भाई जाणार आहेत त्याच्याबरोबर नागपाऱ्याला.

**जानकी** : मग नको का जायला? अरे मी हिंडतीफिरती असते तर मीसुद्धा...

**धना** : नाही जायलाच पाहिजे पण भाईंना मी म्हटलं की मीसुद्धा येतो तुमच्याबरोबर तर 'नको' म्हणाले.

**जानकी** : तेही बरोबरच आहे की. अरे, काल तुझं लग्न झालं आणि...

**धना** : बाई असं कसं म्हणता तुम्ही? साहेबांचा जीव धोक्यात आहे. मागल्या वेळी आम्ही जंगलात गेलो तेव्हा काय घडलं...

**जानकी** : ते मला ठाऊक आहे. पण तसा आता काही धोका उरलाय असं मला

वाटत नाहीये.

**धना :** ( विस्फारित मुद्रेनं ) बाई ऽऽऽ...

**जानकी :** अरे मित्र-मेळाव्याच्या सगळ्या कार्यक्रमांत शिवरामदादा कसा भाग घेताहेत, कशी भाषणं करताहेत, नगरपालिकेतर्फे किती मदत देताहेत ते तू पाहिलं नाहीस का ?

**धना :** म्हणून तर बाई माझ्या मनात दाट शंका आलीय की... ( थबकतो )

**जानकी :** ( क्षणमात्र पहातच राहते. मग उमज पडून ) अस्सं ऽ ! तुझं म्हणणं काय आहे ?

**धना :** भाईंना सांगा, आज तरी मला बरोबर घेऊन चला.

**जानकी :** हे बघ धना, सांगण्याचं काम माझं तुझे भाई, बायकोचं ऐकणाऱ्यांपैकी आहेत, असं वाटतं का तुला ?

**धना :** होय बाई. माझी खात्री आहे त्याबद्दल. ( तशी जानकी खळखळून हसते आणि... )

**जानकी :** अरे, माझा नवरा मला जास्त कळतो का तुला ?

[ तोच बाहेरून बोलत भाई, राघूशेट, शांताक्का येतात... ]

**राघूशेट :** ( येता येता ) नाही, माझं म्हणणं येणाऱ्या पाहुण्यांनी दोन ओळींचं पत्र टाकून कळवायला काय बिघडत होतं ?

**शांताक्का :** तर काय ? इथं व्यवस्था करणारांची ऐनवेळी किती धावपळ होते ? मला तर एकदा वाटलं की पाहुण्यांना जागा करून देण्यासाठी जानकीलासुद्धा हलवावं लागणार.

**जानकी :** काही गोंधळ झाला का ?

**भाई :** काही विशेष गोंधळ झाला नाही. सगळं ठीक झालं. अगदी उत्तम रीतीनं पार पडलं. काय राघूशेट ?

**राघूशेट :** हो. पाहुण्यांनी पोच ठेवला नाही तरी आपल्या माणसांनी कोणाला काही कमी पडू दिलं नाही.

**भाई :** ते सोडा हो राघूशेट. आता तरी मूळ मुद्द्यावर या. पैज जिंकली मी.

**राघूशेट :** मेळाव्याच्या पहिल्या दिवशीच कबुली दिलीय मी. पैज तुम्ही जिंकलीत याचा सगळ्यांत मोठा आनंद मला आहे. एवढ्या वाल्मीकनगरचा कारभार इतकी वर्षे चालवला मी. हज्जार प्रकारची माणसं पाहिली, पण ज्यांना ' लोक ' म्हणतात त्यांची नाडी काही मला कधी उमजली नाही.

**भाई :** राघूशेट, माणसं भित्री असली तरी मुळात दुष्ट नसतात. त्यांना दिशा द्यावी लागते. बोटाला धरून रस्त्यावर न्यावं लागतं. आता या प्रकारच्या मेळाव्यातून जनसंपर्क वाढला की कुष्ठरोग्यांचं पुनर्वसन आपोआप होत जाईल.

**शांताक्का :** भाई, हा मेळावा ठिकठिकाणी भरवायला हवा. कधीतरी आपल्या लोकांना पाहुणं म्हणून दुसरीकडं जाता यायला हवंच की !

**भाई :** आई, ती याच्यापुढली पायरी आहे. पण त्याला अजून वेळ आहे. कधीतरी हे श्रमानंदनगर कुष्ठरोग्यांची वसाहत म्हणून संपायलाच हवं. त्यानंतर इथं फक्त श्रमानंदच फुलत राहायला हवा.

**राघूशेट :** होईल...तसंही होईल. तोही सोन्याचा दिवस उगवेल. हे इतकं होईल असं तरी कोणाला वाटलं होतं ?

**भाई :** तो दिवस काही आपोआप उगवणार नाही राघूशेट. त्यासाठी आता तुम्ही कंबर कसून उभं राहायला हवं. इथला कारभार आता तुम्ही आपल्या हाती घेणार आहात.

**राघूशेट :** भाई, मी आहे शिपाईगडी. तुम्ही सांगाल ती कामं पार पाडणं एवढं मी जाणतो. मला सेनापती करायच्या भरीला तुम्ही पडू नका.

**भाई :** असं म्हणून कसं चालेल राघूशेट ? इथला सगळा कारभार, ज्यांना कुष्ठरोगाचा स्पर्श झालाय, त्यांनीच चालवला पाहिजे, असं विचारपूर्वक मेळाव्यात आपण ठरवलंय ना ? अस्पृश्यांचा उद्धार अस्पृश्यांनीच केला पाहिजे, स्पृश्यांनी आपल्या मनातली अस्पृश्यता काढून टाकली पाहिजे, असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाबद्दल मी देखील तसंच म्हणतोय.

**शांताक्का :** भाई, तू नागपाऱ्याला जायचं खरोखरीच ठरवलं आहेस का ?

**भाई :** होय आई. तो निर्णय मी आधीच घेतला होता. फक्त हा मेळावा पार पडण्याची मी वाट पाहात होतो. सध्या मी एकटाच येऊन जाऊन राहणार आहे तिथं, पण—

**शांताक्का :** अरे पण इथलं काम अजून संपलेलं नाहीये.

**भाई :** तसं इथलं काम कधीच संपायचं नाहीये पण माझं इथलं काम संपलेलं आहे. आता जंगलातल्या आदिवासींना माणसात आणण्यासाठी मला धावलंच पाहिजे. काल-परवा मधमाश्यांचं मोहोळ उठून नागपाऱ्याला केवढा हाहाकार माजला ते समजलं ना तुला ? एकेक माणसाला दोनदोनशे डंख. काही माणसं बेशुद्ध पडली तर बहुतेकांना उलट्या-जुलाब सुरू झाले.

**शांताक्का :** हे कळल्याबरोबर औषधं घेऊन दोन माणसं पाठवली नाहीत का आपण तिकडं ?

**भाई :** होय पाठवली. पण मघाशी बातमी आली ती तर फारच अस्वस्थ करणारी आहे. जंगल ठेकेदारांच्या हस्तकांनी आदिवासींना मारझोड चालवलीय. तरण्याताठ्या मुलींच्यावरसुद्धा अत्याचार केलेत. मला आज तावडतोब नागपाऱ्याला जायलाच हवं. जानकी—

**जानकी :** तुमचा सगळा बाडबिस्तरा तयार आहे. पण मी सांगते म्हणून तुम्ही जाताना आज धनाला बरोबर घेऊन जा

**भाई :** ( धनाकडं पाहात ) धनानं तुझ्यामार्फत वशिला लावला वाटतं ? अगं त्याची शेवंती काय म्हणेल याची काही —

**धना :** काही म्हणणार नाही. आमचं बोलणं झालंय. तुम्हाला एकट्याला जंगलात जाऊ द्यायचं नाही, असं आमचं ठरलंय.

**भाई :** अरे वा रे वा ! हे देखील परस्पर तुम्हीच ठरवून टाकलंत का ?

**जानकी :** सगळे निर्णय तुमचेच असायला हवेत का ? तुमच्यावर आमचा काही हक्क आहे की नाही ?

**भाई :** बरं बरं ..मानलं ! धना, भैरूला जीप तयार ठेवायला सांग आणि मुरलीला औषधाची पेटी भरून ठेव म्हणावं. [ धना जाऊ लागतो तशी ]

**जानकी :** थांब जरा धना. [ धना थबकतो. जानकी आत जाते ]

**भाई :** आता आणखी काय काढलं हिनं ?

**शांताक्का :** तिच्यासारखी खमकीच बायको आहे म्हणून तुझे पाय जरा तरी जमिनीवर ठरताहेत. नाहीतर सगळ्यांच्या अंगावर पाचोळा उडवून तू केव्हाच दाही दिशांत पसार झाला असतास.

**भाई :** आई, तुझा गैरसमज झालाय. मी काही कायमचा निघून चाललो नाहीये. आणि मी कुठंही गेलो आणि कशातही गुंतलो तरी श्रमानंदनगरीतली माझी मुळं काही तुटणार नाहीयेत.

[ जानकी एक कापडाची घडी घेऊन येते आणि— ]

**जानकी** : राघूशेट, तुम्ही सगळ्या लग्न झालेल्या नवरानवरींना काहीबाही दिलंत, शेवंतीलासुद्धा साडीचोळी दिलीत. मग आमच्या धनाला तेवढा का वगळलात हो ? हे कापड द्या त्याला आणि सगळं मनातलं किल्मिश काढून टाका.

**राघूशेट** : ( कापड घेत ) बाई, हे तुमच्या मनात आलं हे ठीक झालं. पण श्रमानंद-नगरात मी आल्यापासून माझ्या थाऱ्यामोऱ्याला तो उभा राहतोय का ते विचारा त्याला.

**धना :** समोर आलो तरी तुम्हीच तोंड वळवता धनी. मग मी काय करणार ?

**शांताक्का :** आता समोरासमोर उभं केलंय ना तुम्हाला ? जा, त्यांच्या पाया पड धना.

[ धना पाया पडतो तशी राघूशेट आशीर्वाद देत त्याला उठवत कापड त्याच्या हाती देत— ]

**राघूशेट :** हे कापडच मी तुला देतोय असं समजू नकोस धना, तुझी बायकोसुद्धा तुला मीच मिळवून दिलीय.

**धना :** मला ठाऊक आहे ते शेट. तुम्ही शब्द टाकलात म्हणून शेवंतीच्या आई-

बापांनी होय म्हटलं. जातो भाई. ( धना जातो )

**भाई** : ही गोष्ट फर्स्टक्लास केलीस बघ तू जानकी.

**शांताक्का** : हे तिला सुचलं, तसं तुला सुचलं होतं का ?

**भाई** : मान्य आहे आई तुझी सून एक्स्ट्रॉर्डिनरी एफीशियंट आहे. त्या मानानं— मुलगा अंमळ अर्धवट आहे.

**जानकी** : इश्यऽऽऽ काही तरीच काय ?

**शांताक्का** : ते काही फारसं खोटं नाहीये. कोणता शहाणा मुलगा श्रमानंदनगर सोडून जंगलात जाऊन तडफडेल ?

**भाई** : आईच्या डोक्यातून अजून जंगल काही जात नाहीये. इतका विरोध आहे का आई तुझा मी नागपाऱ्याला जायला ?

**शांताक्का** : नाही बाबा, मी कशाला विरोध करू तुला ? आणि विरोध केला म्हणून तू ऐकणार आहेस का कुणाचं ?

**राघूशेट** : भाई, तुम्हाला खरं सांगू ? हे जंगल प्रकरण तुम्हाला इतकं सोपं जाणार नाहीये. सगळ्या विषारी जनावरांचीच गाठ पडणार आहे तिथं.

**भाई** : मी हाडाचा शिकारी माणूस आहे हे विसरलात तुम्ही राघूशेट

**राघूशेट** : मी सर्प, अजगर, बिबटे आणि अस्वलं यांच्यापुरतं नाही म्हणालो. तिथले जमीनदार, जंगल ठेकेदार, वनरक्षक आणि ज्यांना तुम्ही माणसांत आणायला निघालात ते आदिवासी, सगळे एकापेक्षा एक लबाड आणि दुष्ट जनावरं आहेत. या सगळ्यांशीच तुम्हाला लढावं लागणार आहे.

**शांताक्का** : पण हे त्याला कोण पटवून देणार ?

**भाई** : पटण्याचा काही प्रश्नच नाहीये आई. हे सगळं मला ठाऊक आहे. माझं एकट्याचं बळ तिथं पुरं पडणार नाही हे मी जाणून आहे. पण म्हणूनच मी एक भव्य योजना आखतोय. त्यासाठीच आज नागपाऱ्याला जाऊन, तिथल्या लोकांशी बोलून, मी प्राथमिक पाहणी करून येतोय. माझी कल्पना अशी आहे की श्रमानंदनगर, नागपारा खेडं दत्तक घेईल. इथली शंभर कुटुंबं नागपाऱ्याला जाऊन राहतील. तिथल्या आदिवासींना शेती कशी करायची ते शिकवतील. साक्षर करतील. सुटीमधे कॉलेजमधल्या तरुण-तरुणींचं शिबिर भरवण्यात येईल त्यातून कार्यकर्ते निवडून —

**शांताक्का** : स्वप्नंऽ...स्वप्नंऽ...सगळी स्वप्नं आहेत ही तुझी.

**भाई** : श्रमानंदनगर हे सुद्धा एकेकाळी स्वप्नच होतं नव्हे का आई ? तुला ठाऊक आहे ..स्वप्नाशिवाय जगणं म्हणजे मला निर्माल्य झाल्यासारखं होईल

**शांताक्का** : तू स्वतःपुरतं वाटेल ते कर. पण तुझ्या बायकोला आणि मुलाला मात्र मी तुला इथून मुळीच नेऊ देणार नाही. त्या अश्राप अर्भकाला तिथं सिरेब्रल

मलेरिया लागायला नकोय मला.

**राघूशेट :** अजून लांबची गोष्ट आहे ती, शांताक्का. जमीनदार, जंगल ठेकेदार, वनरक्षक आणि आदिवासी हे सगळे मिळून भाईंची एकूण एक स्वप्नं पार मोडीत काढणार आहेत.

**भाई :** राघूशेट, श्रमानंदनगर उभारीत असताना ' राघूशेटच्या वाटेला जाऊ नका, तो तुम्हाला बाराच्या भावात काढील ' अशीही धमकी मला देण्यात आली होती. खुद्द तुम्हीसुद्धा दिली होती. पुढं काय घडलं ?

**राघूशेट :** भाई गफलत करू नका. वाल्मिकनगरमधे हातभट्टीचा धंदा चालू असतानाही, तिथली माणसं स्वतंत्र होती. गुलाम नव्हती. तुम्ही वाल्मिकनगरच उद्ध्वस्त करायला आलात असं वाटलं तेव्हा राघूशेटनं तुम्हाला ती धमकी दिली. पण श्रमानंदनगरात कुष्ठरोग्यांचं सर्व बाजूनं भलं होतंय हे पाहिल्यावरोबर राघूशेटचा विरोध संपला. तो तुमच्या पाठीशी येऊन उभा राहिला.

**भाई :** तसंच हे जमीनदार, जंगल ठेकेदार आणि—

**राघूशेट :** नाही. जमीनदार आणि जंगल ठेकेदार तुम्हाला कधीही साथ देणार नाहीत. वनरक्षक तर त्यांचेच मिंधे. हे सगळे मिळून आदिवासींना जनावरासारखे जगवतात आणि राबवतात. सगळे आदिवासी त्यांचे गुलाम आहेत आणि त्यांना ते गुलामच राहायला हवेत. आणि आदिवासींना तरी कुठे गुलामीची जाण आहे ? ही जनावरे उद्या ' माणसं ' व्हायला लागली तर जमीनदार, ठेकेदार आणि वनरक्षक यांना जीव घेऊन पळावं लागेल, ठाऊक आहे ? म्हणून ज्यांनी ज्यांनी या आदिवासींना माणसात आणायचा प्रयत्न केला, त्यांचे या लोकांनी मुडदे पाडलेत मुडदे. तेव्हा...जपून .. संभाळून...

**भाई :** (अस्वस्थतेने येरझारा घालीत) याचा अर्थ पुन्हा भय. पुन्हा एकदा मरणाचं भय ! सगळया शहाण्याचा फक्त एकच सक्त इशारा. मुकाट्याने माघार घ्यावी... निमूटपणे डोळयावर कातडे ओढून जीव संभाळावा...जंगलातल्या गुलामांच्या दुःखावर फार तर एक तरट टाकावे आणि धूम ठोकावी ..कुष्ठरोग्यांना थोडा हात दिला, एक नगर उभारले...वास वास...रगड झाले. एका आयुष्याची भरपेट कामगिरी झाली...आता हारतुरे घ्यावे ..घरी निवांत बसावे...सुग्रास जेवावे...नाकासमोरच पाहावे...पायघड्यांवरूनच चालावे...जंगलातल्या काळ्या कुट्ट सावल्या पाहू नये...आठवू सुद्धा नये...कळवळा फारच खदखदू लागला तर शब्दांचे पाट काढून तो वाहू द्यावा...पण प्रत्यक्ष वादळापासून दहा हात दूर राहावे...फार तर कालच्या स्वातंत्र्य–सैनिकाप्रमाणे ताम्रपट कुरवाळीत मेलेल्या पराक्रमाचे पोवाडे गावेत... आई, राघूशेट, हे असले ' माणसाळणे ' मला जमले नाही आणि जमणार नाही. वादळ उभे ठाकले की मी त्यात स्वतःला झोकून

देणारच. आव्हान उभे राहिले की गचकन् फणा काढून मी ते स्वीकारणारच.

**राघूशेट :** तुम्ही आव्हान स्वीकारल्यानंतर पहिली झुंज कोणाशी द्यावी लागेल तुम्हाला ते ठाऊक आहे ?

**भाई :** कोणाशी ?

**राघूशेट :** तुमचे मित्र, नगराध्यक्ष शिवरामदादा. जंगलचे मोठ्ठे ठेकेदार.

**भाई :** ( विस्मयानं ) शिवरामदादा? जंगलचे ठेकेदार ? छे छे...

**राघूशेट :** प्रत्यक्ष कागदोपत्री ठेकेदार म्हणून नाव त्यांच्या भावाचं असल तरी मालक शिवरामदादाच आहेत.

[त्याच वेळी दारात येऊन उभे राहतात शिवरामदादा.]

**शिवराम :** ( आत येत ) नमस्ते मंडळी !

**भाई :** आईये जनाब शंभर वर्षे तू या देशाला पीडणार दादा.

**शिवराम :** का ? कोणी माझी आठवण काढली ? कशासाठी ?

**भाई :** बैस बैस !...चटई आणायला विसरलास वाटतं ?

**शिवराम :** ( हसत ) अजून बरं लक्षात ठेवलं आहेस तेवढंच ?

**भाई :** तेवढंच नाही. पुष्कळ काही लक्षात राहिलंय माझ्या.

**जानकी :** दोन घास खाऊन निघणार ना तुम्ही ?

**भाई :** नको पाहुण्यांच्याबरोबर झालंय माझं जेवण. पण उद्यासाठी टिफीन् कॅरियर, थर्मास आणि वॉटर बॉटल देता आली तर बघ.

**शांताक्का :** ( लगबगीनं आत जात ) हे तिला कशाला सांगतो आहेस? ती काय स्वयंपाकघरात चुलीपुढं जाऊन बसणार आहे ? ( आत जातात. )

**जानकी :** इश्श, मी करते सगळं. त्यात अवघड काय आहे एवढं ? ( जाता जाता वळून ) आई रागावल्या आहेत बरं का ?

**भाई :** म्हणूनच म्हणतो...तू आधी आत पळ...

**जानकी :** ( जाता जाता दाराशी थबकून वळून मिस्किलपणे ) विचारायचं म्हणजे एवढंच की जाण्यापूर्वी बाळाला भेटून जाण्याइतपत तरी सवड होणार आहे ना ?

**भाई :** ( डोळे विस्फारुन ) अस्सं काऽय ? आता इथं ही माणसं बसली आहेत म्हणून, नाहीतर—

**जानकी :** ओ हो...कळलं कळलं... ( मान ऐटीत उडवीत जाते )

**शिवराम :** कोणत्या मुलुखगिरीवर निघालीय आपली स्वारी ?

**भाई :** ( हसून ) तुझ्या डोक्याला नवा त्रास निर्माण करणाऱ्या मुलुखगिरीवर

**शिवराम :** चेष्टा सोडून जरा सरळ बोललास तर काही बिघडेल ?

**भाई :** दादा, आजच्या इतकं खरं मी आयुष्यात कधी बोललो नाहीये

**शिवराम :** वात्रट आहेस. अरे माझ्या डोक्याला तू त्रास निर्माण करावास असं मी

काय तुझं घोडं मारलंय ?

**भाई :** तसं श्रमानंदनगरात तरी तुझं काय घोडं मारलं होतं ? आणि तरी तू हे नगर नष्ट करण्याच्या भीष्मप्रतिज्ञा तारस्वरात करीतच होतास ना ?

**शिवराम :** ते ते फार फार पूर्वी. हल्ली नाही.

**भाई :** फार फार पूर्वी म्हणजे दोनअडीच महिन्यांपूर्वी.

**शिवराम :** नाही नाही ..भलतंच काय ? कमीत कमी तीन चार वर्षांपूर्वीची गोष्ट असेल ती. मला नक्की स्मरतंय. ते सोडून दे. पण या मित्रमेळाव्याच्या वेळी मी तुला किती मदत केलीय, प्रत्येक भाषणात मी तुझी आणि कुष्ठपीडितांची बाजू किती हिरीरीनं मांडलीय, एवढंच नव्हे तर नगरपालिकेची सगळी यंत्रणा श्रमानंद नगराच्या पाठीशी या काही दिवसांत कशी उभी केलीय, हे सगळं लक्षात आलंय ना तुझ्या ?

**भाई :** ओ फँटास्टिक ! त्याबद्दल दादा, व्यासपीठावरून तोंडभरून, माझ्यासकट प्रत्येकाने, तुझे भरपूर आभार मानले आहेत. पण व्यासपीठावरून मला आणि इथल्या कोणालाच विचारता आला नाही असा एक प्रश्न उरलाय. प्रश्न असा आहे की, तुला एकाएकी श्रमानंदनगर आणि हा मित्रमेळावा यांच्याबद्दल एवढ्या तातडीनं प्रेमाचा उमाळा कसा काय आला ? काहीतरी चमत्कार घडला असला पाहिजे. काय राघूशेट ?

**राघूशेट :** त्यात चमत्कार वगैरे काही नाहीये भाई. माझ्या लहानपणी जेव्हा देशात साहेबाचं राज्य होतं, त्या वेळी एक म्हण होती. ‘ जिथे सरशी तिथे पारशी. ’ आता ती बदलायला हवी. म्हणजे म्हणायचं तर... ‘ जिथे मते, तिथे नेते ! ’

**शिवराम :** ( आवेशानं ) हे–हे खरं नाहीये राघूशेट. तुमचे गावोगावचे पाहुणे हे काही माझे मतदार नाहीयेत. कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाबद्दल मला पूर्वीपासूनच पोटतिडीक आहे. भाई, आज तू आपल्या भाषणात या राघूशेटची रगड स्तुती केलीस खरी, पण—

**राघूशेट :** छे छे साहेब, भाईंनी माझी स्तुती वगैरे काही केली नाही. फक्त खरी गोष्ट सांगितली. हातभट्टीचा धंदा करून राघूशेटनं गुन्हा केला असला तरी रस्त्यावरले कुष्ठरोगी जगवले, ही मोठीच कामगिरी घडली—एवढंच ते म्हणाले. ही काही कोणाची स्तुती होऊ शकते का ? यांनी चिक्कार पैसे खाल्ले; पण विठ्ठल मंदिर बांधलं, ही तुमची स्तुती आहे का ?

**शिवराम :** मुद्दा तो नाहीये वाल्मिकनगरच्या उभारणीत किती वर्षांपासून मी तुम्हाला पाठिंबा देत आलोय ते—

**राघूशेट :** ते आम्ही कसं विसरू साहेब ? भाई, शिवरामदादांचा आमच्या हातभट्टीला पहिल्यापासून पाठिंबा. कोणाला किती हप्ता द्यायचा हे मुळी त्यांनीच

ठरवून दिलं. शिवाय निवडणुकीत आमच्या वस्तीवर इकठ्ठा मतं मिळावीत यासाठी—

**शिवराम :** ( गडबडीनं ) तो वेगळा.. अगदी वेगळा विषय आहे राघूशेट.

**राघूशेट :** छे छे साहेब, तुमच्या भक्कम पाठिंब्याचंच ते ढेरपोट आहे.

**शिवराम :** ( रागानं ) अजूनही तुला माझा पाठिंबा लागणारच आहे ना राघूशेट ?

**राघूशेट :** छे मुळीच नाही. साहेब, वाल्मिकनगरातला धंदा बंद झाला, आणि ती वस्तीही उठली, सगळ्या हप्तेवाल्यांच्या नावानं आंघोळ करून राघूशेट मोकळा झाला आणि तुम्हाला म्हणून सांगतो साहेब, आता श्रमानंदनगरासाठी कोणाला दिडकीचा हप्ता मिळायचा नाहीये. नाही, आठपंधरा दिवस तुम्ही धावधावून सगळी कामं फटाफट् करून टाकताय म्हणून सांगितल.

**शिवराम :** ( रागानं ) समजलं समजलंऽ ! एवढं नाक उडवून मला सांगायची गरज नाहीये तुला बजावून ठेवतो भाई, या माणसापासून तू सावध राहायला हवंस.

**भाई :** ते पाहूया आपण. पण दोन अडीच महिन्यांपूर्वी तू मला एक धमकी देऊन इथून निघून गेला होतास, हे तुला आठवतं का ?

**शिवराम :** ( आश्चर्यानं ) धमकीऽऽ? आणि मीऽऽ? ती ही तुलाऽऽ? छे छे काहीतरीच काय ?

**भाई :** तुझे नेमके शब्द सांगू ? माझ्याशी भांडण करणाऱ्याला, भांडण मिटवण्याची एक संधी मी जरूर देतो. दुसरीही देतो. तिसऱ्या खेपेला मात्र—मी भांडण करणाऱ्यालाच संपवतो.

**शिवराम :** ( हसत ) छे छे छे छे...केवढा प्रचंड गैरसमज ? अरे तुम्ही लोकांनी साफ चुकीचं ऐकलंय. रागाच्या भरात कधी कधी ऐकण्यात अशी चूक होते माणसांची. अरे मी असं म्हणालो होतो की, ' तिसऱ्या खेपेला मात्र पुढाकार घेऊन भांडण मीच संपवून टाकतो भांडण संपवितो भांडण—भांडणारा नव्हे. भाई, तू माझा लहानपणापासूनचा दोस्त,...माझ्या काळजाचा एक तुकडा... माझ्या डोळ्यांत बघून सांग, तुला संपवण्याचा विचार कधीतरी माझ्या मनात येईल ?

**राघूशेट :** तरी देखील भाईंच्या अंगावर ट्रक घालून त्यांना खतम करण्याची सुपारी वाल्मिकनगरातल्या एका ट्रक ड्रायव्हरला मिळाली होती आणि परवा भाई जगलांत नागपाऱ्याला जायला निघाले तर ओढ्यापाशी—

**शिवराम :** माझ्याही कानावर आलंय ते. भाईंच्या वाईटावर असलेल्या कोणातरी पाजी माणसाचं काम असावं ते. तू अलीकडं कोणाला नोकरीवरून काढून टाकलं आहेस का भाई ? ( सगळ्यांच्या मुद्रा न्याहाळत ) तुम्ही लोक माझ्याशी तर संबंध जोडीत नाहीये ना त्या गलिच्छ प्रकरणांचा ?

**भाई :** संबंध असला नसला, तरी एक गोष्ट तुला नक्कीच कळून चुकली असेल मला संपवून टाकलं तरी श्रमानंदनगर काही संपणार नाही. निदान असं ज्योत फुंकून विझवल्यासारखं संपणार नाही

**शिवराम :** अरे काय बोलतोस तू हे भाई ? जे श्रमानंदनगर एवढा विरोध सहन करून अपार कष्ट घेऊन आपण उभं केलं, ते काय...

**भाई :** ( विस्मयानं ) आपण ?

**शिवराम :** हो हो आपणच नाहीतर काय ?

**भाई :** ( मिस्किलपणे ) काहीतरी घोटाळा होतोय गड्या.

**शिवराम :** घोटाळा वगैरे काही नाही. प्रत्यक्ष कामाचा भार तू उचलला असतास तरी माझी मदत, माझं मार्गदर्शन आणि सरकार-दरबारी खटपट, तुझ्या पाठीशी होतीच ना ? आता श्रमानंदनगराला सरकारकडून ही चारशे एकर जमीन मिळाली...

**भाई :** तीही तूच मिळवून दिलीस असं म्हणायचं का तुला ?

**शिवराम :** पडद्यामागं सूत्रं कोणी हलवली असं तुला वाटतं ?

**भाई :** सूत्रं हलवण्याचा तू आटोकाट प्रयत्न केलास, पण तो जमीन मिळू नये म्हणून.

**शिवराम :** हेच हेच ते कोणीतरी येऊन तुला काही सांगितलं तरी तुझा चटकन् विश्वास बसतो. पण प्रत्यक्षात...

**भाई :** ठीक आहे बाबा, तुझ्या सूत्र हलवण्यामुळं श्रमानंदनगरला जमीन मिळाली असली तरी आमची काही हरकत नाहीये.

**शिवराम :** किरकोळ लहानसहान बाबी उगाळत बसून तू मोठमोठ्या संधी येताहेत त्याकडं पाठ फिरवू नकोस. अरे परवा दिल्लीला पक्ष कार्यकर्त्यांचा मेळावा होता, त्या वेळी पक्षश्रेष्ठींनी श्रमानंदनगराची माझ्यापाशी खोदखोदून चौकशी केली. मला पंतप्रधान म्हणाले - "दादा, आपल्या देशातल्या एका गावात एवढं मोठं कार्य चाललंय, कॅनडातले आणि स्वीत्झर्लंडमधले लोक तोंड भरून माझ्यापाशी त्याबद्दल बोलतात आणि मला कसं माहीत नाही ? तुम्ही कसे कधी बोलला नाहीत ?" मी स्वच्छ सांगून टाकलं पक्षश्रेष्ठींना..."मी आणि भाई हाडाचे कार्यकर्ते आहोत गाजावाजा न करता कार्य करीत रहाणं हा आमचा धर्म आहे."

**भाई :** ( हसून ) पुन्हा 'मी आणि भाई' काय ? दादा तू खरोखरीच ग्रेट आहेस.

**शिवराम :** मुख्य मुद्दा हा आहे की राष्ट्रपती आणि पंतप्रधान आपल्या श्रमानंद नगराला भेट देऊ इच्छितात, आहेस कुठं ? आता बोल ?

**भाई :** ( हसून ) आयसीऽ ! सो दॅटस् दॅट ! द कॅट इज औट ऑफ द बॅग. पक्षश्रेष्ठींनी उत्सुकता दाखवल्याबरोबर तुला श्रमानंदनगराचा कळवळा

उपजला तर ?

**शिवराम :** तुझ्या आणि माझ्या दृष्टीने ही केवढी ऑपर्च्यूनिटी आहे!

**भाई :** आता सगळे धागेदोरे माझ्या बरोब्बर लक्षात आले. दिल्लीहून तू परत आल्या आल्या श्रमानंदनगरासाठी आणि मित्रमेळाव्यासाठी, एवढा का जीव पाखडतो आहेस, हे मला पूर्ण कळून चुकलं. आता मला एवढंच सांग तुला नेमकं कोणतं राजकारण साधायचंय ?

**शिवराम :** छे छे राजकारण वगैरे काही नाही. पण श्रमानंदनगरच्या ट्रस्टवर अध्यक्ष म्हणा, उपाध्यक्ष म्हणा, चिटणीस म्हणा – अशा एखाद्या पदावर माझी नियुक्ती झाली तर—

**भाई :** पुढं निवडणूक जिंकणं आणि मंत्री होणं तुला सोपं जाईल.

**शिवराम :** तो अंमळ नंतरचा भाग आहे. पण—

**भाई :** दादा, तुला ट्रस्टवर कोणतीही जागा देता येण्याची शक्यता नाहीये. कारण ज्यांना कुष्ठरोग झाला आहे आणि जे बरे झाले आहेत अशांनीच हा ट्रस्ट चालवायचा असं तूर्त ठरलंय. मी सुद्धा बाजूला झालोय. हे राघूशेट अध्यक्ष, दामले मास्तर उपाध्यक्ष आणि हणमंतराव चिटणीस, असे पदाधिकारी काम करणार आहेत.

**शिवराम :** इतक्यात तुम्ही ठरवून सुद्धा टाकलंत ? ( नाराजीनं ) तुम्ही चुकताहात. मी माझ्यासाठी म्हणत नाहीये. पण राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना श्रमानंद-नगरला भेट देण्यासाठी बोलवायचं असं मी ठरवलं.

**भाई :** राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना बोलवायला कशाला हवं ? इथं काही समारंभ किंवा महोत्सव साजरा करायचा नाहीये.

**शिवराम :** अरे पण भेट देण्यासाठी तरी—

**भाई :** बोलवायला कशाला हवं ? भेट द्यायला ते आपण होऊन इथं केव्हाही येऊ शकतात. पूरग्रस्तांना आणि दंगलग्रस्तांना ते आपण होऊनच भेट देतात ना ? तशी त्यांनी रोगग्रस्तांना भेट द्यायचं ठरवलं तर श्रमानंदनगरात त्यांचं स्वागतच होईल. पण आम्ही निमंत्रण पाठवून वा वशिले लावून कोणालाही बोलावणार नाही. त्याची काही गरज नाही. कारण आम्हाला कोणाकडून काही मागायचंच नाही. बरोबर आहे ना राघूशेट ?

**राघूशेट :** एकदम बरोबर भाई.

**शिवराम :** या या तुझ्या चमत्कारिक हटवादीपणामुळंच श्रमानंदनगराचं तू नुकसान करणार आहेस. अरे श्रमानंदनगराला केंद्र सरकारकडून किती किती आणि केवढी मोठी अनुदानं मिळण्याची संधी तुमच्यापुढं चालून आलीय ते—

**भाई :** दादा, श्रमानंदनगराचं ब्रीद वाक्य लक्षात ठेव. चॅरिटी डिस्ट्रॉइज; वर्क

विल्डस ! दान माणसाला नादान करतं. माणसाप्रमाणं संस्था आणि नगरंसुद्धा स्वतःच्याच कष्टावर ताठ उभ्या राहतात.

**शिवराम :** तरी पण—

**भाई :** या आमच्या हट्टामुळं कोणाची संधी जाणार असली तर ती तुझी जाणार आहे. श्रमानंदनगरचा 'शिल्पकार' म्हणून काही तुला मिरवून घेता येणार नाहीये. व्हेरी सॉरी.

[ तेवढ्यात मास्तर आणि मुरलीधर येतात आणि— ]

**मुरली :** भाई जीप तयार झालीय.

**भाई :** ठीक आहे. पाच मिनिटांत निघूयाच आपण.

**शिवराम :** ( आश्चर्यानं ) हे काय ? कुठं जायची तयारी झालीय तुझी ?

**भाई :** ( हसून आत जाता जाता ) तुझ्या डोक्याला नवा त्रास निर्माण करायचं ठरवलंय ना मी ? राघूशेट, दादासाहेबांना सांगा एकदा माझी नवी संकल्प योजना. तोवर येतोच मी ( आत जातो )

**शिवराम :** कसली संकल्प योजना ? हा कुठं जायला निघालाय राघूशेट ?

**राघूशेट :** जंगलात, नागपाऱ्याला.

**शिवराम :** ( विस्मयानं ) जंगलात ? नागपाऱ्याला ? तिथं काय काम काढलंय यानं ? परवाही हा जाऊन आला तिथं म्हणून माझा भाऊ नरहरी सांगत होता मला. जंगल ठेकेदार म्हणून तोच काम बघतो नागपाऱ्याला माझ्या वतीनं. पुन्हा कोणी आजारीबिजारी तर...

**मुरली :** मधमाश्यांचं मोहोळ उठून बरीच माणसं जखमी झाली आहेत नागपाऱ्याला.

**राघूशेट :** तेवढंच नाही. मारझोडीचं आणि बलात्काराचं प्रकरणही झालंय आज.

**शिवराम :** त्यात काय ? अशी प्रकरणं नेहमीच घडतात तिथं. चोऱ्यामाऱ्या केल्या असतील हरामखोरांनी. चौदावं रत्न दाखविल्याशिवाय नाही ही जंगलातली जनावरं ठिकाणावर येत.

**राघूशेट :** भाईंच्या समोर हे बोलला असता, तर इथंच जुंपली असती त्यांची—तुमची.

**शिवराम :** पण हा तिथं जाऊन काय करणार आहे ? कसली योजना आहे त्याची ?

**राघूशेट :** शिवरामदादा, नागपारा खेडं दत्तक घ्यायचं ठरवलंय भाईंनी. शंभर एक माणसं घेऊन भाई तिथं जाऊन राहणार आहेत. तिथल्या आदिवासींना माणसात आणायचं ठरवलंय भाईंनी.

**शिवराम :** अस्सं ऽ ! म्हणजे हा आता मला माझ्या पोटापाण्याच्या धंद्यातूनच उठवायला निघालाय म्हणायचा !

**राघूशेट :** असं काही समजायचं कारण नाही तुम्हाला शिवरामदादा.

**शिवराम** : नाही कसं ? हा आदिवासींना माणसात आणणार म्हणजे पुन्हा आमच्या तोंडात माती. हे-हे-हे मात्र खरंच फार जड जाईल त्याला.

**राघूशेट** : शिवरामदादा तुम्ही जरा समजून घ्या...

**शिवराम** : सगळं समजून चुकलोय मी. त्यालाच जरा नीट समज द्या. मी गेलो म्हणून सांगा त्याला.

**राघूशेट** : नाही तुम्ही जा, पण शिवरामदादा, समजून एवढंच चला की यापुढं मी भाईंच्या पाठीशी उभा आहे.

[ शिवरामदादा रागारागात जातात. ]

**मुरली** : ( हसून ) गडी एकदम बिथरला.

**मास्तर** : माणूस तसा भला दिसला मला. पण...

**राघूशेट** : माणसं सगळी भलीच असतात मास्तर, पण कोणाच्या बुडाला चिमटा बसला की ती अशी फणा काढतात.

[ तोच आतून भाई, जानकी आणि शांताक्का येतात. बरोबर प्रवासी सामान. मुरलीधर पुढं होऊन भाईंच्या हातून बॅग, होल्डॉल येतो आणि...]

**मुरली** : शिवरामदादा निघून गेले भाई. एकदम बिघडून चालते झाले.

**भाई** : ते बिघडून जाणार हे मला ठाऊकच होतं. म्हणूनच मी त्यांना तुम्हा लोकांवर सोपवून आत निघून गेलो.

**जानकी** : ( काळजीनं ) पुन्हा कसली धमकी दिलीय का दादांनी ?

**भाई** : दिली असली तर देऊ देत गं, मी त्यांची पर्वा करीत नाही.

**राघूशेट** : ताई, तुम्ही बिलकूल काळजी करायची नाही. मी शिवरामदादांना जे सांगितलं, तेच तुम्हाला सांगतो. यापुढं मी. .मी भाईंच्या पाठीशी उभा आहे. अहो, या दादांनी हयातीत जेवढे गुंड पाहिले नसतील, तेवढे मी या बोटावर खेळवलेत ! तेव्हा ते दिवस विसरा.

[ तेवढ्यात हणमंतराव येतात तशी—]

**भाई** : हणमंतराव तुम्ही तर कमालच केलीत. माझी निघायची वेळ झालीय आणि तुम्ही आत्ता उगवताय ?

**हणमंतराव** : भाई, तुम्हीच सोपवलेली कामगिरी पार पाडीत होतो.

**भाई** : ( उत्सुकतेनं ) सगळ्यांशी बोललात तुम्ही ? माझी संपूर्ण योजना समजावून सांगितलीत आपल्या लोकांना ?

**हणमंतराव** : इतका वेळ वस्तीवरल्या सगळ्या माणसांशी गटागटानं बोलत होतो. तशीऽऽ...सगळ्यांना तुमची योजना पसंत आहे. पण...( थबकतात ) नाही म्हणजे, तसा कोणाचा खास असा विरोध नाहीये, पण—( पुन्हा थबकतात )

**भाई** : आलं लक्षात. श्रमानंदनगर सोडून, जंगलात जाऊन राहायला कोणी तयार

नाहीये– असंच ना ?

**हणमंतराव :** तसं काय...' जायलाच पाहिजे ' म्हणून हुकूम केला की—

**राघूशेट :** बरोबर हणमंतराव. हुकूमच करायला हवा. भाई, तुम्ही ही छोटीशी बाबत माझ्यावर सोपवा. सक्ती केल्यावाचून ही माणसं, हे–हे हरामखोर, तुम्हाला मदत करणार नाहीत.

**भाई :** ( विषण्ण हसत ) कुष्ठरोगीसुद्धा आपला संघर्षकाळ इतक्या लवकर विसरतात, नाही ? रोगमुक्त झाल्यावर आणि रोजंदारी मिळायला लागल्याबरोबर, या सगळ्यांना सुखस्वास्थ्याची एवढी जबरदस्त चटक लागावी ना ?

**शांताक्का :** भाई, सुख आणि स्वास्थ्य, ही काय केवळ धनिक माणसांची मिरास आहे ? इतक्या हालअपेष्टा काढल्यानंतर, सुख आणि स्वास्थ्य भोगावं, असं या रोगमुक्त माणसांना वाटलं, तर तो काय गुन्हा आहे त्यांचा ? तू एक मशाली-सारखा सतत जळत आणि जाळीत सुटला आहेस. पण म्हणून प्रत्येकानं आपल्या आयुष्याची मशालच पेटवली पाहिजे का ? ज्यांना संथ वातीसारखं तेवत राहायची इच्छा आहे, त्यांची मशाल करण्याचा तुला काय हक्क आहे ? मी सांगते, या श्रमानंदनगरातून, कोणावरही सक्ती करून मी जंगलात राहायला पाठवणार नाही.

**राघूशेट :** शांताक्का, तुम्ही सक्ती करणार नसलात तर भाईंना जंगलात जायला एकाही माणसाची साथ सोबत मिळणार नाही

**जानकी :** राघूशेट, श्रमानंदनगरातला पहिला दिवस तुम्हाला ठाऊक नाहीये. त्या वेळी यांना कोणी साथसोबत केली होती ?

**शांताक्का :** असं म्हणू नकोस जानकी. त्या वेळी सगळे कुष्ठरोगी भरारा भाईच्या मदतीला धावून आले.

**जानकी :** तसेच जंगलातले आदिवासी यायचे नाहीत का ?

**शांताक्का :** ( विचारात हरवत ) कुणास ठाऊक !

**राघूशेट :** कुणाला नाही, ते मला ठाऊक आहे. अहो कुष्ठरोग्यांना आपण रोगी आहोत; हा एक माणूस आपल्याला मदत करतोय; बरं करतोय; भलं करतोय, हे तरी कळत होतं. जंगलातले आदिवासी म्हणजे जनावरंच हो. तेच आधी भाईच्या जीवावर उठतील ते काय त्यांना साथसोबत देणार ?

**भाई :** ( भारल्यागत ) साथसोबत हवीय कोणाला ?

माझंच आभाळ, माझीच धरती

असाच एकटा चालत राहीन–

वादळ घेऊन खांद्यावरती

गडगडणारे विक्राळ मेघ

लोळ विजांचे कडकडणारे

वाळवंटातील जाळते ऊन
सारेच्च माझे सोयरे सोबती ! ॥ असाच एकटा०
भीती ? केव्हाच गळून पडली
प्रीती–फक्त प्रेरणेसाठी उरली
वादळाचा वारकरी मी
तेवढाच धर्म, तेवढीच नीती ॥ असाच एकटा०
व्यथा वेदना निखारलेल्या
अन्याय जिथे थैमान घालतात,
तिथेच तुफानाची रोपं
पेरीत पेरीत जाईन पुढती ॥ असाच एकटा.
मानवजीवन म्हणजे काय ?
कधीच मला कळलं नाही
एकच्च कळलं, ' जगणं ' म्हणजे
जागवीत जाणं अबोल माती ॥ असाच एकटा०
असतील सूर्यचंद्र अनेक महान्
एकच मशाल माझ्या हाती
तीच फुलवील प्रकाश माझ्या
मार्गावरती, जगण्यावरती—
मरण्यावरती ॥— असाच एकटा०

[ भाई थांबतो. जानकी प्रेमभरानं धावून येत त्यांचा हात उचलून त्यां हाताचं चुंबन घेते. शांताक्काही भारावलेल्या. भाई शांताक्कांच्या जवळ जात, त्यांचे दोन्ही हात हातात घेत–]

**भाई :** ( भावनावेगानं ) आई, मी निघतो. अजूनसुद्धा माझ्यावरला राग सोडायला तयार नाहीस का तू ?

**शांताक्का :** ( गहिवरून ) अरे माझा राग नाहीये रे तुझ्यावर. पण माझी म्हातारीची वाटचाल आणि तुझी गरुडझेप...कसं काय गणित जमायचं बाबा ?

**भाई :** जमेल जमेल...( नमस्कारासाठी वाकत ) आता तोंडभरून आशीर्वाद दे बघू मला.

**शांताक्का :** ( पदरानं डोळे टिपत ) उदंड...उदंड आयुष्यमान हो रे बाबा, [ भाई तसाच गुडघे टेकून तिच्या पायाशी बसून तिच्या मुखाकडे बघत राहतो तशी— ] हे रे काय दिला ना तोंडभरून आशीर्वाद ? ऊठ आता !

**भाई :** ( आईच्या कमरेला विलगत ) छट् ! हा कसला पोकळ, पोचट, बिनबुडाचा, अळणी आशीर्वाद, नेहमीचा खराखुरा, झणझणीत शब्दांतला आशीर्वाद दिल्या-

शिवाय काही उठायचा नाही मी आई.

**शांताक्का :** ( सहजगत्या खुदकन् हसत ) चल चावट ! जा ऽ मेल्या जा ऽ, हव्वा तिथं जाऊन उधळ, सुखरूप लवकर घरी ये परत म्हणजे भरू ऽ ऽ न पावलं !

**भाई :** ( हर्षभरानं टाळ्या वाजवीत उठत ) ब्रॅव्हो ऽ ... दॅटस् इट ! हा खराखुरा आशीर्वाद. [ असे भाई ओरडतो. दुसऱ्याच क्षणी जानकीचा हात हाती घेत तो जाण्यासाठी वळतो. तिला घेऊन बाहेर जाता जाता तो म्हणतो—" जानकी, आता मी काय सांगतोय ते नीट लक्षात ठेव, उद्या सकाळी...

[ त्याच्या पाठोपाठ शांताक्का, मास्तर, राघूशेट इ. सर्व माणसे बाहेर पडत असतानाच - पडदा ]

**अंक तिसरा संपला**

IRBK-0120697

IRBK-0120697

[illegible]